# शब्द रुची

४८



मंगला नारळीकर



रवींद्र महाजनी

ऑगस्ट २०२३ | मूल्य १० रु.| पृष्ठे ५२

अशोक सराफ यांचा ग्रंथालीच्या वतीने दिनकर गांगल यांच्या हस्ते सन्मान



कृतज्ञ मी...
कृतार्थ मी..




रंगभूमीसाठी बहुमोल योगदान दिलेल्या वयोवृद्ध कलाकारांचा सन्मान


G20
Azadi Ka Amrit Mahotsav
MAGNETIC MAHARASHTRA
MAKE IN INDIA
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
साजरे करत आहे
६१ वे
गौरवशाली वर्ष
श्री नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री
श्री एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री
खुली झाली आहेत
महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीची दारे
श्री उदय सामंत
मा. उद्योगमंत्री
श्री देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री
श्री एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री
श्री अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री
www.midcindia.org
आम्हाला फॉलो करा:

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची ४८

**ऑगस्ट २०२३, वर्ष दहावे**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi
GRANTHALI

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

---

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

---

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**सुधा हुजूरबाजार तुंबे** / ५
माझी मंगलावहिनी...

**उषा नाईक** / ८
मोकळ्या मनाचा नायक

**आशा काळे** / १०
दैवाचा अनाकलनीय खेळ

**चांगदेव काळे** / १२
साहित्यक्षेत्रातील हिमनग

**शरद काळे** / १५
अंतराळातील कचरा

**नंदन जोशी** / २०
दक्षिणध्रुवातील काही तारे – ब्युनोस आयर्स

**प्रा. प्रज्ञा काशीकर** / २३
यंत्रमानव, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वायत्त वाहननिर्मिती

**सुरेश वांदिले** / २६
रस्तेवाले जोशी

**संजीवनी खेर** / २९
तेजस्वी लेखणी

**राजीव श्रीखंडे** / ३२
द ब्रिज ओव्हर द ड्रायना – इव्हो अँड्रिक

**किरण येले** / ३७
कवी आणि अनुवादक – विकास पालवे

**विनता कुलकर्णी** / ४०
अमेरिकेतील कचराव्यवस्थापन प्रणाली

**वृत्तांत** / ३६, ४२

ग्रंथपरिचय – **डॉ. निर्मोही फडके** / ४६

ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ४७

# संपादकीय...

'मी बहुरूपी' हे अशोक सराफ यांच्या अभिनयप्रवासाचे कथन 'ग्रंथाली'ने गेल्या वर्षी प्रसिद्ध केले. त्यावेळी निवेदिता सराफ म्हणाल्या होत्या, की यासाठी व याद्वारे जो निधी जमा होईल त्याचा विनियोग रंगभूमीसाठी योगदान दिलेल्या पडद्यामागील ज्येष्ठ व्यक्तींचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यासाठी करावा, अशी माझी व अशोकजींची इच्छा आहे. त्याला सुभाष सराफ यांची साथ होती आणि 'ग्रंथाली'चे सहकार्य होते. त्यानुसार २९ जुलै रोजी रंगभूमीची सेवा करणाऱ्या वीस व्यक्तींना प्रत्येकी पंचाहत्तर हजार रुपये देऊन अशोक सराफ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. 'ग्रंथाली'च्या वतीने कलावंताना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. 'प्रत्येक क्षेत्रात मेहनत करावीच लागते, कलाक्षेत्रात फार कमी लोकांना यश मिळतं. गुण असतात, मेहनत असते, पण संधी मिळतेच असं नाही. अर्थात त्यात योगायोग हा भागही असतोच. हे सगळं जाणतो तो संवेदनशील असतो. सराफ कुटुंबीयही तसंच संवेदनशील आहे. सगळं काही सरकार करेल असं वाटण्यापेक्षा आपल्याला काय करता येईल असा विचार करतात त्यांच्याकडून असं काम होतं', असे गौरवोद्गार या सोहळ्याबाबत बोलताना सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर यांनी काढले, ते सार्थ होते.

या महिन्यात गंगाधर गाडगीळ यांची जन्मशताब्दी आहे. कथा, कादंबरी, वैचारिक लेखन याला वेगळे परिमाण देण्याचे काम गाडगीळ यांनी केले. त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयी चांगदेव काळे यांनी या अंकात लिहिले आहे.

विदुषी मंगला नारळीकर आणि अभिनेते रवींद्र महाजनी यांचे नुकतेच निधन झाले. मंगला नारळीकर यांच्या नणंद सुधा हुजूरबाजार-तुंबे यांनी आपल्या वहिनीच्या कौटुंबिक ऋणानुबंधाबरोबर त्यांच्या कार्याबद्दल आठवणी जागवल्या आहेत. अभिनेत्री उषा नाईक व आशा काळे यांनी रवींद्र महाजनी यांच्या नायिका म्हणून अनुभव सांगताना महाजनी यांच्यातील माणूसपण मांडले आहे. पूजा सामंत यांनी त्यांचे शब्दांकन केले आहे.

अभिनेते जयंत सावरकर, लेखक-पत्रकार शिरीष कणेकर आणि निसर्गकवी ना.धों. महानोर यांचे जाणेही क्लेशकारक आहे.

काळ बदलतोय. तसे जगण्यात विविध आयाम येत आहेत. तंत्रज्ञानाने अनेक क्षेत्रांत झपाट्याने प्रगती होत आहे. इलेक्ट्रिक मोटारी वाहनउद्योगाला नवे परिमाण देणार आहेत. त्याबाबत प्रज्ञा काशीकर यांचा लेख माहिती देतो.

ब्युनोस आयर्स येथील पुस्तकांच्या दुनियेबाबत नंदन जोशी यांचा लेख उद्बोधक आहे.

मार्च महिन्याच्या अंकापासून अमेरिकेतून विनता कुलकर्णी तिथल्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाबद्दल उत्तम लेख लिहीत होत्या. दुर्दैवाने त्यांचे जुलै महिन्यात निधन झाले. या अंकातला त्यांचा 'अमेरिकेतील कचराव्यवस्थापना'बद्दलचा लेख अखेरचा ठरावा, हे दुःखदायक आहे.

निवृत्त दूरदर्शन निर्माता जयू भाटकर यांनी 'वैष्णो व्हिजन' या त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून 'भेट दिग्गजांची' हा उपक्रम सुरू केला आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, समाजाला काही देणाऱ्या नामवंत व्यक्तींशी संवाद त्याद्वारे साधण्यात येणार आहे. या उपक्रमास 'ग्रंथाली'चे सहकार्य आहे. त्याच्या आरंभाच्या कार्यक्रमात पद्मविभूषण, अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची प्रकट मुलाखत मनाली दीक्षित यांनी घेतली. त्याचा वृत्तांत अंकात आहे.

शरद काळे, राजीव श्रीखंडे, संजीवनी खेर, किरण येले यांनी सदरे व डॉ. निर्मोही फडके आणि चांगदेव काळे यांची पुस्तकओळख करून देणारी ग्रंथपाने आहेतच.

granthali watch आणि granthali pratibhangan या यूट्यूब चॅनेलवर 'ग्रंथाली'चे विविध विषयांवर माहितीपूर्ण आणि आवर्जून पाहावेत असे उपक्रम सुरू आहेत. आपण ते सबस्क्राइब केले नसतील तर जरूर करावेत.

**– अरुण जोशी**



सुधा हुजूरबाजार तुंबे

# माझी मंगलावहिनी...

**मंगला** राजवाडे ही माझ्या वडिलांची म्हणजेच सुप्रसिद्ध गणितज्ञ प्रा. मो.शं. हुजूरबाजार यांची आवडती विद्यार्थिनी होती. बुद्धिमान, सुसंस्कृत, सुस्वभावी आणि मुख्य म्हणजे माझ्या वडिलांनी आव्हान म्हणून दिलेली गणितं सहजतेनं सोडवणारी मंगला त्यांना आपल्या भाच्यासाठी म्हणजेच डॉ.जयंत नारळीकरांसाठी अनुरूप वाटली.जोडी एकमेकांना पूरक आहे असं आपल्या बहिणीला त्यांनी सुचवलं आणि मंगला राजवाडे मंगलावहिनी म्हणून माझ्या जीवनात आली.

लग्न झाल्यावर ती जयंतदादाबरोबर इंग्लंडला गेली. कधीही भारतात आली तरी आमच्या हाजीअलीच्या घरी हक्कानं येत असे. तिचे आवडते हुजूरबाजारसर आता हक्काचे 'मोरूमामा' झाले होते नं!

माझी ताईआत्या सुमतीबाई नारळीकर ह्या तेव्हाच्या काळातली संस्कृत विषयात एम.ए.केलेली विदुषि होती. माझे वडील आणि माझी आत्या एकमेकांशी संस्कृत भाषेत पत्रव्यवहार करत असं आजही आमचे नातेवाईक आदरानं सांगतात.

माझी ताईआत्या मितभाषी आणि जात्याच शिस्तबद्ध होती. स्वच्छतेची पाईक होती. तिच्या साडीचा पदर कायम सुंदरशा मोराच्या साडीपिननं व्यवस्थित टाचलेला असे. केसांचा घट्ट अंबाडा आणि चालण्यात एक रुबाब, असं तिचं लक्षात राहण्यासारखं व्यक्तिमत्त्व होतं.

आपल्या कडक शिस्तीच्या सासूबाईंना मंगलावहिनीनं आपलंसं करून घेतलं होतं आणि म्हणून तिचं कौतुक आमच्या घरात भरभरून होत होतं...

'ताईंच्या बरोबर आनंदाने रहातेय ती म्हणजे मंगलला विशेष सर्टिफिकेटच द्यायला हवं,' असं काहीसं आमच्या घरात बोललेलं आठवतंय.

ताईआत्याचे पती म्हणजे आमचे 'नारळीकरकाका' राजस्थान पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन होते पुढे विविध मोठ्या शैक्षणिक अधिकाराच्या जागांवर त्यांनी काम केलं होतं. खरं तर केंब्रिजचे रँग्लर होते नारळीकरकाका, पण मला ते कधीही जाणवलं नाही.

जसजशी मोठी होत गेले तसतसं नारळीकर परिवारातील प्रत्येक सदस्य किती सुप्रसिद्ध आहे हे समजत गेलं. माझ्या समोर आधी माझी आत्या सुमतीबाई नारळीकर आणि नंतर मंगलावहिनी अशा दोन विदुषी आदर्श म्हणून आल्या...

मंगलावहिनी आपली गणिती करिअर थोडी बाजूला सारून संसारात रममाण झाली. नवरा, मुली, सासू-सासरे, आलेलेगेलेले असा आनंदी संसार चालू होता.

नारळीकर कुटुंबीयांना भेटणं हे 'काव्यशास्त्रविनोदेन' ह्या सदरात मोडणारं असल्यामुळे मला नेहमी हवेहवेसे वाटणारे अनुभव होते.

आजही डोळ्यांसमोर येतं ते त्यांच्या घरातून समोर दिसणारा अथांग अरबी समुद्र आणि घरातल्या व्यक्तींची अथांग विद्वत्ता, मनाचा मोठेपणा, निगर्वी स्वभाव, हसतमुखानं होणारं आदरातिथ्य आणि बारीकसारीक गोष्टींचं होणारं कौतुक!

नकळत मी खूप काही अनुभवानं शिकत गेले पण एक नक्की कळलं की कितीही उच्चशिक्षित असलं तरी घर-संसाराला महत्त्व देऊन एक सुगृहिणी होणं हे केवळ माझी मंगलावहिनीचं करू जाणे...

नंतर त्यांची पुण्याला बदली झाली. माझंही लग्न होऊन मी माझ्या बँकेच्या नोकरीला रामराम ठोकला आणि घर-संसार असा जीवनक्रम सुरू केला.

मंगलावहिनीचा आदर्श समोर असल्यामुळे नोकरी सोडून घरी बसणं तितकंसं जड गेलं नाही.तिच्यासारखं घरबसल्या गणित सोपं करून शिकवायला सुरुवात केली. अर्थात तिचं घरबसल्या गणित शिकवणं हे घरातल्या जबाबदाऱ्या सांभाळत पुणे विद्यापीठात तसेच विविध उच्च तसेच निम्नस्तरावर शिकवणं एवढं उच्च होतं. तिथपर्यंत पोहोचणं मला शक्य नव्हतं. तरी

गणिताची आवड निर्माण करण्यात मी माझा थोडासा खारीचा वाटा उचलला होता.

दिवस भराभर पुढं पळत होते. आधीची पिढी जाऊन पुढची पिढी तेवढ्याच तत्परतेनं जबाबदार होत होती.

मंगलावहिनी आता जयंतदादाची आणि तीन मुलींची तसेच घरची जबाबदारी सांभाळत आपली डॉक्टरेटही पदवी मिळवलेली माझी आदर्श होती.




त्या सगळ्यात भरीला भर म्हणून मधल्या काळातला मंगलावहिनीचा कर्करोग आणि त्यावर सकारात्मकतेनं केलेली मात हे माझ्या आदर्श अनुभवांच्या कप्प्यात नोंदलं गेलं होतं...

जीवनातल्या अडचणी ह्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघणं आणि त्यावर मार्ग काढणं हे मी मंगलावहिनीकडून शिकले आहे.

दुःखाच्या मुळाशी जाऊन त्याला उपटून टाकणं आणि आपल्या आजूबाजूला आनंदमयी वातावरण निर्माण करणं हाही माझ्या मंगलावहिनीच्या स्वभावाचा पैलू होता.

गणित हा विषय किचकट नसून सोप्या पद्धतीनं गमती-जमती करत शिकण्यासारखा आहे असं तिचं मत होतं. नंबर थेअरी हा तिचा आवडता विषय होता. शून्य ते नऊ असे आकडे आणि चार प्रमुख गणिती क्रिया हाच गणिताचा मूलभूत पाया आहे, असं ती नेहमी म्हणत असे. पंधरापर्यंतचे पाढे सरावात असले तर गणित पटकन सुटतं. त्यामुळे रोजच्या दिनचर्येत केवळ पाच मिनिटं सरावासाठी दिलीत तर भविष्यात खूप फायदा होईल, असं ती वारंवार सांगत असे.

'गणित ठरावीक पद्धतीनंच केलं पाहिजे असा आग्रह न धरता एखाद्या विद्यार्थ्यानं वेगळी पद्धत वापरली असेल तर त्याचे मार्क न कापता त्याला त्याबाबत स्पष्टीकरण विचारा' असा तिचा गणित शिक्षकांसाठी आग्रह असे.

'शाळकरी विद्यार्थी घरी पालकांना मदत करताना गणित हा विषय त्यांच्या रोजच्या जीवनात वापरतात तेव्हा त्यांना त्याची भीती वाटत नाही. किंबहुना सहजपणे तोंडी हिशोब करणं, घड्याळाकडे बघून अचूक वेळ सांगणं तसंच दुकानातून वस्तू आणताना वजनाचा मेळ जर सहजपणे जमतो, तर मग अभ्यासात गणिताची भीती का वाटते? ह्याला कारण आहे ती गणित शिकवण्याची चाकोरीबद्ध पद्धत! जरा वेगळ्या पद्धतीनं चित्रांच्या माध्यमातून तसंच गोष्टीतून गणित शिकवलं तर मुलांना गणिताची भीती उरणार नाही आणि गणिताशी दोस्ती होईल.' हेच ठाम विचार तिनं कायम ठेवले होते.

मध्यंतरी तिच्या आकडे मोजणीच्या नवीन उपक्रमाची चर्चा सर्वत्र झाली. तिच्या 'अकराऐवजी दहा एक' असं इतर भाषांप्रमाणे मराठीत का असू नये, असा तिचा प्रश्न गणिती कुटुंबीयांना पटणारा होता. संस्कृतमध्येदेखील एकादश, द्वादश असं दहा हे परिमाण घेऊन मोजणी होते तर मग मराठीत आपण का नाही करू शकतं, असे प्रश्न ती कायम विचारत असे.

मुंबई विद्यापीठात गणित विषयात एम.ए. करून कुलगुरूंचं सुवर्णपदक विजेत्या मंगलावहिनीनं आपलं जीवन गणिताच्या प्रसारासाठी वाहिलं होतं. तिनं लिहिलेलं 'दोस्ती गणिताशी' त्याचं सक्रिय उदाहरण आहे.

'गणिताच्या पायाभरणीसाठी अत्यंत उपयुक्त' असं मुखपृष्ठावर लिहिलं आहे ते अगदी योग्य आहे. पाचवी ते सातवी हा भावी आयुष्यातील गणिताचा पाया आहे. तेव्हा गणिताच्या इमारतीचा पाया भक्कम करण्यासाठी असलेलं हे पुस्तक आहे. सोपं सरळ सहजतेनं समजेल असं हे गणितातील गमतीजमती सांगतं.

मंगलावहिनीची गणितविषयावरची व्याख्यानंही रोचक असत. ती साध्या, समजेल अशा भाषेत बोलत असे. तिच्या बुद्धिमत्तेचं तेज तिच्या साध्या राहणीमुळे जास्त झळाळून येत असे. वर्तमानपत्रातील लेख वाचनीय असत. अंधश्रद्धा न मानता तर्कशुद्ध निष्कर्षांवर आधारीत तिचे विचार मला पटत असत.

२०२१ च्या डिसेंबर महिन्यात तिनं आपुलकीनं मला जयंतदादाची बहीण ह्या सन्मानानं त्याला राज्यपालांच्या हस्ते मिळणार असलेला 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार घ्यायला जायची विनंती केली होती.

मी महाराष्ट्रातील मान्यवरांच्या समोर व्यासपीठावर तो पुरस्कार घेताना 'औटघटकेचं राज्य' काय असतं ते अनुभवलं होतं. जयंतदादा आज जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आहे आणि महाराष्ट्राचं तसंच भारताचं भूषण आहे.त्याची लोकप्रियता पिढ्यान् पिढ्या अबाधित असेल. हे त्या दिवशी प्रत्यक्ष जाणवलं. त्याची बहीण म्हणून मला आमंत्रण मिळालं होतं आणि हा माझ्या मंगलावहिनीनं मला 'नणंद' म्हणून दिलेला मान होता. मी आयुष्याभर तिची ऋणी आहे...

ते मानचिन्ह आणि मानपत्र घेऊन आम्ही उभयता म्हणजे मी आणि माझे पती वासुदेव त्यांच्या पुण्याच्या घरी गेलो असता हक्कानं राहिलो होतो.

संध्याकाळपासून जयंतदादा, मंगलावहिनी आणि आम्ही दोघं अशा गप्पा रंगल्या होत्या...

वासुदेवांबरोबर क्रिकेटच्या गप्पा आणि माझ्याबरोबर माझ्या कोरियातल्या अनुभवांवर गप्पा असा वेळ मजेत गेला.

आम्ही कित्येकदा आग्रह करूनही नारळीकर दांपत्याला कोरियाभेटीचा योग आला नव्हता. तेव्हा 'सुधा, आता



कोरियातल्या अनुभवांवर आधारित एक पुस्तक लिही. अजूनतरी मराठी भाषेत असं पुस्तक माझ्या वाचनात आलेलं नाही. आम्ही कोरियात प्रत्यक्ष आलो नाही पण तुझ्या पुस्तकातून कोरियादर्शन होईल आम्हाला... सुप्रसिद्ध लेखिका असलेल्या मंगलावहिनीचा, माझ्यासारख्या लेखनाचा अनुभव नसलेल्या, नणंदेवर असलेला विश्वास त्या दिवशी दिसला.

'पुस्तक लिहिलं तर वाचून प्रस्तावना लिहिशील का?' असं मी तेवढ्याच हक्कानं विचारलं. उत्तर अर्थातच सकारात्मक होतं.

प्रकृतिअस्वस्थामुळं माझ्या पुस्तक प्रकाशनाला गेल्या डिसेंबर, २०२२ ला नारळीकर दांपत्य उपस्थित राहू शकलं नाही म्हणून आम्ही त्यांच्या घरी पुण्याला जाऊन पुस्तक भेट दिलं. आशीर्वाद घेतले...

पुस्तकावरची माझी कोरियन भाषेतली सही आणि जयंत-मंगला ही नावंदेखील कोरियन भाषेत बघून माझ्या पाठीवर मंगलावहिनीनं शाबासकी दिली.

पुस्तक उघडून आपण सुचवलेल्या सूचना पाळल्या आहेत नं, हे काटेकोरपणे बघत ती कौतुकानं माझ्याकडं बघत म्हणाली की 'आता असंच मराठी लिखाण करून लोकांपर्यंत आपले अनुभव पोहोचवत जा.'

हे तिचे शेवटचे उद्‌गार मराठी भाषेवरच्या प्रेमाची ग्वाही देणारे आहेत.

मी पुस्तकाचं प्रमोशन, माझं इतर लेखन आणि विदेशपर्यटन अशी बिझी होते.

मंगलावहिनीनं तिच्या कर्करोगाबद्दल लिहिलेला पेपरातला अनुभवलेख वाचून मी तिचं व्हॉट्सॲप मेसेजवर अभिनंदन केलं होतं. नंतर तिच्या ऐंशीव्या वाढदिवसाला १७ मे रोजी पुन्हा मी परदेशी असल्यामुळे केवळ मेसेज केला होता. नंतर तिच्या पुन्हा बळावलेल्या आजाराची बातमी माझ्या डॉक्टर चुलतभावाकडून समजली होती.

आम्ही 'मुंबईत परतल्यावर भेटायला जाऊया' असा विचार करत होतो तोच...

१७ जुलै, २०२३...

सकाळी वसुधाचा माझ्या आतेबहिणींचा फोन आला. पण ती इतक्या लवकर मला सोडून जाईल असं कधीच वाटलं नव्हतं. तशी तयारीच नव्हती माझ्या मनाची... मला तिला भेटून गप्पा मारायच्या अजून बाकी होतं... कोरियातल्या नुकत्याच मला पुन्हा तीन वर्षांनी भेटलेल्या आणि वहिनीला पुस्तकामुळे ओळखीच्या झालेल्या मैत्रीणींबद्दल भरभरून सांगायच होतं... तिच्या हातचा खजूर-आक्रोड घालून केलेला माझा आवडता केक खायचा होता... पण...

मन विषण्ण झालं आणि मंगलावहिनीचा हसतमुख, बोलताना बदलणारे भाव दर्शवणारा, पारदर्शक चेहरा डोळ्यांसमोर आला...

माझा आदर्श असलेली माझी मंगलावहिनी...

मला दोन्ही हातांनी शाबासकी देणारी आणि कौतुकानं 'माझी छोटी नणंद' असं संबोधणारी माझी वहिनी...

नेहमी आपलेपणानं वागणारी... आपल्या दुःखांचा थांगपत्ता न लागून देता दुसऱ्यांना सकारात्मकता दाखवणारी...

वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून प्रत्येक गोष्टीचा कस लावणारी... गणितासारखा क्लिष्ट विषय सोपा करून अगदी तळागाळापर्यंत जाऊन शिकवणारी...आपल्या उच्चशिक्षणाचा यत्किंचितही गर्व नसलेली...

स्वयंपाकघरात स्वतःच्या हातानं चविष्टपदार्थ बनवताना सहजपणे आपल्या शिवणकामाची किंवा बेकिंगच्या नवीन उपक्रमाची माहिती देणारी...

घरातल्या ओल्या कचऱ्यातून निरोगी बगीचा तयार करून झाडांवर अतोनात प्रेम करणारी...

आपल्या तीनही मुलींना सर्वतोपरीनं घडवणारी आणि पतीच्या पाठी सावलीसारखी गेल्या पाच दशकांहूनही अधिक उभी असलेली सर्वगुणरूपविद्यासंपन्न अशी एक आदर्श भारतीय स्त्री!

असं म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते...

मंगलावहिनी,

आज मी अभिमानानं सांगेन की यशस्वी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ, पद्मअवार्ड विजेते, भारत तसंच महाराष्ट्रभूषण डॉ. जयंत नारळीकरांच्या मागे राहून प्रोत्साहन देणारी आणि सर्वतोपरी पूरक असलेली ती स्त्री आहे माझी मंगलावहिनी!

भावपूर्ण श्रद्धांजली.

**– सुधा तुंबे**

sudha.tumbe@gmail.com



उषा नाईक

# मोकळ्या मनाचा नायक

**रवींद्र** महाजनी! आमच्यासाठी तो फक्त रवि होता. मी, रवी, रमेश भाटकर, अशोक सराफ, रंजना, मोहन गोखले अशांचा एक छानसा ग्रुप होता. आमच्यात कधीही हेवेदावे-ईर्ष्या, मत्सर, शत्रुत्व नव्हतं. आपसात आम्ही चेष्टा-मस्करी करत असू, सेटवर ब्रेकमध्ये गप्पा होत. एकूण माहोल खूप चांगला असायचा. एकमेकांबद्दल आदराची भावना असायची. मला आठवतंय, एखाद्या मराठी ॲक्टरचे फिल्मचे शूटिंग पूर्ण झाले की बहुधा तो त्या संध्याकाळी एक छोटीमोठी पार्टी आयोजित करत असे. एक सिनेमा पूर्ण होत असतांना सगळे कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, बॅक स्टेज आर्टिस्ट एकत्र असतात, गुण्यागोविंदाने काम करतात, पण चित्रपट पूर्ण झाला की सगळे एकमेकांपासून विखुरले जातात. पुन्हा एकमेकांच्या संपर्कात राहू, तुमच्यासोबत काम करणे आवडले अशी कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी अशी पार्टी द्यायची पद्धत होती. त्या फिल्मच्या कलाकारांखेरीज अन्य मित्र जे इतर ठिकाणी शूटिंग करत असतील त्यांनाही आवर्जून या पार्टीत सामील होण्यासाठी बोलावलं जाई. आणि रवी अशा निकोप मनाचा होता. तो पार्टीत सामील होई, आणि आपल्या इतर सहकाऱ्यांनाही बोलावून घेई. मी रवीसोबत काम करणं एन्जॉय केलं. त्याची स्त्री कलाकारांशी वागणूक आदराची-सौजन्याची असे त्यामुळे खूप सुरक्षित, आश्वासक साथ वाटे मला त्याची.

रवीची कारकीर्द किमान १५ वर्षांची होती. या दरम्यान तो मराठीत शिखरावरचा हीरो होता. रवीची कारकीर्द यापेक्षाही पुढे गेली असती, पण त्याने आपणहून त्याचे चित्रपट कमी केले, आणि तो कंस्ट्रक्शन व्यवसायात गेला. हा व्यवसाय त्याला फळला नाही, त्याचे खूप आर्थिक नुकसान झाले. मग हळूहळू तो अभिनयक्षेत्रापासून दूर होत गेला! आवडत्या अभिनयापासून दूर होणे हेदेखील त्याच्या एकटेपणाचे, डिप्रेशनचे कारण असू शकेल!

त्याच्या देखणेपणाबद्दल वेगळे काही सांगायला नकोच. पण त्याच्या व्यक्तिमत्त्वात एक खानदानी अदब होती, शिष्टाचार होता. आमच्या जोडीने १०-१२ एकत्र आणि हिट सिनेमे दिलेत. आमचा अतिशय गाजलेला चित्रपट म्हणजे 'हळदीकुंकू'. या सिनेमात रंजनाही होती. आमच्या दोघांचा सुपरहिट सिनेमे म्हणजे 'राखणदार'. 'दुनिया करी सलाम', 'देवता'. हे सगळे चित्रपट १५-२० आठवडे सलग बॉक्स ऑफिसवर चाललेत.

रवीच्या अचानक एक्झिटने डोके बधिर झाले. आज तो जाऊन एक आठवडा झाला तरी मन शांत होत नाही. आम्ही कलाकार काय किंवा सामान्य माणसे काय, जन्माला आलेला प्रत्येक जण एक दिवस इहलोकी जाणारच. पण अतोनात दुःख झालं ते ज्या एकाकी स्थितीत रवीला मरण आले! लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य करणारा, अनेक सुपर हिट मराठी चित्रपट केलेला, मराठी सिनेमांचा हा सर्वात देखणा हीरो, त्याला असे एकाकी मरण यावं यापेक्षा मोठा दैवदुर्विलास तो कोणता? १९७५ मध्ये किरण शांताराम दिग्दर्शित झुंज या मराठी सिनेमापासून त्याने आपली कारकीर्द सुरू केली, पण या संधीसाठी त्याने मोठा संघर्ष केला होता. सूर्यकांत, चंद्रकांत, अरुण सरनाईक हे नट देखणे असले तरी त्यांच्या वाट्याला चाकोरीबद्ध ग्रामीण सिनेमा आला. रवीने केलेले सगळेच मराठी चित्रपट कात टाकलेले होते. ग्रामीण ते शहरी हा बदल रविंद्र महाजनी अभिनित सिनेमांतून जाणवू लागला. रवीचे व्यक्तिमत्त्व असे होते की तो शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही बाजाच्या सिनेमांतून बेमालूमपणे शोभून दिसायचा. इतका देखणा, पीळदार शरीराचा, प्रसन्न हास्याचा, मनमोकळ्या मनाचा नायक दुसरा कुणी मराठीत झाला नाही.

मला वाटते आमच्या 'राखणदार' फिल्मचे शूटिंग चालू होते. मी, रवी, निळू फुले सेटवर होतो. त्या दिवशी सेटवर काही फिल्म पत्रकार येणार होते. मी आणि रवीमध्ये काही रोमँटिक सीन चालू होते, रोमँटिक सीनमध्ये दोघही इन्व्हॉल्व



ते खऱ्या अर्थाने एक जिंदादिल व्यक्तिमत्त्व होते. त्याची आयुष्यभर क्षणोक्षणी आठवण येणारच. तो कधी कुणाला विनाकारण त्रास देणारा नव्हता. हल्लीच्या भाषेत ज्याला पंगा घेणे म्हणतात तसा तो अजिबातच नव्हता! तो बरा की त्याचे काम बरे, असा त्याचा स्वभाव होता. कुणावर रागावत नसे. खूप सज्जन होता स्वभावाने. एकदा गष्मीर एक मराठी चित्रपट करत होता, या चित्रपटात मी त्याच्या आईची भूमिका साकारत होते. रवी या घडामोडीमुळे अतिशय सद्‌गतीत झाला. सेटवर तो अतिशय भारावून गेला होता. त्याची नायिका म्हणजे मी, आता त्याच्या लेकाच्या आईच्या भूमिकेत असल्याने तो खूप आनंदित झाला होता. त्याच्या चेहऱ्यावर हा आनंद लपत नव्हता.

अलीकडे काही वर्षांपूर्वी रवीशी अचानक भेट झाली, पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात. त्याला सडकून भूक लागली होती आणि बालगंधर्वमध्ये तो काही खाण्यासाठी शोधत होता. योगायोगानाने आमची भेट झाली. त्याला खूप आनंद झाला. त्यानंतर आम्ही भेटलो नाही. आता असे वाटते, एकदा ठरवून भेटलो असतो तर तो असा अचानक जाण्यापूर्वी भेटलो तरी असतो. पण त्याच्याच चित्रपटातील गीत– 'खेळ कुणाला दैवाचा कळला!' आमची भेट झाली झाली नाही आणि आता तो अचानक गेल्याची दुर्दैवी बातमी कळली.

रवीचे सगळ्यांसोबत संबंध उत्तम होते. एकदा ऐकले त्याने एक टीव्ही सीरियल सोडली. त्या सेटवर त्याला वागणूक चांगली मिळाली नाही! ज्येष्ठ कलाकारांना त्यांचा योग्य तो मान मिळालाच पाहिजे नाही तर ते दुखावतील. त्यांना वैफल्य, नैराश्य येईल. अर्थात ही टीव्ही मालिका त्याने सोडली.

रवीसारख्या माणुसकी असलेल्या अभिनेत्यासोबत असा दुर्दैवी मृत्यू घडावा यापेक्षा मोठे दुदैव कोणते? एका ज्येष्ठ नागरिक आणि उत्तम अभिनेता असलेल्या रवींद्र महाजनीला वेळीच उपचार मिळाले असते तर ही दुर्दैवी परिस्थिती उद्‌भवली नसती! रवीच्या अंत्यसंस्काराला मराठी इंडस्ट्रीतले फारसे लोक उपस्थित नव्हते. मुंबई चित्रपट महामंडळाने म्हटले, पुण्याचे महामंडळ सदस्य जातील. परंतु प्रत्यक्षात कुणीही गेले नाही! मनोरंजन इंडस्ट्रीतले अनेक कलाकार असे एकाकी गेलेत! हे कधी थांबणार? फार क्लेश होतात आत्म्याला!

झालो होतो. काही पत्रकारांनी प्रणयप्रसंग पाहून खोचक प्रश्न विचारायला सुरुवात केली. मी साफ गडबडले, त्यांना काय उत्तर द्यावे हे मला समजेना. तत्क्षणी रवीने मला सांभाळून घेतले. तो पत्रकारांना म्हणाला, दृश्य दुःखाचे असो वा सुखाचे ते वास्तविक वठले पाहिजे, कलाकारांना उत्तम अभिनय येतो किंवा नाही हे त्यांच्या परफॉर्मन्सवरून दिसून येते. आमच्या प्रणयप्रसांगात जर रियालिटी वाटत असली तर तो आमचा उत्तम 'शॉट' होता असे समजा. त्यातून वेगळे अर्थ काढू नका. रवीने पत्रकारांची तोंडे माझ्यावतीने बंद केली. सगळ्यांना समजून घेणारा तो एक सच्चा कलावंत होता. आमच्या फिल्ममध्ये त्याने गाणी म्हणायची आणि मी डान्स करायचा हे ठरून गेले होते. डान्समध्ये तो कम्फर्टेबल नसे. त्यामुळे मी डान्स करतेय, त्याच्या वाट्याला डान्स नाही हे पाहून तो सुखावून जात असे

'हळदीकुंकू' चित्रपटात त्याला सतार वाजवत गाणे म्हणायचे होते, पण सतार वाजवताना शॉट रियल वाटला पाहिजे म्हणून त्याने सतार वाजवण्याचे १५ दिवस ट्रेनिंग घेतले. ट्रेनिंगनंतरही तो एकटाच सतार वाजवत बसे. कामाविषयी त्याची निष्ठा खूप वाखाणण्यासारखी होती. चांगली प्रॅक्टिस झाल्यावर मगच त्याने शॉट दिला.

आमच्या लव्ह सीनमध्ये माझ्या अंगावर कपडे कमी असल्यास, शॉट कट झाला की रवी सर्वप्रथम माझ्या अंगावर टॉवेल घालत असे. आपल्या नायिकांबाबत तो अतिशय प्रोटेक्टिव्ह असे. एकांतात त्याने कधीही कुठल्याही नायिकेचा गैरफायदा घेतला नाही. अतिशय सालस, सभ्य नट होता रवी.

**शब्दांकन – पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com



आशा काळे

# दैवाचा अनाकलनीय खेळ

**मराठी** चित्रपटसृष्टीतील स्टार अभिनेता -रवींद्र महाजनी यांचे १५ जुलै २०२३ रोजी पुण्यातील त्यांच्या राहत्या घरी एकाकी दुःखद निधन झाले!

रवींद्र महाजनी.. माझा ऑन स्क्रीन नायक! आम्ही किमान दहा-बारा सिनेमे तरी एकत्र केलेत. त्याचा स्वभाव अतिशय साधा-निगर्वी होता त्यामुळे त्याला फार क्वचित कुणी 'अहो-जाहो' म्हटलं असेल..सगळ्यांसाठी तो रवीच होता. रवी पदवीधर होता, त्याचे वडील ह. रा. महाजनी हे 'लोकसत्ता' दैनिकाचे माजी संपादक. घरातील वातावरण सुशिक्षित असल्याने स्वाभाविकपणे रवीची जडणघडणही सुसंस्कृत व्यक्ती म्हणूनच झाली. इतक्या वर्षांच्या ऑन सेट भेटींमध्ये मी रवीला कधीही उदास, नाराज, कुणावर रागावलेला पाहिला नाही.. मग शिव्या देणं तर फार लांबची गोष्ट! सेटवर इतका मिळूनमिसळून वागणारा, सगळ्यांशी आदरानं वागणारा रवी कमालीचा संयमी-हसतमुख आणि सौजन्याने वागणारा होता. प्रत्येक कलाकाराशी समजूनउमजून वागणारा होता..इतक्या वर्षात अनेकांना सेटवर आरडाओरडा करत आपलं वर्चस्व, आपला धाक दाखवत वावरताना पाहिलंय, या पार्श्वभूमीवर रवी मात्र आपल्या ऑन स्क्रीन नायिकांना कमालीच्या आदरानं वागवत असे, रवी त्याच्या व्यक्तिगत आयुष्यात असाच असावा याबद्दल त्याच्या कुठल्याही कलाकारांचे दुमत नाही! म्हणूनच त्याची अशा एकाकी पद्धतीनं एक्झिट अतिशय सुन्न करणारी आहे! हा दुर्दैवी प्रसंग विसरू म्हटलं तरी विसरता येण्यासारखा नाही!

प्रख्यात लेखक श्री. म. माटे यांनी लिहिलेल्या एका कथेवर भालजी पेंढारकरांनाही चित्रपट काढावा असं वाटलं, पण कालौघात हा विचार मागे पडला. 'माणुसकीचा गहिवर' ही ती मूळ कथा. मग हा विचार मागे पडला. 'शंभू शिखरीचा राजा' ही कथादेखील भालजींना आवडली पण या ना त्या कारणानं हे राहूनच गेलं.. त्या काळात अण्णासाहेब देऊळगावकर हे नवीन निर्माता होते; त्यांना 'शंभू शिखरीचा राजा' या कथेत खूप रस निर्माण झाला आणि याच कथेवर मग त्यांनी 'सतीची पुण्याई' हा चित्रपट निर्माण केला. रवी नायक तर मी नायिका होते. अन्य प्रमुख कलाकारांमध्ये सुलोचनादीदी, चंद्रकांत होते. नायिका म्हणजे मी शंभू महादेवाची भक्त असते. कथेतल्या एका सीनप्रमाणे माझे आणि नायक रवींद्र महाजनांची याचे लग्न दाखवताना दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी यांनी अगदी खऱ्याखुऱ्या लग्नाप्रमाणे आमचे (खोटे) लग्न लावले. आमच्या वाजतगाजत झालेल्या या लग्नात आमची वऱ्हाडी मंडळी होती, रवीची खरी अर्धांगिनी मधू महाजनी, माझी मेकअप आर्टिस्ट-हेयर ड्रेसर, गावातले काही गावकरी असा लवाजमा उपस्थित होता. महादेवाचं मंदिर असलेल्या शंभू शिखरी गावाच्या पायथ्याशी याचं शूटिंग झालं. मी नऊवारीत होते, रवीनं धोतर नेसलं होतं, मंगलाष्टकं सुरू झाली, अंतरपाट दूर झाला, मी रवीच्या गळ्यात वरमाला घातली, त्यानं माझ्या गळ्यात हार घातला, दिग्दर्शक धर्माधिकारी यांनी रवीला सांगितलं, वधूचा हात धरून ज्येष्ठांच्या पाया पडताय असा शॉट घ्यायचाय. रवीनं माझा हात धरला तेव्हा तो चेष्टेनं म्हणाला, आशा, आपलं लग्न तर झालं, चल मग मधुचंद्राला निघू! आम्ही खळखळून हसलो. मी रवीला घेऊन त्याची पत्नी मधू बसली होती तिथे घेऊन गेले आणि म्हटलं, 'ही बघ तुझी मधू.. माझा त्यानं धरलेला हात मी मधुच्या हातात दिला, आता निघा मधुचंद्राला!' पुन्हा आम्ही तिघंही खूप हसलो! तर असा रवी, त्याच्यासोबत असं खेळीमेळीच्या वातावरणात शूटिंग होत असे. या चित्रपटानं ७७ आठवडे बिझनेस केला.

'देवता' हा आमचा असाच एक गाजलेला चित्रपटकथेचा नायक रवींद्र महाजनी याच्या बहिणीवर डाकू अत्याचार करतात. नायकाची ही बहीण भावाला मरण्यापूर्वी डाकूंवर सूड उगव अशी चिठ्ठी लिहून ठेवते! नायक पोलीस स्टेशनला जातो, पण त्याची तक्रार नोंदवली जात नाही, सुसंस्कृत नायक स्वतः दरोडेखोर बनतो. आपली नैतिक मूल्यं घालवून बसलेला



नायक नंतर एका खानदानी युवतीला म्हणजे नायिकेला, मला पळवून नेतो. त्यामागे कारण माझं शील लुटणं नव्हं तर माझ्या गळ्यातील हिऱ्यांचा हार घेणे हा त्याचा हेतू असतो. मुलीचा पिता नायकाच्या हाती लेकीच्या गळ्यातील हिऱ्यांचा हार देत नाही, तेव्हा नायिका दुखावते, लेकीच्या जीवापेक्षा हिरे महत्त्वाचे नसावेत पित्याला, अशी नायिकेची भावना होते आणि नायिका दरोडेखोराला आपला पती मानते, त्याच्याशी लग्न करते! साध्वी पत्नी जीवनात आल्यावर नायकाचं जीवन बदलतं.. तो पहिल्यासारखा सुसंस्कृत होतो आणि पुढे शहराचा तो महापौर बनतो! देवता या चित्रपटाच्या शीर्षकाला अनुसरूनच रवी होता...अगदी थेट देवता! आमच्या याही सिनेमाला घवघवीत यश लाभलं... मला तर नेहमी वाटतं 'देवता' या शीर्षकाशी रवी खूप रिलेट करत होता..

आमचे 'थोरली जाऊ', 'चांदणे शिंपित जाशी', 'अर्धांगी' असे अनेक चित्रपट खूप चालले बॉक्स ऑफिसवर. मी आणि रवी, रवी आणि रंजना, रवी आणि उषा नाईक-उषा चव्हाण अशा नायिकांशी त्याची ऑन स्क्रीन जोडी आणि गट्टी जमली. आपल्या व्यक्तिरेखांमध्ये तो सहज परकायाप्रवेश करत ते पण प्रसंग रोमँटिक सीन असो, मधुचंद्राचा असो रवीनं त्याची लक्ष्मणरेषा चांगलीच पाळली. म्हणूनच त्यांच्यासमवेत काम केलेल्या सगळ्या अभिनेत्रींची हीच भावना आहे- रवीचे देखणेपण त्याच्या चेहऱ्यातच नव्हे तर संपूर्ण स्वभावात, व्यक्तिमत्त्वात उतरलं होतं!

मृत्यूचे चक्र आजवर कुणालाही चुकलेले नाही! रवीच्या निधनाचे दुःख आहेच, पण ज्या पद्धतीनं त्याला क्रूर मृत्यू आला तसा यायला नको होता! देखण्या नायकाला, देवता माणसाला मृत्य चांगला यायला हवा होता.. त्याला सोसवेल असा यायला हवा होता.. एका देवमाणसाला आलेल्या अशा गूढ, अनाकलनीय मृत्यूची जखम त्याच्या चाहत्यांना, आमच्यासारख्या सहकारी कलाकारांना कायमची राहील!

**– शब्दांकन – पूजा सामंत**

samant.pooja@gmail.com


ग्रंथाली

# चॉईसेस

आत्मकथन

**लिव्ह उल्मन**

स्वैर अनुवाद

**मृणाल कुलकर्णी**




लिव्हसारखी अत्यंत संवेदनशील अभिनेत्री, तिचे आगळेवेगळे आयुष्य, त्यातले भावनांचे अनेक चढउतार, गुंतागुंतीची नाती – याबद्दल तिला नेमके काय म्हणायचे आहे, हे समजून घेऊन ते शब्दबद्ध करणे हे अत्यंत अवघड काम, पण मृणालने ते अप्रतिमरित्या पार पाडले आहे. यातला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते लेखन कुठेही अनुवाद वाटत नाही. मला तर हा मृणालने घेतलेला लिव्ह उल्मन या स्त्रीचा अनुभव वाटतो. एका अभिनेत्रीला, स्त्रीला, आईला, प्रेयसीला आणि व्यक्तीला जाणून घेताना, जणू परकायाप्रवेश करून मृणालने लिव्ह आपल्यापर्यंत पोहोचवली आहे.

**– डॉ. मोहन आगाशे**

**मूल्य ३५० रुपये**

**सवलतीत २१० रुपये**




चांगदेव काळे

# साहित्यक्षेत्रातील हिमनग

'**फुलांचे** सौंदर्यदेखील लक्ष वेधून घेणारे होते. लालसर, डाळिंबी, निळ्या, पांढऱ्या रंगांची फुले तेथे फुलली होती. एका तुरेदार फुलात तर अनेक गुलाबी नाग फणा काढून उभे होते. दुसऱ्या एका नारिंगी तुऱ्यात चिमुकली फुले इतकी दाटीवाटी करून बसली होती, की ती चिरडली कशी नाहीत याचेच आश्चर्य वाटत होते. काही फुले इतकी नाजूक आणि विरविरीत होती की, पाहता पाहता विरघळून जातील असे वाटत होते आणि इतक्या सुंदर फुलांच्या सान्निध्यात असूनदेखील गवतावरची छोटी पिवळी, पांढरी फुले आपल्या साध्या सौंदर्याने मन आकर्षून घेत होती. लांब नाजूक देठावर तरंगणारे त्यातले एक मी खुडून घेतले आणि कितीतरी वेळ माझ्या मुठीत मी ते सांभाळीत होतो. जणू ते हरवू नये अशी माझ्या हृदयातल्या सौंदर्यासक्तीने मला शपथच घातली होती.' (गोपुरांच्या प्रदेशात, पृष्ठ १२८)

गंगाधर गाडगीळ यांच्या साहित्याशी ओळख झाली ती 'गोपुरांच्या प्रदेशात' या प्रवासवर्णनामुळे. हे पुस्तक आम्हाला अभ्यासक्रमात होते. अभ्यासक्रमात असल्यानेच अनेक लेखक, कवी पुस्तकरूपात परिचयाचे झाले. गाडगीळ त्यातले एक. त्यावेळी प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार म्हणजे लेखकाने भटकंती केलेल्या प्रदेशाची माहिती देणे, या व्याख्येत बसणारा होता. इतिहास, भूगोलात जशी गड, किल्ले, पर्वत, नद्या, जंगले, अशा स्थळांची माहिती असते तशी. त्यात भर पडलीच तर ती लेखकाने प्रवास कसा केला, त्याच्यासोबत कोणकोण होते, कुठल्या हॉटेलात राहिले, वगैरे वगैरे यांची. त्यामुळे तो फारसा उत्सुकतेचा असण्याचे कारण नव्हते. अगदीच म्हणायचे झाले तर तो नीरस साहित्यप्रकार आहे असेच मनात होते. परंतु या समजाला छेद बसला तो प्राध्यापकांनी केलेल्या विश्लेषणामुळे. सौंदर्यस्थळांकडे पाहण्याची लेखकाकडे असलेली सौंदर्यदृष्टी, तरल संवेदना, जोडून घेण्याची भावावस्था आणि त्याचा या सगळ्याला झालेला स्पर्श, यांच्यामुळे. प्रवासात लेखक नुसता



गंगाधर गाडगीळ

पाहण्याचा अनुभव घेत नाही, त्यात तो स्वतःला जोडून घेतो, त्याच्याशी एकरूप होतो तेव्हा ते केवळ प्रवासवर्णन राहत नाही, तो त्याच्या आयुष्यातील एक रमणीय पहाटेचा एक सुंदर आविष्कार असतो याचा प्रत्यय या प्रवासवर्णनाने दिला. कन्याकुमारीच्या वाळूवर उत्तरेकडे तोंड करून भारतमातेला मनोभावे वंदन करण्यासाठी पायातली चप्पल बाजूला काढून ते नतमस्तक होतात, निसर्गाच्या प्रत्येक लीलेचे भरभरून वर्णन करताना स्वतः लीलया त्यात विरघळून जातात, एक वेगळाच चैतन्यदायी अनुभव ठायीठायी देत जातात, ते सर्व अनुभवले ते या पुस्तकातून. प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार नीरस नाही तर चैतन्यदायी असतो असे परिवर्तन घडून आले ते या पुस्तकामुळे.

एक उत्तम लेखक : गंगाधर गाडगीळ असे त्यांच्याशी नाते निर्माण झाले त्याला कारण 'गोपुरांच्या प्रदेशात' हे पुस्तक! त्यामुळे त्यांची पुढील प्रवासवर्णने, 'साता समुद्रापलीकडे', 'चीन : एक अपूर्व अनुभव', 'नायगाराचं नादब्रह्म', 'वाचणे आणि त्यांच्यासह आनंदी प्रवासाला निघणे' हे ओघाने आलेच.

त्याच काळात त्यांची वाचनात आलेली 'लिलीचे फूल' ही कादंबरी. तसा तो काळ झपाटलेला होता. ना.सी. फडके, वि.स. खांडेकर यांच्या कादंबऱ्यांचे मोहमयी वर्तुळ विळखा घालून होते. त्यात ही कादंबरी हाताशी आली. ती वय आणि आवड यांच्याशी मिळतीजुळती असल्याने आवडणे स्वाभाविक होते, परंतु ती कायमची लक्षातदेखील राहिली. लक्षात राहण्याचे एक कारण होते, की तिच्यात केवळ प्रेम आणि नैराश्य यांचा संबंध आहे म्हणून नव्हे तर मानसशास्त्रीय बैठकीचा तिला भक्कम असा आधार आहे. हे वेगळेपण मनाला भावणारे, चटका देणारे होते. तसा तिचा आकार आणि आवाका लहानखुरा होता. परंतु तिच्यातला मनोज्ञ निसर्ग आपल्याला सुखावतो, आपल्याशी नाते सांगतो. हे नाते फुलणाऱ्या कोवळ्या मनाचे आहे, अलगद उडणाऱ्या फुलपाखराचे आहे आणि त्याच्याशी जोडलेल्या चढउतारावरील भावभावना व संवेदना एखादी कविता असावी तशा आंदोळत राहतात. यातली कितीतरी स्थळे अशी आहेत, जी आपला ठाव घेतात आणि आपण लेखकापुढे कुर्निसात घालण्यासाठी झुकतो, याचे कारण ही कथा प्रतीकाच्या रूपाने कायमची कोरली गेलेली असते.




'दुर्दम्य' ही त्यांची दुसरी कादंबरी. बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी वाटणारा अभिमान आणि भक्ती त्यांच्या ताठ कण्याने शालेय जीवनात जागृत केलेली होती. 'मी शेंगा खाल्लेल्या नाहीत, मी टरफले उचलणार नाही.' 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळवीनच!' ही वाक्ये काळ्या पाषाणात कोरलेल्या लेण्यासारखी कोवळ्या बालमनावर तेव्हाच कोरली गेली होती. मंडालेचा तुरुंगवास आणि गीतारहस्य ही थोर बिरुदावली त्यांच्या थोरपणाच्या आदरासाठी सोबत होतीच. त्यामुळे लोकमान्यांवर असलेली अशी भलीमोठी, दोन खंडांत प्रसिद्ध झालेली कादंबरी अस्मितेचा ठेवा ठरली होती. त्यात भर पडली ती अतिशय चपखल अशा शीर्षकाची, 'दुर्दम्य'! ही कादंबरी की चरित्र हा विचार समोर नव्हता. लोकमान्यांवर लिहिलेले पुस्तक आहे, एवढेच तेव्हा पुरेसे होते. वाचत असताना मात्र हा भेद लक्षात आला. खरे तर चरित्रलेखन करताना, तेही ऐतिहासिक पुरुषावरील लेखन करताना अनेक मर्यादांचा लेखकाला सामना करावा लागतो. त्यातला महत्त्वाचा भाग असतो तो लेखकाला उपलब्ध दस्तऐवजाच्या बाहेर जाणे अशक्य असते. कादंबरी मात्र लेखकाला स्वातंत्र्य घेण्याचे स्वातंत्र्य असते. त्याला वेगळे, नवे काय सांगायचे आहे, त्या दिशेने तशी कादंबरीची मांडणी करू शकतो. इथे लोकमान्यांसारखा महापुरुष, लोहकांबेसारखा कणखर, करारी, व्यासंगी, अनेक पैलू असलेले व्यक्तिमत्त्व. कौटुंबिकतेपासून राजकारणापर्यंत, एक कुटुंबकर्ता ते राष्ट्रीय नेतृत्व करणारा नेता, स्वतःच्या विचाराशी आणि कृतीशी कुठेही तडजोड न करणारा बाणेदार माणूस कादंबरीतून उभा करणे सोपे नाही. तो कादंबरीतून साकारण्याचे शिवधनुष्य गाडगीळ यांनी लीलया पेललेले आहे. अर्थात त्यासाठी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात तसे अशी चरित्रात्मक कादंबरी लिहिताना गाडगीळ यांनी लोकमान्यांच्या आंतरिक व्यक्तित्वाचा वेध घेण्यावर भर दिलेला आहे. लोकमान्यांच्या मनातले ताणतणाव, त्यांचे वैचारिक आणि भावनिक संघर्ष, त्यांची ध्येय आणि स्वप्ने, अत्युच्च यशाच्या क्षणी त्यांच्या मनातली खंत वा प्रतिक्रिया, अपयशाचा परिणाम, निष्काम कर्मयोग्याची वैचारिक भूमिका, आत्मिक ताकद, असे अनेक पैलू आहेत, जे सर्वसामान्यांना ज्ञात नाही. या संगळ्यांचा प्रभावीपणे शोध घेण्यासाठी, व्यक्तित्वाच्या आंतरिक जडणघडणीचे महत्त्वाचे बिंदू ओळखण्यासाठी साहित्यिकाची मर्मदृष्टी हवी, मानसिक व्यामिश्र प्रवाहांचा कल्पनेने अनुभव घेण्याची प्रतिभाताकद लेखकाकडे असावी लागते, ती गाडगीळांकडे आहे.

लोकमान्य टिळक यांची प्रतिमा डोळ्यांत होती ती अल्पज्ञानी होती, खरे टिळक, संपूर्ण एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून समजून घ्यायचे असतील तर 'दुर्दम्य' या कादंबरीला पर्याय नाही, हीच भावना पुस्तक वाचून झाली. आणि लेखक, कादंबरीकार म्हणून गाडगीळ अधिक जवळचे वाटू लागले. त्यांच्या उच्च दर्जाच्या साहित्यगुणांविषयी कमालीचा आदर वाटू लागला.

गंगाधर गाडगीळ यांनी कादंबरी, प्रवासवर्णन, नाटक, समीक्षा, संकीर्ण, बालसाहित्य, विनोद अशा सर्वप्रकारच्या साहित्यप्रांतांत विपुल आणि कसदार लेखन केलेले आहे. त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो त्यांच्या कथालेखनाचा. त्यांच्या एकूण प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची संख्या शतकाच्या आसपास भरते, त्यात कथासंग्रहांची संख्या छत्तीस इतकी आहे.

त्यामुळेच त्यांना कथाकार गाडगीळ म्हणून अधिक ओळखले जाते. त्यातही १९४५ ते १९६० हा काळ नवकथेचा म्हणून ओळखला जातो. त्यात जे नवकथाकार म्हणून लौकिकास पात्र ठरलेले आहेत, त्यात गाडगीळांच्या नावाचा उल्लेख प्रामुख्याने केला जातो. याचे कारण भावे, माडगूळकर आणि गाडगीळ हे समकालीन लेखक म्हणून आहेत. योगायोग असा की गाडगीळांना 'अभिरुची' मासिकाचा 'कडू आणि गोड' या कथेसाठी उत्कृष्ट कथा म्हणून जो पुरस्कार मिळाला त्याच पुरस्काराचे मानकरी माडगूळकरदेखील होते. नवकथेचे हे युग सगळ्यांना अचंबित करून गेले. पारंपरिक कथेची जी चौकट होती, तिला छेद देण्याचे काम या नवकथेने केले आहे आणि त्यात गाडगीळ अग्रभागी होते. गाडगीळांच्या कथेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांच्या कथेला आरंभ, मध्य, शेवट असा निश्चित आकृतिबंध सहसा दिसून येत नाही. कथा आकार घेते तेव्हा ती कालक्रमानुसार अनेक दिवसांच्या प्रवाहात सापडलेली नसून अवघ्या एका दिवसाच्या फ्रेममध्ये बंदिस्त झालेली असते. कथापात्रे, व्यक्तिरेखांचा आढावा घेतला तर त्यात, पुरुष, बालक, स्त्री केंद्रस्थानी आहेत. परंतु ही सगळी मंडळी एका व्यवस्थेच्या चक्रव्यूहात अडकलेली मंडळी आहेत. तशीच एका स्तरात बांधलेली आहेत. थोडक्यात सांगायचे तर या कथा बहुतेककरून नागर कथा आहेत. 'कबुतरे', 'सरळरेषा', 'भागलेला चांदोबा', 'बगी', 'गुणाकार', 'दामले आणि पळसुले', 'किडलेली माणसे', अशा कथा आपण वाचतो तेव्हा लक्षात येते, त्या कनिष्ठ मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करत आहेत. या कथांमधून गाडगीळ मानवी जीवनातली व्यामिश्रता, बदलत जाणारे प्रखर वास्तव, जगण्याच्या प्रेरणा, त्यांच्यातील अंतर्विरोध, शोषण, पिळवणूक, यांचा वेध घेतात. त्यांचे चित्रण करतात, त्यांच्यातील विसंगती, उपहास, उपरोधावर नेमके बोट ठेवतात, आणि एका समाजव्यवस्थेचा, संस्कृतीचा स्तर उलगडून दाखवतात. केवळ त्या वर्गाचे चित्रण करणे हा त्यांचा उद्देश नाही, तर एक तरल संवेदना, मानवी मूल्यांविषयी वाटणारी आस्था, प्रेम ते त्यातून व्यक्त करताना दिसतात. दांभिक वृत्तीवर प्रहार करताना दिसतात. या चित्रणात विशेष जाणवतो तो त्यांच्या भाववृत्तीचा, विनोदातील उपहासाचा, कलात्मक दृष्टीचा, आणि संपन्न अनुभवाचा. शाब्दिक रंगरंगोटी करण्याऐवजी ते अनुभव पातळीवर, कलात्मक पातळीवर एक कलावंत म्हणून रंग भरताना दिसतात. त्यांची 'बंडू आणि फँटसी' तर आपल्या चांगलीच परिचयाची आहे. त्यांच्या कथेचा एकूण प्रवास पाहता कथादालन समृद्ध करण्यात या प्रवाहाचा मोठा वाटा आहे.

सर्जनशील थोर लेखकाचे आत्मचरित्र हा नेहमीच औत्सुक्याचा विषय असतो. लेखक लिहितो कसा, त्याच्या प्रेरणा, ऊर्जा, सातत्य, भूमिका आणि एकूण साहित्यिक कर्तृत्व याविषयी वाचक नेहमीच कुतूहल व्यक्त करत असतो आणि त्याच औत्सुक्यापोटी त्यांच्या आत्मचरित्राचे वाचन करत असतो. गाडगीळ यांची प्रकाशित झालेली पुस्तके, दिवाळी अंक, वृत्तपत्रे यातून एक लेखक म्हणून गाडगीळ सतत वाचकांच्या भेटीला आलेले आहेत. शैक्षणिक क्षेत्रात अध्यापक ते प्राचार्य अशा भूमिकांत वावरलेले आहेत. आपटे उद्योगसमूह, वालचंद उद्योगसमूह यांचे आर्थिक सल्लागार – अर्थतज्ज्ञ म्हणून काम पाहिले. संस्थात्मक काम केले. त्या अर्थाने विविध पैलू असलेले गाडगीळ आपल्याला भेटतात ते 'मुंगीचे महाभारत' या आत्मचरित्रातून. हे चरित्र वाचत असताना आपण एका मोठ्या प्रशस्त आणि तितक्याच मनोहारी प्रासादात वावरत आहोत असे भासत राहते. एका आल्हाददायक अशा वातावारणात उंच हिंदोळ्यावर आपण झुलत आहोत असेही भासत राहते. याला कारण त्यांचे स्वतःकडे पाहणे, आणि त्याचे वर्णन करणारी त्यांची सुंदर शैली. पुस्तकाला दिलेल्या शीर्षकाबाबतचे त्यांचे मनोगत वाचले तरी आपल्या लक्षात हे अनुभवास येते. गाडगीळ प्रतिभावान लेखक आहेत, विचारवंत आहेत, तत्त्वज्ञानाची त्यांना बैठक आहे. ते आपल्या चरित्रातून जो पट उलगडून दाखवत आहेत त्यात त्यांच्या लेखनाविषयीचे विश्लेषण आहेच, त्याचवेळी आपल्या जडणघडणीची, सम कालीन साहित्यातील महत्त्वाच्या दस्तऐवजाची, घडामोडींचीही नोंद ते घेतात. चंद्रकांत बांदिवडेकर यांच्या शब्दांत सांगायचे तर 'एका मुंगीने आपल्या अंगभूत गुणांनी आणि अविरत मेहनतीने योजनापूर्ण कार्यपद्धतीचा अंगीकार करून एका महाभारतीय योद्ध्याचे रूप कसे धारण केले ते या आतमचरित्रात स्पष्ट होते. हा योद्धा राजकारण किंवा समाजकारणाच्या क्षेत्रांत घुसखोर करत नाही. हा योद्धा आपल्या वृत्ती–प्रवृत्ती, आवडीनिवडी आणि संवेदनशील स्वभावाला जागून कलेल्या क्षेत्रात लढत राहिला आणि मराठी साहित्याला फार काही मोलाचे देऊन गेला आहे.'

गंगाधर गाडगीळ यांचा जन्म मुंबईत २३ ऑगस्ट १९२३ रोजी झाला. त्या घटनेला आता शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या पुस्तकरूपात प्रसिद्ध झालेल्या साहित्याची संख्याही शतकाहून अधिक आहे. काही कलावंत, साहित्यिक हे नेहमीच काळाला मागे टाकून येणाऱ्या वर्तमानानावर स्वार झालेले आढळतात. गंगाधर गाडगीळ हे त्यापैकी एक आहेत. त्यांचे साहित्य आजही ताजे वाटते आणि आजही वाचक त्यांची मागणी करतो, संदर्भ देतो, हे भाग्य असेच कायम राहो, या शुभेच्छांसह त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन !

**– चांगदेव काळे**
changdeokale12@gmail.com



शरद काळे

# अंतराळातील कचरा

**६६ वर्षांपूर्वी** पृथ्वीच्या कक्षेत फक्त एकच मानवनिर्मित वस्तू होती. ती म्हणजे स्पुटनिक हा कृत्रिम उपग्रह! तत्कालीन सोव्हिएत युनियन या महासत्तेने अंतराळात पाठवलेला तो जगातील पहिला कृत्रिम उपग्रह होता. ४ ऑक्टोबर १९५७ रोजी तो प्रक्षेपित केला गेला. आजच्या घडीला किती सक्रिय कृत्रिम उपग्रह, निकामी उपग्रह आणि त्यांच्याशी संबंधित वस्तू पृथ्वीभोवती फिरत आहेत, याचा अंदाज सामान्य माणसाच्या कल्पनेच्या बाहेर आहे! हा आकडा एक लाख कोटी एवढा प्रचंड आहे. संशोधकांच्या एका आंतरराष्ट्रीय संघाने 'सायन्स' या नियतकालिकात नुकतेच एक खुले पत्र लिहून उद्धृत केलेला हा अविश्वसनीय वाटणारा आणि आश्चर्याने थक्क करून सोडणारा आकडा आहे. त्या पत्राद्वारे उपग्रहांचे प्रमाण आणि कचऱ्याचे प्रमाण रोखण्यासाठी जागतिक कराराची मागणी केली आहे. या कचऱ्यामुळे कमी-जास्त प्रमाणात विकसित होत असलेले एक डम्पिंग यार्डच अंतराळात तयार होत आहे. चार पिढ्यांपेक्षा जास्त काळ पृथ्वीची कक्षा ओलांडण्याचा हा सिलसिला सुरू आहे.

या संशोधकांनी त्यांच्या पत्रात नोंदवले आहे की पृथ्वीच्या कक्षेत सध्या ९००० सक्रिय कृत्रिम उपग्रह आहेत. ही संख्या सन २०३०च्या अखेरीस ६००००पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. ज्या एक लाख कोटी लहानमोठ्या गोष्टी या उपग्रहांशी संबंधित आहेत त्यात वापरून झालेल्या बूस्टर आणि स्ट्रे बोल्टपासून, मेटल फ्लेक्स आणि तरंगणाऱ्या रंगांच्या कपचांपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे. कृत्रिम उपग्रह प्रक्षेपित होण्याच्या वेळी ह्या साऱ्या गोष्टी त्यांच्या बरोबरच होत्या. त्या साऱ्या छोट्यामोठ्या गोष्टी निरुपद्रवी आहेत, असे समजण्याचे अजिबात कारण नाही. २८२०० किमी/तास वेगाने या गोष्टी पृथ्वीभोवती परिभ्रमण करत आहेत, त्यातील अगदी लहान तुकडादेखील एखादे अंतराळयान किंवा बुलेटसारख्या परिभ्रमण करणाऱ्या इतर वस्तूंवर आघात करू शकतो. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाच्या बाहेर अंतराळातून चालणाऱ्या अंतराळवीरांनी अहवाल दिला आहे की २५ वर्षे जुन्या परिभ्रमण प्रयोगशाळेच्या बाह्य आवरणावर बंदुकीच्या गोळ्या मारल्यासारख्या खुणा दिसतात. ह्या खुणा छोट्यामोठ्या गोष्टी प्रचंड वेगाने आदळल्यामुळेच उमटल्या आहेत. अंतराळवीरांना अंतराळस्थानकावर काही आपत्ती आल्यास आणि घाईघाईने बाहेर पडावे लागल्यास, अवकाशातील ढिगाऱ्यांच्या वेगाने फिरणाऱ्या वावटळीतून बाहेर पडण्यासाठी, स्थानकाला जोडलेल्या सोयुझ किंवा स्पेसएक्स स्पेसक्राफ्टपैकी एका ठिकाणी आश्रय घ्यावा लागतो! ह्या सर्व मोडतोड झालेल्या गोष्टी पृथ्वीवर पडून वातावरणात जळून जातील! परंतु आपण या कचऱ्याचे प्रमाण अधिक वेगाने वाढवत आहोत!

हे पत्र लिहिणारे सात संशोधक विज्ञानलेखक असून ते उपग्रहतंत्रज्ञान किंवा महासागरातील प्लास्टिक प्रदूषण या दोन क्षेत्रांपैकी एका क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. त्यांनी हे पत्र लिहिण्याचे कारण म्हणजे मानवाने महासागरांच्या प्रदूषणाचा जो गोंधळ निर्माण केला आहे, तसा निदान आता अंतराळात तरी करू नये असे त्यांना मनापासून वाटते! पॅसिफिक महासागरातील एक प्रचंड मोठा कचरापट्टा या प्रदूषणाचा साक्षीदार आहे. या तरंगत्या कचरापट्ट्याचे क्षेत्रफळ हे अमेरिकेच्या टेक्सस राज्याच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट आहे! माणसामुळेच असाच कचरापट्टा किंवा पट्टे अंतराळात निर्माण होत आहेत. फरक एवढाच आहे की महासागरांना प्रदूषित करण्यासाठी आपण काही शतके लावली, तर आणि अंतराळात डम्पिंग यार्ड निर्माण



करण्यासाठी केवळ काही दशके लागली! म्हणजे आपण अंतराळात कचरा करण्यासाठी वेळ वाया घालवला नाही! केवढा मोठा पराक्रम!

हेथर कोल्डवे हे लंडनच्या झूलॉजिकल सोसायटीचे वरिष्ठ सागरी तांत्रिक सल्लागार आहेत आणि या पत्राचे सहलेखक आहेत. पत्राच्या प्रकाशनाच्या वेळी दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की एक सागरी जीवशास्त्रज्ञ म्हणून मी अंतराळावर शोधनिबंध लिहिण्याची कल्पनाही केली नव्हती. परंतु या सहकारी संशोधनाद्वारे, अंतराळातील प्रदूषणसमस्या हाताळणीतील आव्हाने ही समुद्रातील पर्यावरणीय समस्या हाताळण्याच्या आव्हानांशी मिळतीजुळती आहेत हे आमच्या लक्षात आले. एकूण जागतिक व्यवस्थापन आणि पर्यावरण धोरणामध्ये विज्ञानाचा वापर करून आपल्याला या समस्यांचे समाधान करता येणे शक्य आहे, आणि ते करण्याची आत्यंतिक गरज आहे. संशोधकांना महासागरांच्या स्वच्छतेमध्ये आतापर्यंत झालेल्या प्रगतीमध्ये, अवकाशातील प्रदूषण रोखता येऊ शकते अशी आशा दिसते. त्यासाठी किमान प्रयत्न करण्यास सहमत असलेल्या १७० राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जागतिक नेत्यांनी मार्च २०२२ मध्ये महासागरांमध्ये प्लास्टिकच्या सतत डंपिंगला आळा घालण्यासाठी आणि तेथे जे आहे ते काढून टाकण्याच्या प्रयत्नात संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण असेंब्लीमध्ये जागतिक प्लास्टिक करारावर स्वाक्षरी केली आहे.

हे संशोधक पत्रलेखक पुढे लिहितात की अशाच प्रकारचा पुढाकार आता अंतराळ प्रदूषण रोखण्यासाठी घेतला गेला पाहिजे. त्यामध्ये सरकारी आणि व्यावसायिक अवकाश प्रक्षेपणसेवा अशा दोन्ही प्रकारच्या संस्थांनी करारांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यांच्याच प्रक्षेपणामुळे निर्माण होणारे कचऱ्याचे ढिगारे कमी करण्यासाठी तेच जबाबदार आहेत. कृत्रिम उपग्रह त्यांची कार्यक्षमता संपल्यावर त्यांना कक्षेतून बाहेर करून त्यांची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा उभी केली पाहिजे. एक लाख कोटी वस्तूंच्या कचऱ्यापैकी जास्तीत जास्त कचरा स्वच्छ करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आहे. बहुतेक राष्ट्रांनी, पृथ्वीच्या कक्षेच्या दीर्घकालीन न्याय्य आणि टिकाऊ वापरास प्रोत्साहन देऊ शकणाऱ्या अंतराळनियमांची अंमलबजावणी करण्याकडे आजवर पूर्ण दुर्लक्ष केले आहे. या पत्राचे लेखक पुढे असे लिहितात, की कक्षीय क्षेत्रात अंतराळकचरा कमी करण्याचा प्रयत्न करणारा कोणताही आंतरराष्ट्रीय करार आजपर्यंत तरी झालेला माही. हे बदलले पाहिजे आणि शक्य तितक्या लवकर चुकांची पुनरावृत्ती टाळली पाहिजे. अंतराळ स्वच्छ राहण्यासाठी सर्व काही त्याच्यावरच अवलंबून आहे. आपल्याला पृथ्वीच्या कक्षेचे संरक्षण करण्यासाठी वेळेवर, कायदेशीर बंधनकारक करार निर्माण करण्यासाठी, विज्ञानाद्वारे सूचित केलेल्या सामूहिक सहकार्याची आवश्यकता आहे. मानवी प्रजातीने अंतराळात जाण्याचा महापराक्रम करून दाखवला, पण वेळीच सावध होऊन तेथे कचराक्षेत्र निर्माण होणार नाही ह्याची दक्षता घ्यायला हवी आहे. कदाचित थोडा उशीर झाला आहे, पण अजून वेळ गेली नाही. सागरी प्रदूषण आणि अवकाशातील प्रदूषण ह्या

दोन्हीमुळे मानवाचेच अधिक नुकसान होणार आहे, पण ते टाळता येण्यासारखे आहे.

अमेरिकन सरकारच्या लष्करी विभागाच्या ग्लोबल स्पेस सर्व्हिलन्स नेटवर्क (SSN) सेन्सर्सद्वारे २७००० पेक्षा जास्त पृथ्वीच्या कक्षेत फिरणाऱ्या विविध वस्तूंचा मागोवा घेतला जातो. त्याशिवाय मागोवा घेण्यासाठी अवघड असलेल्या आणखी बऱ्याच लहानसहान भंगार गोष्टींचा हिशेब ठेवणे कठीण असते. परंतु मानवी अंतराळ उड्डाणमोहिमा आणि रोबोटिक मोहिमांना धोका देण्याइतपत त्या गोष्टी महत्त्वाच्या असू शकतात. या भंगार गोष्टी आणि अवकाशयाने किंवा कृत्रिम उपग्रह अत्यंत वेगाने (निम्न पृथ्वीच्या कक्षेत अंदाजे २५२७० किलोमीटर प्रति तास) फिरत करत असल्याने, अवकाशयानासह कक्षीय ढिगाऱ्याच्या अगदी लहान तुकड्याचा प्रभावदेखील मोठ्या समस्या निर्माण करू शकतो. अंतराळातील भंगारच्या वाढत्या प्रमाणामुळे आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानक आणि स्पेसएक्सच्या क्रू ड्रॅगनसारख्या मानव असलेल्या इतर अंतराळ यानांसह सर्वच अंतराळवाहनांना संभाव्य धोका वाढतो. नासा ही संस्था अंतराळातील ढिगाऱ्यांसोबत टक्कर होण्याच्या धोक्याला गांभीर्याने घेते. या संस्थेने अंतराळस्थानकाशी संबंधित प्रत्येक संभाव्य टक्कर अपघाताला कसे सामोरे जावे याबद्दल दीर्घकालीन मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. उड्डाणनियम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि अंतराळमोहिमा सुरक्षित करण्यासाठी बनवलेल्या नियमावलीचा ही मार्गदर्शक तत्त्वे एक भाग आहेत. ढिगाऱ्यातील किंवा भंगारातील एखाद्या तुकड्याच्या किती अपेक्षित समीपतेमुळे (जवळ येण्यामुळे) टक्कर होण्याची शक्यता खूप वाढते, ती टाळता येणे शक्य आहे का, क्रूच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी कोणती खबरदारी आवश्यक असते, त्यासंबंधी मार्गदर्शन करतात.

कक्षीय क्षेत्रात होणाऱ्या उपग्रहांच्या मोडतोडीमुळे जे अवकाशीय भंगार निर्माण होते, त्यात नैसर्गिक उल्का आणि कृत्रिम (मानवनिर्मित) कक्षीय गोष्टी दोन्ही समाविष्ट आहेत. उल्का सूर्याभोवती कक्षेत असतात, तर बहुतेक कृत्रिम उपग्रह भंगार हे पृथ्वीच्या कक्षेत असते. कक्षीय भंगार म्हणजे पृथ्वीच्या कक्षेत असलेली कोणतीही मानवनिर्मित वस्तू जिची यापुढे उपयुक्तता संपुष्टात आली आहे. अशा भंगारात अकार्यक्षम अंतराळयान, सोडलेले प्रक्षेपण वाहनटप्पे (रॉकेट), मोहीम-संबंधित भंगार आणि विखंडन होऊन निर्माण झालेले भंगार यांचा समावेश होतो. पृथ्वीभोवती फिरत असलेले सॉफ्टबॉलपेक्षा आकाराने मोठे असलेले जवळपास २३००० भंगारांचे तुकडे आहेत. ते २८००० किलोमीटर प्रति तास वेगाने प्रवास करतात, उपग्रह किंवा अंतराळ यानाला हानी पोहोचवण्यासाठी तुलनेने लहान असलेले हे कक्षीय भंगार तुकडे पुरेसे वेगवान आहेत. खेळण्यातील गोट्यांच्या आकाराचे अर्धा दशलक्ष तुकडे किंवा त्याहून अधिक (१ सेंटिमीटर) किंवा त्याहून अधिक, आणि सुमारे एक मिलिमीटर आणि त्याहून अधिक भंगारांचे सुमारे १०० कोटी तुकडे पृथ्वीच्या कक्षेत फिरत आहेत. त्याहूनही लहान मायक्रोमीटर आकाराचे कोट्यवधी तुकडे तेथे फिरत आहेत. या प्रचंड वेगाने प्रवास करताना रंगांच्या सूक्ष्म कपचा किंवा कणदेखील अंतराळ यानाचे नुकसान करू शकतात. अनेक अंतराळ शटलच्या खिडक्या बदलण्यात आल्या कारण असल्याच तुकड्यांच्या आपटण्यामुळे त्या फुटल्या होत्या. खरे तर, पृथ्वीच्या कमी कक्षेत कार्यरत असलेल्या बहुतेक रोबोटिक अवकाशयानांकरता मिलिमीटर आकाराचे कक्षीय भंगार अंतराळमोहिमांसाठी गंभीर धोका उत्पन्न करत असते. सन १९९६ मध्ये, एका दशकापूर्वी स्फोट झालेल्या फ्रेंच रॉकेटच्या भंगारावर एक फ्रेंच उपग्रह आदळला आणि त्याचे खूप नुकसान झाले. १० फेब्रुवारी २००९ रोजी कार्यरत असलेल्या अमेरिकन इरिडियम व्यावसायिक अंतराळयानावर, एक निकामी झालेले रशियन अंतराळयान आदळले आणि नष्ट झाले. या टकरीतून २३०० पेक्षा जास्त मोठ्या भंगार तुकड्यांची आणि अनेक लहान भंगार तुकड्यांची अंतराळात भर पडली! जुना हवामान उपग्रह नष्ट करण्यासाठी क्षेपणास्त्राचा वापर करणाऱ्या चीनच्या सन २००७च्या अँटिसॅटेलाइट चाचणीत, ३५०० पेक्षा जास्त मोठे, ट्रॅक करण्यायोग्य भंगार तुकडे आणि हजारो लहान भंगार तुकडे पृथ्वीचे कक्षेत विखरून फिरू लागले!

विविध भंगार तुकड्यांचा मागोवा घेत अमेरिकन संरक्षण विभाग पृथ्वीच्या कक्षेत अत्यंत अचूक उपग्रहसूची ठेवतो. या सूचीत समाविष्ट केलेल्या बहुतेक वस्तू सॉफ्टबॉलपेक्षा (अंदाजे १० सेंटिमीटर) मोठ्या असतात. नासा आणि अमेरिकन संरक्षण विभाग यासाठी सहकार्य करतात आणि उपग्रह व कक्षीय भंगार यांच्या वातावरणाचे सातत्याने निरीक्षण आणि नियंत्रण करण्याचा प्रयत्न करतात. अमेरिकन संरक्षण विभागाचे अंतराळ पाळत नेटवर्क पृथ्वीच्या खालच्या कक्षेतील ५ सेंटिमीटर व्यासाच्या आणि भू-समकालिक कक्षेमध्ये सुमारे १ मीटर इतक्या लहान वस्तूंचा मागोवा घेते. वर म्हंटल्याप्रमाणे सध्या, सुमारे २७००० अधिकृतपणे सूचीबद्ध केलेल्या वस्तू या कक्षेत आहेत आणि त्यापैकी बहुतेक १० सेमी किंवा मोठ्या आहेत. विशेष ग्राउंड-आधारित सेन्सर आणि परत आलेल्या उपग्रह पृष्ठभागांची तपासणी करून, नासा १० सेंटिमीटरपेक्षा कमी व्यासाच्या वस्तूंच्या संख्येचे प्रमाण सांख्यिकी रीतीने निर्धारित करते. टक्कर-धोके हे भंगार वस्तूंच्याआकारानुसार तीन श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत. १० सेंटिमीटर आणि त्याहून मोठ्या वस्तूंसाठी, अंतराळात नेटवर्कद्वारे ट्रॅक करता येणाऱ्या वस्तूंचा सामना करण्यासाठी संयोजन मूल्यांकन आणि टक्कर टाळण्याच्या सूचना प्रभावी आहेत. यापेक्षा लहान वस्तू सामान्यतः संयोग

मूल्यमापन आणि टक्कर टाळण्यासाठी ट्रॅक करण्यासाठी खूप लहान असतात. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावरील यूएस मॉड्युल्ससाठी अर्धा इंचापेक्षा (१ सेंटिमीटर) लहान कणांच्या प्रभावांना तोंड देण्यासाठी भंगारढाली प्रभावी ठरल्या आहेत.

नासाने अंतराळातील भंगाराचे नियोजन करण्यासाठी दीर्घकालीन मार्गदर्शक प्रणाली बनवली आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानक आणि त्याच्या चालकदलाच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी किंवा या भंगाराविषयी इतर सावधगिरी बाळगण्यासाठी, तसेच वेळोवेळी यांचा आढावा घेऊनही करण्यात येणाऱ्या उपाययोजना पुरेशा आहेत की नाही ह्याचे मूल्यांकन करण्यासाठी ही प्रणाली वापरली जाते. ह्या मार्गदर्शक प्रणालीनुसार जमिनीवरून अंतराळात येणाऱ्या प्रत्येक वाहनाच्या किंवा कक्षेत फिरणाऱ्या भंगारांच्या नियंत्रणासाठी अनिवार्यपणे एक काल्पनिक चौकट काढतात. या चौकटीला तिच्या आयताकृती आकारामुळे पिझ्झा बॉक्स असे सांकेतिक नाव दिले आहे. ही बॉक्स सुमारे ४ x ५० x ५० किलोमीटर) या मापाची असते. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानक या काल्पनिक बॉक्सच्या मध्यभागी असते. येणाऱ्या वाहनाविषयी किंवा भंगाराच्या मोठ्या तुकड्याविषयी अंदाज व्यक्त होतो की ते स्थानकाच्या अगदी जवळून जाईल आणि ट्रॅकिंग माहितीसंच गुणवत्ता पुरेशी अचूक मानली जाते, तेव्हा ह्युस्टन आणि मॉस्कोमधील मोहीम नियंत्रण केंद्रे एकमेकांशी सहकार्य करत तो मार्ग तपासतात. काहीवेळा टक्कर होणार असे अगोदरच लक्षात येते, तेव्हा आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाला थोडेसे मागेपुढे हलवले जाऊ शकते. या सुरक्षित लक्ष्मणक्षेत्राच्या युक्तीमुळे अंतराळातील अपघात टाळता येतात. कधी कधी ट्रॅकिंग माहिती संच अशा युक्तीची हमी देण्यासाठी पुरेसा अचूक नसतो किंवा धोका टाळण्यासाठी अंतराळस्थानक हलवण्यास वेळ नसतो. अशा वेळी पृथ्वीवरील ही दोन नियंत्रणकेंद्रे चालकदलाला रशियन सोयुझ किंवा अमेरिकन व्यावसायिक अवकाशयानात आधीच जाऊन बसायला सांगतात. यामुळे धोकादायक टक्कर झाल्यास स्थानकाचे हॅच बंद करून त्या अवकाशयानाला स्थानकापासून वेगळे करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. टक्कर भीषण स्वरूपाची असेल तर स्थानकाच्या जीवन-समर्थक विभागातील दाब कमी होऊ शकतो किंवा तेथील घटकांचे गंभीर नुकसान झाल्यास चालकदल स्थानक सोडू शकतात. आपत्कालीन परिस्थितीत अवकाशयान चालकदलासाठी जीवनरक्षक होडी म्हणून काम करते. नियंत्रणकेंद्रात अतिरिक्त खबरदारी घेण्याचा पर्यायदेखील उपलब्ध आहे, टक्कर होण्याची शक्यता पुरेशी अधिक असल्यास, स्थानकाच्या वेगवेगळ्या दालनांमधील हॅचेस बंद करून नुकसान कमी होईल ह्याची दक्षता घेतली जाऊ शकते.

अंतराळस्थानक चालवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उड्डाणनियमांमध्ये ठरवलेल्या मर्यादेपर्यंत, स्थानकावर मानव आणि मालवाहतूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अंतराळयानामध्ये संयोगातून टक्कर होण्याची संभाव्यता पोहोचते, तेव्हा भंगार टाळण्याच्या युक्त्या आखल्या जातात. अंतराळ-स्थानकासाठी, टक्कर होण्याची शक्यता एक लाखमध्ये एकापेक्षा जास्त असल्यास आणि मोहिमेच्या उद्दिष्टांवर महत्त्वपूर्ण परिणाम होणार नसल्यास एक उपाययोजना वापरली जाते. जर ती शक्यता दहा हजारांमध्ये एकपेक्षा जास्त असेल, तर अशी उपाययोजना चालवली जाईल ज्यामुळे चालकदलाला अतिरिक्त धोका निर्माण होणार नाही. भंगार टाळण्याच्या उपाययोजना सहसा लहान असतात आणि संयोगाच्या वेळेच्या एक ते अनेक तास आधी केल्या जातात. अंतराळस्थानकाच्या अशा प्रकारच्या उपाययोजनांसाठी तेथील रशियन थ्रस्टर किंवा डॉक केलेल्या स्पेसक्राफ्टपैकी एकावरील प्रोपल्शन सिस्टम वापरून योजना आणि अंमलबजावणी करण्यासाठी सुमारे पाच तास लागतात. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाने सन १९९९ पासून २९ भंगार अपघात टाळण्याच्या उपाययोजना केल्या आहेत. त्यातील तीन उपाययोजना सन २०२० मध्ये कराव्या लागल्या होत्या. नासाने सन १९८८ मध्ये शटल मिशन एसटीएस-२६ पासून मानवी अंतराळ उड्डाणासाठी संयोजन मूल्यांकन आणि टक्कर टाळण्याची प्रक्रिया अमलात आणली. सन १९९८ मध्ये आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकाचे पहिले घटक प्रक्षेपित करण्यापूर्वी, नासा आणि अमेरिकन संरक्षण विभाग यांनी संयुक्तपणे अधिक अत्याधुनिक आणि उच्च निष्ठा संयोजन विकसित केले आणि लागू केले.

**मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेसाठी मूल्यांकन प्रक्रिया**

सन २००५ मध्ये, नासाने पृथ्वीच्या खालच्या कक्षेतील पृथ्वीनिरीक्षण प्रणाली उपग्रह आणि भू-समकालिक कक्षेतील ट्रॅकिंग आणि डेटा रिले उपग्रह प्रणाली यासारख्या निवडक रोबोटिक मालमत्तांसाठी समान प्रक्रिया लागू केली. सन २००७ मध्ये, नासाने सर्व नासा उपाययोजना लागू केलेल्या उपग्रहांना पृथ्वीच्या खालच्या कक्षेत आणि २०० किलोमीटर भूसमकालिक कक्षेच्या आत एकत्रित मूल्यमापन प्रक्रिया विस्तारित केली. यू.एस. स्पेस फोर्सचे १८ वे स्पेस कंट्रोल स्क्वॉड्रन (१८ SPCS) स्थापित वेळापत्रकानुसार (मानवी अंतराळ उड्डाण वाहनांसाठी दर आठ तासांनी आणि रोबोटिक वाहनांसाठी सोमवार ते शुक्रवार) सर्व नियुक्त नासा अंतराळ मालमत्तेसाठी संयुक्त मूल्यांकन करण्यासाठी जबाबदार आहे. १८ एसपीसीएस नासा (मानवी अंतराळ उड्डाणासाठी जॉन्सन स्पेस सेंटर, आणि रोबोटिक मोहिमांसाठी गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटर) यांना प्रस्थापित निकषांची पूर्तता करणारे संयोजन सूचित करते. स्पेस फोर्स स्पेस सर्व्हिलन्स नेटवर्कला धोक्याच्या

ऑब्जेक्टवर अतिरिक्त ट्रॅकिंग डेटा संकलित करण्यासाठी संयोजन मूल्यांकन अचूकता सुधारण्यासाठी कार्य करते. स्पेस फोर्सने दिलेले अंतर आणि अनिश्चिततेच्या आधारे नासा, टक्कर होण्याच्या संभाव्यतेची गणना करते. विशिष्ट उड्डाणनियम आणि तपशीलवार जोखीम विश्लेषणावर आधारित, नासा टक्कर टाळण्याची युक्ती आवश्यक आहे का हे ठरवते. युक्ती आवश्यक असल्यास, नासा नजीकच्या काळातील संयोगांच्या स्क्रीनिंगसाठी स्पेस फोर्सला नियोजित पोस्ट मॅन्युव्हर ऑर्बिटल डेटा प्रदान करते. नियोजित नवीन कक्षाने नासाच्या वाहनाला भविष्यात त्याच किंवा दुसऱ्या अंतराळ वस्तूंशी टक्कर होण्याचा धोका असल्यास या प्रक्रियेची पुनरावृत्ती केली जाऊ शकते.

भंगारनिर्माणशमन मार्गदर्शक तत्त्वे मार्च २००२ मध्ये, संयुक्त राष्ट्रसंघाच्या मिटिगेशन वर्किंग ग्रुपने सर्वसहमतीने आंतरराष्ट्रीय अंतराळ कचरा नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचा पहिला संच विकसित करण्याचे आव्हान स्वीकारले. ते सन २०२१ मध्ये अगदी अलीकडे अद्ययावत केले गेले. तेव्हापासून या दस्तऐवजाने राष्ट्रीय कायदे करताना बंधनकारक नसलेले धोरण यासाठी आधाररेखा म्हणून काम केले आहे. तांत्रिक मानकांच्या व्युत्पन्नासाठी प्रारंभिक बिंदू म्हणून ह्याचा वापर होतो. मार्गदर्शक तत्त्वे पुढील गोष्टींवर लक्ष केंद्रित करून मोहिमांचा एकूण पर्यावरणीय प्रभाव समाविष्ट करतात-

सामान्य मोहिमांच्या दरम्यान सोडलेल्या कचऱ्यावर मर्यादा कक्षेत फिरताना होणाऱ्या मोडतोडीची संभाव्यता कमी करणे, कक्षेत टकरी होऊन मोडतोड झालीच तर ते भंगार गोळा करून त्याची विल्हेवाट लावणे, ही मार्गदर्शक तत्त्वे अंतराळ संस्था आणि कृत्रिम उपग्रहचालक, अंतराळयान जीवनचक्राच्या सर्व टप्प्यांमध्ये अवकाशातील ढिगाऱ्यांची निर्मिती कमी करण्यासाठी एक धोरण म्हणून काम करत आहेत. आय.ए.डी.सी.ची (इंटर एजन्सी स्पेस डेब्रिस कोऑर्डिनेशन कमिटी)नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वे आंतरराष्ट्रीय अंतराळ समुदायाने मोठ्या प्रमाणावर स्वीकारली आहेत, ज्यामुळे अंतराळातील कचरा कमी करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

भारताचा अंतराळ कार्यक्रम अतिशय महत्त्वाकांक्षी आहे. त्या क्षेत्रातील आपली प्रगतीदेखील देदीप्यमान आहे. भारतात अंतराळविज्ञान कार्यक्रम सन १९६९ मध्ये अणुऊर्जा विभागाच्या अखत्यारीत सुरू झाला होता. त्यानंतर सन १९७२ मध्ये अंतराळ आयोगाची स्थापना करून भारतीय अंतराळ संशोधन संघटना (इस्रो) या आयोगाच्या अखत्यारीत दिली. आर्यभट्ट हा पहिला भारतीय उपग्रह १९ एप्रिल १९७५ रोजी प्रक्षेपित करण्यात आला. तो तत्कालीन सोव्हिएत युनियनमधून प्रक्षेपित करण्यात आला. त्या उपग्रहाने भारताच्या उपग्रह तंत्रज्ञान आणि डिझाइनिंगचा पाया रचला. २२ एप्रिल २०२३पर्यंत भारताने स्वतःसाठी आणि ३४ देशांसाठी मिळून ४२४ उपग्रह अंतराळात पाठवले आहेत. अमेरिकेने आतापर्यंत ३४४९ उपग्रह अंतराळात पाठवले आहेत आणि त्या यादीत तो पहिल्या क्रमांकावर आहे. भारताचा क्रमांक सहावा असून आपल्यासाठी आपण आपले स्वतःचे १११ उपग्रह अंतराळात पाठविले आहेत. त्यामुळे अंतराळ कचरा करण्यात आपलाही वाटा आहे. अंतराळातील कचऱ्याचे नियोजन करण्यासाठी भारत बांधील आहे. त्यासाठी जी मार्गदर्शक तत्त्वे ठरवली आहेत ती थोडक्यात अशी-

१. भारतीय अंतराळ मालमत्तेचे रक्षण करणे आणि अवकाशातील भंगाराचे नियंत्रण करणे.

२. आय.ए.डी.सी. आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंतराळ भंगार  निर्मूलन मार्गदर्शक तत्त्वांचे पालन.

३. भंगारासाठी समर्पित निरीक्षण सुविधांची स्थापना (RDRS, ऑप्टिकल टेलिस्कोप, अंतराळ आधारित प्लॅटफॉर्म) स्पेस ऑब्जेची अधिक अचूक कक्षीय माहिती मिळवण्यासाठी.

४. कक्षेतील टकरी टाळण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत समन्वय.

५. लाँग टर्म सस्टेनेबिलिटी ऑफ आऊटर स्पेस म्हणजे अंतराळातील दीर्घकालीन अक्षयता जोपासण्याची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पृथ्वीच्या कक्षीय वातावरणातील भंगाराचे मूल्यांकन.

५. अंतराळ मोहिमांच्या महत्त्वाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी उदयोन्मुख भारतीय अंतराळ अभियंत्यांसह सहभाग.

६. अंतराळ प्रक्रियांच्या दीर्घकालीन शाश्वततेसाठी अंतराळ कचरानिर्मूलन.

कोणत्याही तंत्रज्ञानाबरोबर त्याच्या अनुषंगाने समस्या येतातच. अंतराळ कार्यक्रमाबरोबरही अंतराळातील कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. यामध्ये अंतराळात फिरणारे विविध प्रकारच्या कचऱ्याचे विस्तीर्ण स्वरूप भयावह आहे. सर्वच देशांना अंतराळविज्ञानाची अतिशय गरज आहे. कृत्रिम उपग्रह अंतराळात पाठवायला सुरुवात झाल्यानंतर संदेशवहनात आश्चर्यकारक वेगाने प्रगती होत आहे. त्यामुळे या कार्यक्रमाची लोकप्रियता वाढत चालली आहे. अंतराळ कार्यक्रम वाढत जात आहेत तसतसा हा कचऱ्याचा प्रश्नही ज्वलंत बनत आहे. आपण जमीन प्रदूषित केली, महासागर प्रदूषित केले आणि आता अंतराळही प्रदूषित करत आहोत. अंतराळातील समस्या कशी सोडवायची याबद्दल आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न होत आहेत, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे.

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com



नंदन जोशी

# दक्षिणध्रुवातील काही तारे - ब्युनोस आयर्स

**२०१९ मध्ये** माझ्या ब्युनोस आयर्सच्या दोन खेपा झाल्या. ब्युनोस आयर्स ही अर्जेन्टिना देशाची राजधानी. दक्षिण अमेरिकेतला देश. चिले आणि अर्जेन्टिना हे देश एकत्र उत्तरेकडे प्रवास करतात, अगदी टोकापर्यंत. तिथून पुढे अंटार्टिका. दक्षिण अमेरिका ही भौगोलिकदृष्ट्या भारतापासून लांब आहे. फार भारतीय भेटत नाहीत; ब्राझीलमधल्या सां पाउलो शहरात एक मराठी गृहस्थ खानावळ चालवतात अनेक वर्षे. ते मला म्हणाले की ब्राझीलमध्ये त्यांना फक्त ४ मराठी कुटुंबे माहीत होती. दक्षिण अमेरिकेत फार देश नाहीत. काही देश ब्राझील किंवा अर्जेन्टिनासारखे अतिशय विस्तीर्ण. एकंदरीत दक्षिण गोलार्ध बराचसा समुद्राने व्यापला आहे; त्यामुळे भूभाग आणि माणसे कमीच.

ब्युनोस आयर्सच्या याआधी काही खेपा झाल्या होत्या, परंतु यावेळी आवडीच्या विषयांवर खर्च करायला अधिक वेळ मिळाला. यात प्रामुख्याने पुस्तकांची दुकाने धुंडाळणे, कलासंग्रहांना भेटी देणे, खाण्यापिण्याच्या जागा शोधणे आणि शहरात भटकणे हे होते. कामानिमित्त होणाऱ्या खेपांमध्ये थोडा वेळ काढून केलेली थोडीशी भ्रमंती. बरीचशी स्वतःच आखलेली; फार आयोजनाचा विचार न करून; जे सापडेल ते पाहायचे. एका मित्राने माझ्या आवडीनिवडी ओळखून काही जागांकडे लक्ष वेधले होते.

पॅरिसच्या खालोखाल ब्युनोस आयर्स हे माझे आवडते शहर आहे. जाण्याआधी त्याविषयी बरेच ऐकले होते. प्रसिद्ध कथाकार बोर्हेच्या कथांमधून शहर परिचित होते; त्याखेरीज एवं पेरॉनची ख्याती जगभर आहेच. तरीदेखील, जसे बऱ्याचदा घडते, तसे या शहराची नस सापडायला वेळ लागला. एका अर्थाने ही नैसर्गिक क्रिया असते. शहराची गंमत उलगडायला लागते तेव्हा शोध लागल्याचा आनंद वेगळाच असतो. (यात शहर किती सापडते आणि आपण स्वतःला किती उमगतो हा वादाचा प्रश्न आहे.) ब्युनोस आयर्सची राजधानी लॅटिन अमेरिकेतील इतर राजधान्यांपेक्षा वेगळी. इथला समाज अधिक सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध. शहरवासीयांना Portenos म्हणतात; या नावाला एक उच्चभ्रूपणाचा वास आहे. पोर्टेनॉस हे इतर प्रांतांतील अर्जेन्टिन लोकांपेक्षाही वेगळेच. मी ब्युनोस आयर्सपलीकडे प्रवास केला नाही. इतर प्रांतातील संस्कृती ही Gaucho पद्धतीची; घोडेस्वारी आणि शेतीवर उदरनिर्वाह करणे ही तिथल्या संस्कृतीची लक्षणे. ब्युनोस आयर्सचे वेगळेपण हे सहजगत्या फिरणाऱ्या प्रवाशालाही जाणवते. चित्रपटगृहे, कला संग्रहालये, नाट्यगृहे, ऑपेरा, बॅले, टँगो नृत्यगृहे, पुस्तकांची दुकाने आणि इतरही बरेच काही. हेमिंग्वे म्हणाला होता : There's never an end to Paris. तसेच काहीसे. मुख्य म्हणजे फिरण्याची मजा खूप; रात्री फिरू नका अशी सावधानींची वाक्ये ऐकून होतो, पण अनुभव चांगला आला.


ब्युनोस आयर्स इतर लॅटिन अमेरिकन देशांपासून वेगळे असले तरी इथल्या सामान्यांची स्थिती आजूबाजूच्या देशांइतकीच कठीण आहे. असे असूनदेखील अर्जेन्टिना, चिली, कोलम्बिया, पेरू आणि इतर देशांमध्ये पुस्तकसंस्कृती लक्षणीय आहे. सर्व थरांतील लोक वाचताना दिसतात. ही वाचनाची ओढ पोसण्याकरता भाषांतराचे आणि मुद्रणाचे भूमिगत उद्योग चालतात. या उद्योगांवर डॅनियल आलारकोनने कित्येक वर्षांपूर्वी एक सुंदर लेख लिहिला होता. पावलो कोयलो हा प्रसिद्ध ब्राझिलियन लेखक; तो पोर्तुगीजमध्ये लिहिणारा. त्याच्या कादंबऱ्यांचा खप स्पॅनिश जगातही फार. लॅटिन अमेरिकेत ब्राझील सोडून सर्व देश स्पॅनिश बोलणारे. त्याची कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर स्पॅनिश आणि इतर अनुवाद काही वर्षांनी येतात. पण चिली, पेरू, इत्यादी देशांत त्याच्या नवीन पुस्तकांविषयी उत्सुकता फार असल्यामुळे अनधिकृत भाषांतरे काही महिन्यांतच उपलब्ध होतात. एक किस्सा : एकदा आलारकोन आणि त्याचा प्रकाशक लिमात सिग्नलपाशी

गाडीमध्ये थांबलेले होते आणि त्यांना एक रस्त्यावरचा पुस्तक विक्रेता दिसला.

प्रकाशकाने हात वर करून त्याला बोलावले आणि विचारले, ‘आलारकोन वा टिटिन्गरचे काही आहे?’ विक्रेत्याच्या कपाळाला आठ्या पडल्या ‘कोण?’

प्रकाशकाने गाडीची खिडकी वर केली.

‘तुमची दोघे अपयशी लेखक आहात’ इति प्रकाशक.





ब्युनोस आयर्समधील पुस्तकांच्या दुकानांविषयी- एका संध्याकाळी मी माझ्या मित्राच्या मुलाच्या उपाहारगृहाकडे निघालो होतो. एप्रिलचा महिना होता म्हणजे हिवाळ्याची थोडीशी चाहूल होती. दक्षिण गोलार्धातील देशांचे मोसम आपल्याहून उलट असतात. चालत चालत कॉर्रिएंट्स रस्ता लागला. ब्युनोस आयर्समधील काही इतर रस्त्यांप्रमाणे हाही रुंद होता आणि पोचण्याआधीच मला जाणवले की काहीतरी वेगळे आहे या रस्त्यात. वाटेत एक पादचारी रास्ता होता जिथे टँगो संगीत आणि नृत्य चालू होते. झगमगीत पोशाख घालून काही स्त्रीपुरुष नृत्य करत होते रस्त्यावर. नंतर मला कळले की ही एका प्रकारची जाहिरात होती, त्यांच्या नृत्याच्या वर्गाची; तर ब्युनोस आयर्समध्ये जागोजाग असे गट आढळतात. याशिवाय कॉर्रिएंट्सचे टँगोशी नाते आहे. कॉर्रिएंट्सवर वळल्यानंतर एक दोन ब्लॉकमध्येच मला एक पुस्तकांचे दुकान आढळले. मी लगेच आत शिरलो. शिरण्याआधी खिडकीत लावलेली पुस्तके नजरेत येतात. एक फायदा म्हणजे दुकान बंद असले तरी अनेक पुस्तके पाहता येतात. बहुतांश स्पॅनिश, काही पोर्तुगीज, तुरळक इंग्रजी. थोडे स्पॅनिश येत असल्यामुळे पुस्तकाचे शीर्षक लागते, आणि लेखकांच्या नावावरून न लागलेली पुस्तके कुठली असतील याचा अंदाज येतो. यामुळे पुस्तकांच्या सहवासाचा आनंद घेता येतो. आत शिरल्यावर वेगवेगळ्या विषयांप्रमाणे पुस्तके दुकानात लावलेली होती. Literary Fiction च घ्यायची झाली तर अतिशय वैविध्यपूर्ण आणि कसदार पुस्तकांचा भरणा होता. अमेरिकन लेखकांमध्ये William Faulkner, Ernest Hemingway, Gertrude Stein, Ford Madox Ford, F. Scott Fitzgerald हे कादंबरीकार, रे ब्रॅडबरी हा विज्ञानकथाकार, चार्ल्स बुकोवस्की हा नवकवी. तिथल्या वाचकांची रुची जाणवत होती. Fiction खेरीज Art, Architecture, Criticism, History, Politics, Psychology याचा भरणा. शिवाय Vinyl रेकॉर्डचे डब्बे ज्यात Western Classical ते Beatles ते टँगो संगीताच्या रेकॉर्ड. Cuban संगीत आणि Mexican मारियाची संगीताच्या तबकड्या. दुकानातून बाहेर पडताच लक्षात आले की या पुढची ३-४ दुकानेही पुस्तकांची आहेत. एवढेच नव्हे तर पुढचे ३-४ ब्लॉकही बरेचसे पुस्तकांच्या दुकानांनी भरलेले आहेत. हा शोध आनंददायक होता, त्याचबरोबर overwhelming ही. प्रत्येक पुस्तकाच्या दुकानातील प्रत्येक पुस्तक नजरेखालून घालणे हे माझ्याकरता तरी अवघड होते. दुकानदारांच्या निवडीतून त्यांच्या आणि त्यांच्याकडे खरेदी करणाऱ्या गिऱ्हाईकांच्या निवडींचा अंदाज लागतो. कॉर्रिएंट्सवर चालताना Colon चा tower दिसतो - रात्री दिव्यांनी सजवलेला. टँगो संगीत आणि निऑन दिव्यांची कलाकुसर अशी ही ब्युनोस आयर्सची रात्र.

इतकी सबळ वाचनसंस्कृती असून पुस्तकांच्या दुकानांना बरे दिवस नाहीयेत. एका दुकानाचे नाव Dickens होते; त्याला Liquidation सेल पाटी लागली होती. काही दिवस वा आठवड्यांत बंद होईल असे वाटत होते. किती दिवस ही दुकाने टिकतील याची खात्री देता येत नाही. हळूहळू यांची दिवेलागण अपरिहार्य. विषण्ण करणारा विचार आहे. कॉर्रिएंट्सच्या पुस्तकभांडारांपासून काही अंतरावर एल आतेनेओचे भव्य रूप.

२०१९ची दुसरी खेप डिसेंबरच्या मध्यावर झाली. त्या खेपेला माझी पत्नी, मिलन, माझ्यासोबत होती. पुस्तकांच्या दुकानांविषयी बोलून बोलून मी तिचे कान खाल्ले होते. येताच तिने एल आतेनेओविषयी माहिती काढून एका दुपारी तिथे जायचा कार्यक्रम आखला. पूर्वी ऑपेरागृह असलेले हे दुकान, एक दृश्यमय मेजवानी आहे. शिरल्यावर दोन्ही बाजूंना गॅलऱ्या आणि मध्यभागी पोचल्यावर लिफ्ट जिथून गुहेत शिरत आहोत असा भास होतो. नाट्यगृहातल्या गॅलऱ्यांतून सबंध दुकान पाहता येतं. प्रत्येक गॅलरीमध्ये पुस्तके किंवा संगीताच्या सीडी लावलेल्या. विविधतेचा अंदाज द्यायचाच असेल तर इथले वेगवेगळे सेकशन्स पाहा : एका कोपऱ्यात Para Principiantes (आपण येथून सुरुवात करूया) ही मालिका. या मालिकेतल्या विषयांमध्ये कमालीची विविधता आहे. राजकीय प्रवाह म्हटले तर Postmodernism, Philosophy ते थेट Anticapitalism आणि Counterculture. Philosophers म्हटले तर Derrida, Jung, Baudrillard. लेखकांमध्ये Joyce, Beckett, Cortazar, राजकीय पुढाऱ्यात Lenin, Trotsky. अतिशय वेगळ्या प्रकृतीचे लेखक खांद्याला खांदा भिडवून - उदारहणार्थ, 50 Shades लिहिणारी E L




James थॉमस मानच्या शेजारी आणि नजीकच संपूर्ण शेरलॉक होम्स. काही सेक्शन मिस्ट्री, थ्रिलरला वाहिलेले; यात अनेक देशांतल्या लेखिका - स्वीडनची कॅमिला लॅकबेर्ग व असा लार्सन, तर कॅनडाची शीना कमाल, इंग्लंडची फिओना बार्टन आणि ऑस्ट्रेलियाची Jane Harper. नुसता खजिना.

एल आतेनेओला प्रवाशांचा राबता पुष्कळ असल्या-कारणाने खप बराच होताना दिसतो. अतिशय विख्यात, देखण्या पुस्तकांचा इथे भरणा आहे. चित्रकला, प्रवासवर्णने, प्राणीजग, निसर्गसौंदर्य, नृत्य, नाट्यशास्त्र, संगीत या विषयांची आकर्षक आणि महाग पुस्तके काचेच्या कपाटात - काही कुलूपबंद. इतरत्र विषयाप्रमाणे लावलेली फँटसी, विज्ञानकथा-कादंबऱ्या (आणि त्यांच्या annotated आवृत्त्या), रूपांतरित पुस्तके, शिवाय इतिहास, राजकारण या विषयांवर कप्पे, देशाप्रमाणे विभागलेले. त्यातही मार्क्सिझम आणि कोम्मुनिसमवर भर; २० व्या शतकाचा इतिहास, मग त्या अंगाने ऐतिहासिक कादंबऱ्या आल्या. इथे इंग्रजी पुस्तके इतर दुकानांपेक्षा जास्त आणि येणाऱ्याजाणाऱ्याच्या आवडीनुसार निवडलेली असली तरी एल आतेनिओच्या संग्रहाचा आवाका थक्क करून सोडणारा आहे. जगातील उत्कृष्ट पुस्तकांच्या दुकानांच्या यादीत अनेकदा आढळते असे हे ठिकाण; आणि ही वर्गवारी सार्थच आहे.

पुस्तकांच्या दुकानांखेरीज इतर ठिकाणे आहेत जिथे पुस्तकसंस्कृती अनुभवायला मिळते. ब्युनोस आयर्सची नॅशनल लायब्ररी ही अशी एक जागा. होरहे लुई बोर्हे इथला अनेक दशके संचालक होता. त्याच्या कथांमध्ये पुस्तकांचे आणि लायब्ररीचे उल्लेख वारंवार सापडतात. The Library of Babel मध्ये बोर्हे एका अशा लायब्ररीविषयी लिहितो जिला सुरुवात किंवा शेवटच नाही. दरवर्षी आर्तेबा हे अर्जेंटिन कलाकारांचं काम प्रदर्शित करणारे प्रदर्शन Le Rural या भव्य परिसरात घडतं. मला या प्रदर्शनाला भेट द्यायची संधी मिळाली; वेगवेगळ्या नवोदित आणि होतकरू कलाकारांची रंगचित्रे पाहायला मिळाली. परंतु प्रदर्शनाखेरीज दुसरी एक मेजवानी म्हणजे कलेवरच्या पुस्तकांचे दालन. हे दालन केवळ आर्तेबा (ब्युनोस आयर्समध्ये दरवर्षी होणारी आर्ट फेर) चालू असतानाच उघडे असते. तिथे लॅटिन अमेरिकन कलाकारच नव्हे तर एकंदरीत युरोपीय आणि इतर कलाकारांवर पुस्तकेही पाहायला मिळाली. कलाकारांचे मोनोग्राफ, कलासमीक्षा, कलाप्रवाहांवरची चिकित्सक पुस्तके, फर्निचरवरची, शिल्पकलेवर, कलाकारांच्या जीवनावर, राजकारण अशा विविध विषयांवरच्या पुस्तकांची रास होती. कुठे पाहू कुठे नको असे झाले होते.

पुस्तकांची दुकाने ही शहराच्या अंतरंगाचे दर्शन ठरतात. शहरात फिरताना हे परिमाण सापडतेच असे नाही. उत्सुकतेने शहर फिरणाऱ्याला कधी कधी आपसूक काही आढळून जाते. एकाच शहरात अनेक शहरे, अनेक प्रवाह असतात. भटकणाऱ्याला जे भावतात त्याप्रमाणे तो/ती तिथे ओढले जातात. शहरवासीयांमध्ये अनेक प्रवृत्ती असतात. कामासाठी गेले असता कधी कधी समानधर्मी सहकारी भेटतात जे शहरातल्या न सापडलेल्या वाटांकडे बोट दाखवून जातात. शहरही एखाद्या नायिकेप्रमाणे आपले अंतर ठेवून असते; क्वचितच आपल्या तोंडावरचा पदर आड करते.

**- नंदन जोशी**
nandanpjoshi@gmail.com




प्रा. प्रज्ञा काशीकर

# यंत्रमानव, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वायत्त वाहननिर्मिती

**एकविसाव्या** शतकातील विकसित तंत्रज्ञान आणि संशोधनांमधील नावीन्याचा विचार केला असता, वाहनउद्योगातील भविष्यात होणारी उलाढाल व उपलब्ध संधी हे अधिकाधिक गुंतवणुकीसाठी एक महत्त्वाचे प्रवेशद्वार असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि यंत्रमानवशास्त्र (Robotic Science) या विकसित तंत्रज्ञानामुळे स्मार्ट कनेक्टेड वाहनांचे उत्पादन करणे भारतासारख्या विकसनशील देशाला काही वर्षांतच शक्य होईल. काही वर्षांत चालकविरहित वाहने (Diverless Vehicles) रस्त्यांवर धावताना दिसली तर नवल वाटायला नको. अमेरिका, चीन, जपान व जर्मनी या देशांमध्ये चालकविरहित वाहननिर्मितीसाठी प्रचंड प्रमाणावर गुंतवणूक करून विविध संशोधनात्मक उपक्रम राबवण्यात येत आहेत. भारतामध्येसुद्धा चालकविरहित वाहन बनवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेसोबतच वाहन नियंत्रण, सायबर सिक्युरिटी यांसारख्या सुविधांवर संशोधन सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहने म्हणजेच बॅटरीवर चालणारी वाहने हा भारतातील दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या प्रदूषणाची पातळी पाहता, अतिशय पर्यावरणपोषक पर्याय ठरणार आहे. वाहननिर्मिती या क्षेत्रात बरेचसे यांत्रिकीकरण झालेले असले तरी मेक इन इंडिया उपक्रमामुळे या उद्योगात प्रगतिशील संशोधन करण्यासाठी योग्य चालना मिळाली आहे.

यंत्रे विचार करू शकतात का, एक गाडी दुसऱ्या गाडीला एखाद्या भागात खूप रहदारी आहे किंवा अपघात झाला आहे असे संदेश देऊ शकेल का किंवा एखादी चालकविरहित कार हॅक करता येईल का, कार हॅक झाली तर सॅटेलाईट आणि इंटरनेटचा (Communication networks) वापर करून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने शोधता येईल का, आणि अशी ही हुशार आणि अद्ययावत वाहने मनुष्यजातीवर तर राज्य करणार नाहीत ना, असे अनेक गंभीर प्रश्न वाहनउत्पादक आणि त्यातील तंत्रज्ञांसमोर आहेत. या सर्व शक्यता व बाबींचा विचार व त्यातील सायबर धोके लक्षात घेऊनच आधुनिक वाहननिर्मिती करण्याचा प्रयत्न भारत नक्कीच समर्थपणे करेल. रस्ते वाहतूक अधिक सुरक्षित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर (Al Enabled Security) केला जात आहे.

अशा प्रकारची 'इंटेलिजण्ट वाहन'निर्मिती व स्वायत्त वाहननिर्मितीसाठीचे निकष, गुणवत्तेची हमी आणि मानवासारखी निर्णयक्षमता विकसित करणे यासाठी तांत्रिक सुधारणा व दृश्य चाचणी तसेच स्वयंचलित ड्रायव्हिंगच्या समस्या सोडवण्यासाठी वापरली जाणारी पद्धती/प्रणाली (Algorithm) अत्याधुनिक असणे आवश्यक आहे. 5G, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT) आणि इतर तंत्रज्ञानाच्या विकासामुळे वाहनांच्या डेटा व इंटरनेटची सिक्युरिटी, दूरसंचार नेटवर्क, संगणकप्रणाली, एम्बेडेड प्रोसेसर आणि नियंत्रक यांचा समावेश अनिवार्य आहे. २०२३च्या G-20 परिषदेच्या अध्यक्षपदी असलेल्या भारताला सायबर क्षेत्र सुरक्षित करण्यासाठी व संबंधित समस्यांना प्राधान्य देण्यासाठी योगदान देण्याची मोठी




संधी आहे. वाहनांमधील सायबर सुरक्षा हा आंतरराष्ट्रीय घडामोडींचा एक अत्यावश्यक पैलू बनला आहे. सायबर फॉरेन्सिकमधील (Cyber Forensic and Incident Management) कौशल्य व क्षमता वाढवण्यावरही लक्ष देणे गरजेचे आहे.

'नाऊ नेक्स्ट अँड बियाँड : ऑटो फॅक्टरी ऑफ द फ्युचर' (Now, Next & Beyond : Auto Factory of The Future) या अन्सर्ट (EY) या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या अहवालात वाहनउद्योगाबद्दल अतिशय महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. आगामी काळात वाहनउत्पादन क्षेत्रातील कंपन्यांचा कल स्वयंचलनाकडे (automation) त्याचप्रमाणे वाहनांमधील सायबर सुरक्षा वाढवण्याकडे झुकण्याची शक्यता आहे. त्यामुळे कामगारांवरील अवलंबित्व कमी होऊन माहितीतंत्रज्ञान व माहितीसुरक्षा या संदर्भात अधिक संधी उपलब्ध होतील. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून भारतासारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या देशातील रस्त्यांवर चालकविरहित वाहन उतरवणे व चालवणे अतिशय आव्हानात्मक आहे, याचा विचार करून आयआयटीमधील वैज्ञानिकांनीदेखील या विषयातील संशोधन व चाचण्या सुरू केल्या आहेत. वाहनांवर नियंत्रण ठेवणाऱ्या सुविधा विकसित करण्यासाठी कॅमेरे, रडार, जीपीएस (GPS : Global Positioning System) ऑडोमीटर व एनकोडिंग पद्धती (Encryption) यांची सांगड घालून प्रगत नियंत्रणप्रणाली बनवण्यासाठी अविरत प्रयत्न केले जात आहेत.



स्वायत्त वाहनांमधील सायबर सुरक्षा म्हणजेच वाहनतदर्थ नेटवर्क (Vanets) यातील सुरक्षेसाठी मोबाइल उपकरणे व वाहनांचे नेटवर्क यातील सुरक्षा हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. रहदारी (Traffic jams) किंवा अपघाताच्या ठिकाणी मोटारी महत्त्वाची माहिती देण्यासाठी एकमेकांशी आणि नेटवर्कशी संवाद साधू शकतील. वाहन ते पायाभूत सुविधा आणि (V2I) वाहन ते वाहन (V2V) यातील (Sensor) सेन्सर उपकरणे, वायरलेस नेटवर्क इंटर-व्हेईकल कम्युनिकेशन (IVC), वेगावरील निर्बंध, वाहनाच्या मार्गातील अडथळे, खड्डे यांबद्दल अचूक माहिती, तसेच रस्त्याच्या बाजूला असलेल्या वस्तू, उपकरणे यांच्याशी कनेक्ट होऊन, संवाद साधून अपघात मोठ्या प्रमाणावर टाळले जाऊ शकतील.



हे तंत्रज्ञान इतके विकसित होत आहे, की त्यामुळे पर्यावरण स्कॅन करणे तसेच RADARचा वापर ऑटोमोबाईल व इतर वस्तू शोधणे यासाठी केला जातो. स्वायत्त वाहन (Autonomous Vehicle-AV) आणि जवळच्या श्रेणीतील वस्तूंचे मूल्यांकन कोणत्याही दिशेने अचूकपणे केले जाऊ शकते. पाऊस, तीव्र ऊन, बर्फ, धुके व कमी प्रकाशातही ही वाहने असंख्य सेन्सरच्या मदतीने परस्परसंवाद करू शकतात. LiDAR पद्धतीदेखील योग्य मोजमाप, 3D दृष्टी, अचूक संगणकदृष्टीय प्रभावी Object Identification आणि व्हिज्युअल कंट्रोल देतात. ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टिम (GNSS) आणि ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम (PPS) हे अचूक स्थान व इतर माहिती वाहनांमधील सॉफ्टवेअरला पुरवतात. ज्यामुळे सायबर सुरक्षा राखण्यास मदत होते.

एकंदरच वाहननिर्मितीचे भविष्य स्वायत्त वाहनांच्या (Self driving vehicle) दिशेने वेगाने सरकत आहे. इंटरनेट कार ही संकल्पना ग्राहकांना आकर्षित करत आहे. की लेस एन्ट्री, कनेक्टिव्हिटी, इन्फोटेन्मेंट आणि आपले फोन, लॅपटॉप, घड्याळ आणि वाहन यांचा एकमेकांशी संवाद साधावा असे ग्राहकांना वाटते. मात्र सुरक्षित प्रवासाची खात्री, हॅकर्सच्या हल्ल्यापासून सुरक्षितता वैयक्तिक माहितीची चोरी, आर्थिक गुन्हे, हे घटकदेखील विचारात घेतले पाहिजेत. टेसला, टाटा, हेक्टर, किया सेल्टॉस, ह्युंदाईची ब्लू लिंक यंत्रणा या सर्व वाहनांमधील अत्याधुनिक सुविधा सायबर सुरक्षा, अलर्ट सर्व्हिसेस, कृत्रिम बुद्धिमत्ता, लोकेशन आधारित सेवा आणि वाहन व्यवस्थापन संबंधित प्रणाली ग्राहकांना वाहन चालवण्याचा उत्कृष्ट अनुभव देत आहेत. सावधानता बाळगणे निश्चितच आपल्या हातात आहे आणि कितीही कृत्रिम बुद्धिमत्ता वापरली तरीही नियंत्रण मानवी बुद्धिमत्तेकडेच असणे हिताचे आहे, असे आयटी एक्सपर्ट आणि रिसर्चर म्हणून माझे मत आहे.

**– प्रा. प्रज्ञा काशीकर**
संशोधक आणि सहाय्यक प्राध्यापक
बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिलानी
pradnyakashikar@gmail.com

॥ग्रंथाली॥

## पानं पिवळी पडत चालली असताना




**सुहास जेवळीकर**

वाऱ्याच्या उलट प्रवाहाशी झुंज देत स्वैर गिरक्या घेण्यातलं निस्सीम सुख तसंच क्षितिजाच्या अनंत अंतरापर्यंत झेपावत राहण्यातला निर्भेळ आनंद देत आणि घेत चाललेला हा कवी नावाचा मुशाफिर त्याच्या पायाखालच्या जमिनीचं विस्मरण मात्र तसूभरही होऊ देत नाही.

**– फ.मुं. शिंदे**

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**

## शब्दरंग




वारीत होतो चाललो
चित्रपंढरीच्या
आणि कळाले,
पुढे
कवितेचा गाव आहे
रंगत होत्या इथे
मैफिली छोट्या-भल्यांच्या
आणि कळाले,
थोडा
आपल्यालाही वाव आहे
**– हेमंत जोशी**

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**



सुरेश वांदिले

# रस्तेवाले जोशी

**'अरे,** ते रस्तेवाले जोशी का?' असं त्यानं संबंधितांना विचारलं.

'होय सर,' संबंधित म्हणाला. ते ऐकताच तो तडक जागेवरुन उठला आणि स्वत:हून त्यांना अदबीनं भेटला.

आजूबाजूचे सारेच, हे बघून चकित झाले. कोण हे, रस्तेवाले जोशी? सर्वांच्या मनात प्रश्न निर्माण झाला. बहुतेकांना वडेवाले जोशी माहीत! पण रस्तेवाले जोशी, हे जरा वेगळेच प्रकरण होतं.

ज्यानं 'रस्तेवाले जोशी का?' असं विचारलं, ती काही लहानसहान असामी नव्हती. त्याला भारतात बरेच जण क्रिकेटचा देव मानतात तर ऑस्ट्रेलियात, डॉन ब्रॅडमननंतरचा श्रेष्ठ फलंदाज! म्हणजेच आपला सचिन तेंडुलकर. त्याला ऑस्ट्रेलियन सरकारनं, ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया या पुरस्कारानं सन्मानित केलंय. हा आपल्या देशातील भारतरत्नसारखा ऑस्ट्रेलियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार. तो सचिनशिवाय फक्त दुसऱ्या एका भारतीयास आणि त्यातही मराठी माणसास मिळालाय. तो मराठी माणूस म्हणजे डॉ. विजय जोशी अर्थात रस्तेवाले जोशी!

सचिनच्या बरोबरीनं ज्यास सर्वोच्च पुरस्कार मिळतो, याचा अर्थ तोसुद्धा तोलामोलाचा आणि त्यानं काहीतरी भव्यदिव्य केलं असणारच ना?

नक्कीच! रस्तेवाले जोशी, यांनी जे काही केलंय, ते अफलातून आणि अद्‌भुत असंच! त्यांनी पोलादनिर्मितीच्या कारखान्यातून लोखंड वितळल्यानंतर बाहेर पडणारा जो कचरा असतो, त्यापासून रस्तेनिर्मितीचं तंत्र शोधून काढलं. या कचऱ्यास स्लॅग म्हणतात. पोलाद कारखान्याच्या आसपास लाखो टनांचा असा कचरा साचून साचून मोठमोठ्या टेकड्या निर्माण होतात. त्याचं करायचं काय? ही मोठी समस्या सर्व देशांना भेडसावतेय. ऑस्ट्रेलियात सर्वत्र अशा खूप खाणी आहेत. त्यातून असला कचरा/स्लॅग निर्माण होऊन ठिकठिकाणी मोठ्या टेकड्या निर्माण झाल्या.

या समस्येवर मात कशी करायची हे ऑस्ट्रेलियन सरकारला कळत नव्हतं. ही समस्या सोडवण्यासाठी कुणी समोरही येत नव्हतं.

ही साधाणत: १९९२ सालातील गोष्ट. तेव्हा विजय जोशी यांनी नुकतीच मुंबईच्या व्हीजेटीआय या अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकीची पदवी घेतली होती. टाटा, जॅकोब इंजिनीयरिंग, रिलायन्स पेट्रोकेमिकल्स, रसायनी, दीपक फर्टिलायझर अशा भारतीय कंपन्यांमध्ये नोकरी करून ते मस्कतला गेले. तिथून न्यूझीलंडला गेले. या देशातील रस्ते निर्मितीच्या संशोधनकार्यात त्यांचा मोठा सहभाग राहिला. त्यांनी सुचवलेल्या शिफारशी न्यूझिलंड सरकारनं त्या देशातील रस्तेबांधणीच्या बाबींसाठी मान्य केल्या. न्यूझीलंडमध्ये बरंच नाव कमावल्यावर विजय जोशी यांनी १९९१ मध्ये ऑस्ट्रेलियात स्थलांतरासाठी अर्ज केला.

ऑस्ट्रेलियात त्यांनी एका कंपनीत नोकरीसाठी अर्ज केला. त्या कंपनीची स्थापना आदल्या दिवशीच झाली होती. पोलाद कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या कचऱ्याचा काही चांगल्या कामासाठी उपयोग करण्याचं काम या कंपनीकडे सोपवण्यात आलं होतं. विजय जोशींनी मुलाखत झाली. त्यात त्यांची निवड झाली.

या कचऱ्याचं आपणास काय करायचंय सर, त्यांनी व्यवस्थापकास विचारलं.

त्यांच उत्तर होतं, तूच सांग बघू.

अशी विजय जोशी यांच्या नोकरीची सुरुवात झाली. त्यांना या अशा कचऱ्याचा नेमका काय आणि कसा उपयोग करायचा याचं फारच जुजबी ज्ञान होतं. परंतु नवं शिकण्याची आणि आव्हान स्वीकारण्यासाठी सदैव तयारी असलेल्या विजय जोशी यांनी, कचऱ्यातून सोनं काढून देण्याचं आव्हान स्वीकारलं. सर्वत्र पडून असलेला लाखो टन कचरा आणि

भविष्यात दरवर्षी तयार होणाऱ्या दोन लाख मेट्रिक टन कचऱ्याच्या सुयोग्य वापारासाठी तंत्र-युक्ती-उपाय शोधण्याचं आव्हान त्यांनी स्वीकारलं. त्यासाठी त्यांनी पुढील तीन वर्षं संशोधनात गाडून घेतलं.

या कचऱ्याचा उपयोग रस्ते, इमारती किंवा इतर बांधकामात कसा करता येईल, याशिवाय त्यांना काही सुचत नव्हतं. त्यामुळे त्यांच्या संशोधनाची दिशा याच एकमेव मार्गाने सुसाट धावत होती. एके दिवशी त्यांना, जे त्यांच्या मनात होतं त्या ठिकाणी नेऊन पोहचवलं. या कचऱ्याचा उपयोग रस्तेबांधणीसाठी करता येणं शक्य असून, त्यासाठी जे दगड, मुरुम, माती लागते, त्यापेक्षाही हा कचरा अधिक कणखर आणि अधिक काळ टिकणारा असल्याचं त्यांना दिसलं. म्हणजे त्यांच्या संशोधनातून ते सिद्ध झालं. हा मोठाच क्रांतिकारी शोध होता. स्लॅगच्या रूपानं मोठं साहित्य सर्वत्र उपलब्ध होत असल्यानं यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीची बचत होणारच होतीच. शिवाय कोट्यवधी रुपयेही वाचणार होते.



त्यांनी या स्लॅगचा वापर करून प्रायोगिक स्तरावर एक रस्ता आपल्या कार्यालयाजवळच बांधला. त्यावरून शेकडो टन स्लॅग वाहून नेणारे असंख्य ट्रक दौडवले. स्लॅगपासून तयार झालेला रस्ता हा जबदरस्त दणकट झाल्याचं जोशी आणि त्यांच्या ऑफिसच्या लक्षात आलं.

त्याच सुमारास सिडनी येथील विमानतळाची एक धावपट्टी बांधण्याच्या निविदेची जाहिरात ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रात आली. आपण हा रस्ता स्लॅगपासून बांधून देऊ शकतो, त्यामुळे कोट्यवधी रुपये वाचतील, असे जोशी यांनी विमानतळाच्या अधिकाऱ्यांना सांगितलं. परंतु त्यांचं म्हणणं या अधिकाऱ्यांनी हसण्यावारी नेलं. जवळपास त्यांना हाकलूनच लावलं. मात्र जोशी यांनी चिकाटी सोडली नाही. ते वारंवार विमानतळ अधिकाऱ्यांना भेटत राहिले. स्लॅगपासून कशी ठणठणीत धावपट्टी तयार करता येईल, हे आपल्या संशोधनाच्या आधारे सांगत राहिले. त्यांची ही चिकाटी, सातत्य आणि आत्मविश्वास बघून विमानतळ अधिकाऱ्यांनी त्यांना धावपट्टी बांधण्याचे काम दिलं.

अट एकच होती.

याची संपूर्ण जबाबदारी जोशींची. म्हणजे असं, की उद्या काही भलबुरं झालं तर, त्याची संपूर्ण भरपाई जोशींच्या कंपनीला द्यावी लागणार होती. हे खरं तर मोठचं धाडस होतं. ज्या बंदिस्त गुहेत ज्वालामुखी आहे की विषारी नाग भरलेले आहेत याची यत्किंचतही कल्पना नसताना, तिकडे प्रस्थान करणं म्हणजे स्वत:चा सर्वनाश करून घेणचं असल्याचं, कंपनीनं जोशींना समजावण्याचा प्रयत्न केला. यावर जोशीचं म्हणणं होतं, या गुहेची ही एक बाजू झाली. समजा ही गुहा अलिबाबाची निघाली तर? गुहा उघडण्याचा मंत्र तर ठाऊक आहे ना आपणास...जोशींच्या उलट प्रश्नाला कंपनीला काही उत्तर देता आलं नाही. त्यामुळे तुझ्या जबाबदारीवर तू पुढे जा, असं सांगून कंपनी मोकळी झाली.

जोशींना हायसं वाटलं. कारण गुहा अलिबाबाचीच असणार हे त्यांना पक्कं ठाऊक होतं. त्यांनी कंपनीचे आभार मानून स्लॅगपासून धावपट्टी बांधण्याच्या कामास सुरुवात केली. ठरलेल्या वेळेत धावपट्टी तयार झाली.

विमानतळ अधिकाऱ्यांनी आता नवा प्रश्न त्यांच्यासमोर टाकला, 'ही धावपट्टी टिकावू असल्याचं तूच सिद्ध कर?'

जोशींचा आत्मविश्वास इतका दांडगा की ते संबंधित अधिकाऱ्यास म्हणाले,

'सर, तुम्हीजगातील कोणत्याही यंत्रणेला आणा आणि धावपट्टीच परीक्षण करा. उगाच तुम्हाला शंका नको नि पुढे डोकेदुखी नको.'

या गृहस्थाचा हा आत्मविश्वास आत्मघातकी तर ठरणार नाही ना, असं त्या अधिकाऱ्यांना वाटलं. मात्र त्यानं अमेरिकेतील धावपट्टी परीक्षण आणि निरीक्षणाततज्ज्ञ आणि सर्वोत्कृष्ट कंपनीला पाचारण केलं. कंपनीनं अनेक पद्धतींनी या धावपट्टीचं परीक्षण केलं. शेकडो टन साहित्य असलेली मोठमोठी बोईंग विमानं उतरवण्यात आली. ही धावपट्टी जगातील इतर धावपट्ट्यांपेक्षा अधिक सरस आणि सक्षम असल्याचा निर्वाळा कंपनीनं दिला. विमानतळ अधिकाऱ्यांची तर वाचा जाता जाता राहिली. कारण स्लॅगच्या निर्मितीपासून बांधलेल्या धावपट्टीमुळे आठशे कोटी रुपयांची बचत झाली होती.

आठशे कोटी रुपये वाचवणारा स्लॅग आणि विजय जोशी यांचं नाव सर्वोतोमुखी झालं. या अद्भुत पराक्रमानं त्यांची दखल ऑस्ट्रेलियन सरकार दरबारी घेतली गेली. आपल्या देशात, फादर ऑफ स्लॅग इनोव्हेशन, असल्याचा सार्थ अभिमान ऑस्ट्रेलियन सरकारला झाला, आणि सरकारनं त्यांना सर्वोच्च नागरी पुरस्कार 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया' देऊन सन्मानित केलं.

०००

आत्मविश्वास आणि नावीन्याचा शोध घेण्यासाठी अथक परिश्रम करण्याची तयारी असेल तर अशक्यप्राय गोष्टी साध्य करता येतात हे जोशी यांनी स्वत:च्या उदाहरणानं आणखी एकदा सिद्ध केलं.

त्यांचं शिक्षण झालंय ते स्थापत्य अभियांत्रिकीत, मात्र त्यांनी संशोधन केलंय स्लॅग म्हणजे लोखंड अथवा पोलादापासूनच्या कचराच्या सदुपयोग, या विषयात. हा विषय आहे खनीजशास्त्राचा. म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकी आणि खनीजशास्त्र दोन्ही परस्परविरोधी बिंदू.

परंतु एकदा ठरवलं की करायचंच, हा बाणा असल्यानं जोशी यांनी, वोलोंगगॉन विद्यापीठात या संशोधनासाठी रीतसर अर्ज केला. हा अर्ज बघितल्यावर विद्यापीठ चकित झालं. कारण आजपर्यंत या विषयावर कुणीही संशोधन केलं नव्हतं. त्यामुळे या विद्यापीठात या संशोधनासाठी मार्गदर्शन करण्यासाठी कुणीही तज्ज्ञच नव्हता. त्यामुळे जोशींचा अर्ज त्यांनी नामंजूर केला. पुन्हा चिकाटीचा गुण त्यांच्या कामी आला. ते पुन्हा पुन्हा विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना भेटत राहिले. त्यांचं एकच सांगणं असायचं, नसेना का तुमच्याकडे या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक, पण मी जे काही संशोधन करेन, त्याची दिशा, प्रकिया, पद्धती, योग्य आहे ना यावर लक्ष ठेवणारी आणि मार्गदर्शन करणारी खनीजशास्त्रातील अधिकारी व्यक्ती म ार्गदर्शक म्हणून द्या.

जोशींच्या चिकाटीला अखेर फळ आलं. विद्यापीठानं त्यांना या विषयात संशोधानासाठी प्रवेश दिला. त्यांना एक तज्ज्ञ मार्गदर्शकही दिला. आपलं संशोधन हे आपण ज्या कंपनीत काम करतो, त्या कामाशीच मिळतंजुळतं असल्यानं आपणास पूर्णवेळ नोकरी आणि पूर्णवेळ संशोधन अशा दोनही संधी द्याव्यात ही विनंती जोशी यांनी केली. ती विद्यापीठानं मान्य केली. मात्र त्यांच्या संशोधनाचं परीक्षण हे इतर देशातील तज्ज्ञ करतील हे त्यांच्याकडून कबूल करून घेतलं. यासाठी जोशी एका क्षणात तयार झाले. कंपनीने त्यांना संशोधन करण्यासाठी परवानगी दिली असली तरी बऱ्याच अटीही टाकल्या होत्या. महत्त्वाचं म्हणजे पीएचडी केल्यावर जोशींना वेतनवाढ वगैरे दिली जाणार नव्हती. कामाच्या वेळेत अजिबात कपात केली जाणार नव्हती. सर्वात महत्त्वाचं म्हणजे जे काही संशोधन होईल,त्यावरचा मालकीहक्क कंपनीचा राहील, असं जोशींकडून कबूल करून घेण्यात आलं.

आपल्याला संशोधनाची संधी मिळतेय, ही अशक्यप्राय गोष्ट साध्य होत असताना जोशींना इतर बाबी फारच शुल्लक वाटल्या. त्यांनी सगळ्या अटी मान्य केल्या. वेळेवर संशोधन पूर्ण केलं. हे संशोधन या क्षेत्रासाठी क्रांतिकारक असंच होतं.

अभियंते विजय जोशी आता डॉ. विजय जोशी झाले. त्यानंतर त्यांनी ऑस्ट्रेलियात शेकडो किलोमीटरचे रस्ते बांधले. जपान व इतर देशांसाठी सल्लागार म्हणून काम केलं.

०००

जोशी यांचं मातृभूमीवर अतिशय प्रेम. या भूमीचं आपण देणं लागतो ही भावना त्यांच्या मनात सदैव जागृत असते. त्यामुळे भारत सरकारच्या रस्ते विभाग किंवा सार्वजनिक बांधकाम विभागानं त्यांना भारतातील रस्त्यांच्या निर्मितीसाठी सल्लागार म्हणून काम कराल का, असं विचारलं तेव्हा त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता होकार दिला. त्यांची एकच अट होती, ती म्हणजे ते या कामासाठी एकही पैसा मानधन घेणार नाहीत.

आजच्या काळात हा गुण सर्वात दुर्मिळच. परंतु हा दागिनाच जोशी यांचं खरं वैभव. भारत सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे सल्लागार झाल्यानंतर गेली पाच-सहा वर्षं ते प्रत्येक दोन महिन्यांनंतर भारतात येतात. याचा कोणताही खर्च ते भारत सरकारकडून घेत नाहीत. मातृभूमीचं ऋण ते त्यांच्या परीनं असं फेडत असतात...

०००

ऑस्ट्रेलियात सचिन तेंडुलकरचं मोठं गारुड आहे. सचिनचं क्रिकेटच्या क्षेत्रातील प्रचंड योगदान लक्षात घेऊन ऑस्ट्रेलियन सरकारनं त्यांना, ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमाला तुम्ही सन्मानीय अतिथी म्हणून आमंत्रित आहात असा मेल, ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी डॉ. विजय जोशी यांना केला.

अतिशय मोजक्या निंमत्रितांच्या उपस्थित झालेल्या, ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया, या पुरस्कार सोहळयात डॉ. विजय जोशींची सचिन तेंडुलकर यांच्याशी पहिल्यांदा भेट झाली. पुढे दोघांची बऱ्यापैकी मैत्री झाली. पुढे सचिन नव्या नव्या विक्रम ांच्या रस्त्यावरून सुसाट निघाला. डॉ. विजयही आधुनिक पद्धतीच्या रस्ते निर्मितीच्या कामात गढून गेले.

एकदा सिडनीमध्ये क्रिकेट सामन्यासाठी आलेल्या सचिन तेंडुलकरला भेटून, त्यांच्या मुलानं लिहिलेले क्रिकेटवरील पुस्तक त्यांना सचिनला द्यायचं होतं...

सचिन ज्या ठिकाणी थांबला होता त्या ठिकाणी डॉ. विजय जोशी गेले. हजारो चाहते, सुरक्षारक्षक यांच्या गराड्यातून डॉ. विजय जोशी तुम्हाला भेटायला आले आहेत असा निरोप सचिनपर्यंत गेल्यावर, रस्तेवाले जोशी का? हे उत्स्फूर्त उद्‌गार त्यांच्या मुखातून निघाले....

क्रिकेटच्या देवानं दिलेली ही उपाधी डॉ. जोशींना सर्वश्रेष्ठ आणि अभिमानाची वाटते...

**– सुरेश वांदिले**
ekank@hotmail.com



संजीवनी खेर

# तेजस्वी लेखणी

'**ग्लोकल** लेखिका' या सदरातील हा लेख आहे. हा लेख मार्गारेट ॲटवूडच्या लेखनावरचा आहे. कॅनडामधील ही लेखिका. माणूस म्हणून सर्वांना जगायला मिळणे वर्चस्ववादी राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत कसे असते ह्याचा शोध घेणारी लेखिका. हिने लेखनाचे अनेक प्रकार हाताळले आहेत. प्रामुख्याने काव्य, कादंबरी, निबंध, रिपोर्ताज, समीक्षा इत्यादी तिचा जन्म १८ नोव्हेंबर १९३७ रोजी ओटावा, कॅनडा इथे झाला. तिचे लेखनविश्व अनेक दशकांचे आहे. तिची ५० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तिला आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली ती तिच्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेने केलेल्या साहित्यिक लेखनातून. तिला घटनेच्या गाभ्यापर्यंत सहज जाता येते. त्यामुळे तिची विश्लेषणे लोकांना आश्चर्यचकित करतात. त्यामुळे तिचा प्रचंड मोठा वाचकवर्ग आहे.

तिचे वडील वनस्पतीशास्त्रज्ञ आणि आई आहार शास्त्रज्ञ होती. तिचे बालपण इनयूटा, क्युबेक ह्या आदिवासी जमातीच्या जंगल भागात गेले. वडिलांमुळे तिला वनस्पती, कीटक, वन्य जीव यांचे आकर्षण कायमच वाटत राहिले. साहजिकच तिच्या भाषेवर ह्या वातावरणाचा परिणाम झाला आहे. तिने ओटावा विद्यापीठातून पदवी प्राप्त केली. पदव्युत्तर पदवी हार्वर्डमधून घेतली. तिचे पहिले पुस्तक 'एडिबल वूमन' खूप गाजले. तिला लेखनाइतकेच सामाजिक कार्य, पर्यावरण, स्त्रीहक्क ह्या विषयांत खूप रस आहे. तिच्या लेखनासाठी तिला बरेच मानसन्मान आणि पारितोषिके मिळाली आहेत. कॅनडातील सर्वोच्च मानाचे गव्हर्नर जनरल्स पारितोषिक मिळाले ते तिच्या ललित साहित्याकरता. तिला बुकर प्राइझ, गोल्डन बुकर प्राइझ मिळाले. जिम पॉक ह्या अमेरिकन लेखकांबरोबरचा तिचा संसार फारसा टिकला नाही. त्यांनंतर कॅनडातील लेखक, पत्रकार आणि प्रकाशन व्यवसायात नाव केलेल्या ग्रॅम गिबसनबरोबर ती राहू लागली. त्या दोघांना एका मुलगी आहे, जेस अटवूड गिबसन. अधूनमधून तोही कॉलेजात शिकवत असे. त्याने ऑंटेरियोत एक फार्म हाऊस घेतले नि ती तिघे तेथे राहू लागली. तिलाही शहराहून अशा जंगलनुमा वातावरणात राहायला आवडते. त्या वास्तव्यात तिने एक कथासंग्रह आणि 'डेज ऑफ रिबेल १८१५-१८४०' हा कॅनडाच्या इतिहासाचा मागोवा घेणारे लेखन केले.



मार्गारेट ॲटवुड

अमेरिकेत राहताना तिला जाणवले की तिथे कॅनेडियन लोक संस्कृतीबद्दल वसाहतवादी दृष्टिकोन आहे. ते आपल्याला कमी लेखतात. तेथील विद्यापीठातही तसाच दृष्टिकोन विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवला जातो म्हणून तिने अमेरिकेतील नोकरी सोडून ऑंटेरियोत प्रकाशन संस्थेत काम करू लागली. मधल्या काळात टीव्हीसाठी तिने नाटके लिहिली. लघुकथा, कविता लिहिल्या. 'डान्सिग गर्ल्स,' हा कथासंग्रह लिहिला. कॅनडातील लेखनाची क्रिटिकल यादी तयार केली. त्यामुळे तेथील नव्या पिढीला आपल्या साहित्यिक वारशाची जाणीव झाली. कॉलेजमध्ये तिचा वापर सुरू झाला. शाळांतून ते शिकवले जाऊ लागले. आपल्या साहित्यात कमीपणा आणेल असे नाही, त्यातून उलट आपला लढवय्या इतिहास कळल्याने

अभिमानाची भावना निर्माण झाली. तिने तेथील क्रांतीचा खरा इतिहास लोकांसमोर आणला. विविधांगी लेखन करून तिने आपल्या देशातील लोकांना वाटणारा न्यूनगंड नाहीसा करायचा प्रयत्न केला. तिने अनेकदा कॉलेजमध्ये नोकरी केली, मुलांचे भावविश्व समजून घेण्यासाठी. त्यातल्या त्यात मुलींचे जग तिला वेगळे घडताना दिसत होते.

स्त्रीमुक्तीचा काळ सुरू झाला होता. घरकाम करण्यातच जीवनाचे साफल्य आहे असे समजणाऱ्या स्त्रिया स्वत:कडे वेगळ्या नजरेने पाहू लागल्या. तिच्या कथा कादंबऱ्यातून ती कामगार स्त्रिया आणि घरेलू स्त्रिया यांच्या जगण्यातील तोच तोपणा. कंटाळवाणे जगणे दाखवत राहिली, त्यातूनच मुक्तीचा मार्ग त्यांना हवासा वाटू लागला. तिच्या 'एडीबल वूमन'ने एक नवा जीवन प्रकाश पडला. आपण एक वस्तू बनत चाललो आहोत असे स्त्रीला वाटणे आणि सारेजण आपल्याला खाऊ पाहत आहेत असे वाटू लागते. त्यातून ती कशी बाहेर पडते याची ही कहाणी आहे.




तिच्या पन्नासहून अधिक पुस्तकांनी लोकांना जागे करायचे काम केले. 'कॅट्स आय', 'द जर्नल्स ऑफ सुझन मुडी' 'अलीस ग्रेस' यातून तिने कनेडियन इतिहासातील प्रसिद्ध स्त्रियांचे जगणे आणि झगडणे शब्दबद्ध केले आहे.

आपल्या देशातील लोकांना स्वत:च्या देशातील परंपरांचा अभिमान वाटायला हवा, मुळात त्यातील वैशिष्ट्ये कळायला हवीत असे तिला वाटे. अमेरिकन आणि कॅनेडियन समाजातील फरकाची एक साधी गोष्ट तिने सांगितली की आपल्या देशातील नायक वा हीरोची कल्पना असते की जो एखादा वन्य जीव वाचवतो. पण तेच अमेरिकेन लोकांना तो माणूस हीरो वाटतो जो एखाद्या जनावराचे डोकं कापून मिरवतो. त्यांना तरुण माणूस आक्रमक असला तर पुरुष(!) वाटतो. हा मूलभूत फरक आहे विचारांतला, माझ्या कावितातली माणसं अधिक सहृदय असतात, असे सांगते.

तिच्या लेखनाची ख्याती झाली ती १९८५मध्ये प्रकाशित 'द हँडमेड्स टेल' ह्या कादंबरीने. एका विचित्र दडपशाहीच्या राजकारणात नि समाजकारणातील वातावरणात अमेरिकेचे राजकारण बदलते. जिथे साऱ्यांच्या जगण्याचे सारे निर्णय राजकारण ठरवू लागते. अगदी कोणाबरोबर संसार करायचा, मुलं कोणापासून होऊ द्यायची हे सरकार वा राजकारणी लोक समाजाच्या गरजेप्रमाणे ठरवू लागतात. अमेरिकेचे लोकशाही सरकार कोसळल्यावर 'गिलियाड प्रजासत्ताक' राजकारण आणि सत्ता हाती घेते आणि देशात सारेच बदलते. एक सर्वंकष राजकारण सर्व देशाचा कब्जा घेते. त्यातील एका संवेदनशील स्त्रीची ही कहाणी आहे. ऑफ्रेड, जिचे वास्तवातील नाव जून असते. ती एक मजबूत बांध्याची तरुण स्त्री असते. आपला पती ल्युक आणि मुलीसह समाधानाने जीवन घालवत असते. देशाचे सत्ताकारण बदलताच ह्या देशांत स्त्रियांना काहीही अधिकार राहत नाहीत. त्यांचे विविध वर्ग करून त्यांची कामे आणि दर्जा ठरवला जात असतो. स्त्रियांची नावं ऑफने सुरू होतात नि ज्याचाशी संग करायचा त्याच्या नावाचा अंश जोडला जातो. मासिक पाळीच्या नंतर ठरावीक दिवशी तिला कमांडरकडे शय्यासोबातीला जावे लागते. तिथे त्याची बायको सेरेना उपस्थित असते. ती स्वत: धार्मिक गीत गाणारी – भक्तिसंगीत, भजने गाणारी असते आणि पारंपरिक मूल्यांवर तिचा पक्का विश्वास असतो. कार्यभाग सपल्यावर तिला ठरावीक जागी राहावे लागते. तिला फक्त बाजारहाटासाठी बाहेर जायची परवानगी असते. 'आय' ही हेरगिरी करणारी व्यवस्था तिच्यासारख्या स्त्रियांवर नजर ठेवून असते. वास्तविक जूनची (तिचे मूळ नाव) आई एकल माता असते. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीत अग्रेसर असते. आता त्या लोकांना भूमिगत राहून काम करावे लागते. या कादंबरीची रचना नायिकेचे निवेदन आणि लेखिकेचे निवेदन अशा पातळीवर आहे. गीलीयाड राज्यव्यवस्थेतेत स्त्रियांना नोकरी करायचा आणि आपली संपती ठेवायचा अधिकार नसतो. जून, ल्युक आपल्या मुलीसह कॅनडाला पळून जायचा प्रयत्न करतात, पण पकडले जातात. त्यानंतर जूनला पती आणि मुलगी यांचे काय झाले हे कळत नाही.

तिला आणि तिच्यासारख्यांना एका आधुनिक अभ्यास–वर्गाला जावे लागते जिथे नियमितपणे बायबलचे पाठ पढवले जातात. जिथे स्त्रियांनी पुरुषाच्या आज्ञेत राहण्याने तिला समजात आदरसन्मान मिळतो हे बिंबवले जात असते. कमांडरबरोबर सेक्स झाल्यावर नियमितपणे तिला वैद्यकीय तपासण्या करवून घ्याव्या लागतात. परंतु तिला दिवस जात नाहीत. तेव्हा सेरेना विचार करते की बहुधा कमांडरच वंध्य असावा. सेरेना सुचवते की ऑफ्रेडने निकशी संग करावा आणि होणारे मूल हे कमांडरचे म्हणून सांगावे. निक हा त्यांचा तरुण वाहन चालक असतो. त्याबदल्यात ती ऑफ्रेडला तिच्या मुलीचा फोटो दाखवेल. ओह! म्हणजे सेरेनाला आपल्या मुलीचा ठावठिकाणा पहिल्यापासूच माहीत होत तर! या कल्पनेने आफ्रेड थरारते, चिडते, पण काय करणार. क्वचित बाहेर जायला मिळते त्यात तिला तिच्या बालमैत्रिणीचा पत्ता लागतो. पण ती मैत्रीण बंड करते त्याचे फळ तिला गळफास लावून आत्महत्या करून घ्यावे लागते. मुळात हे नि:संतान होणे हे वातावरणातील बदलाने घडत असते. स्त्री पुरुषांच्या जननक्षमतेवर

रासायनिक प्रदूषणाचा विपरीत परिणाम होत असतो.

ऑफ्रेडला नवऱ्यापासून दूर केले जाते. देशचालक सांगतील त्याच्याशी शय्यासोबत करून मुलांना जन्माला घालावे लागते. ती मुलेही त्यांच्यापासून दूर केली जातात. आचारविचारावर कडक बंधने येतात. सतत त्यांच्यावर नजर ठेवली जात असते. कुणाशी, कितीवेळ त्या बोलतात, कुठे जातात अशा हालचालीवर राजकीय सत्तेचे नियंत्रण असते. अशा प्रकारची कामे कराव्या लागणाऱ्या तरुणींना लाल रंगाचा पोशाख, डोक्यावर पांढऱ्या रंगाचे बॉनेट घालावे लागते. त्यांना लिहाय-वाचायची वा स्वतंत्रपणे काही करायची मुभा नसते.

या कादंबरीतील कथन दोन स्तरांवर आहे. एक तर ऑफ्रेडचे नवीन गिलीयाड प्रजासत्ताक अस्तित्वात येण्याअगोदरचे आणि वर्तमानातले. तिचा संपूर्ण कथनात फारसा आक्रमक विरोध दिसत नाही. लेखिकेच्या मते सामान्य माणूस विरोध करू शकत नाही. त्याची ती प्रतीक आहे. पण ती सारे रेकॉर्ड करून ठेवते. ती निकच्या मदतीने देशातून पळताना आपला त्रास ती नोंदवून ठेवते. 'मे डे' ह्या तिची आई काम करत असलेल्या गुप्त संघटना अखेर लोकशाही राज्य परत मिळवतात. त्या निवेदनातून वाचकाला ह्या दडपशाही सत्तेचे स्वरूप ध्यानात येऊ लागते. तिथे होणारे विरोधी स्वर, चळवळी यांचेही दर्शन होते. लेखिका नागरिकांच्या मनोवस्थेचे चित्रण भेदक रितीने करते. 'द हँडमेड्स टेल' कथेत सर्व नागरी हक्क नष्ट झालेल्या समाजात अन्यायकारक पुरुषसत्ताक जीवन कसे असेल, स्त्रियांवर किती दडपणं असतील ह्याची झलक मिळते. सामान्यांच्या जीवनावर सत्ता कशी, किती प्रकारे मुस्कटदाबी करू शकते हे दिसते. ह्यातूनही नागरिक कसे तग धरतात, बंड करतात त्यांचे त्यांना जरबेत ठेवण्याचे कसे प्रयत्न होतात याचे दर्शन होते. जगात अशा प्रकारे आपल्या लोकांना हतबल करायचे, त्यांचे जगणे असह्य करायचे प्रयत्न राजकीय सत्ताधारी करताना दिसतात. त्याचा विरोध जागरूक नागरी संघटना प्राणपणाने करताना दिसतात. ह्या कादंबरीने अपेक्षित परिणाम घडवला होता. साहजिकच ह्या पुस्तकावर उदारमतवादी देशातही बंदी आली.

वारंवार तिच्या आणि इतरांच्या पुस्तकावर घातल्या जाणाऱ्या बंदीमुळे तिने २०२२मध्ये चक्क आपल्या पुस्तकावर आगीचा लोळ सोडला. 'द हँडमेड्स टेल' ह्या कांदबरीला स्वत:च जाळायचा प्रयत्न केला. पण ते पुस्तक जळले नाही. कारण ते अग्निरोधक होते. जळेल कसं? मग हा काय प्रसिद्धीचा स्टंट होता का? तसे लोकांना वाटले तर नवल नव्हते. वास्तविक ह्या कांदबरीला प्रसिद्धीची गरज नव्हती. प्रसिद्ध झाल्यापासून ती चर्चेत होती. तिच्यावर चित्रपट, ऑपेरा, टीव्ही शो, सिरियल आल्या आहेत नि तुफान चालल्या आहेत. ह्या तसेच इतर अनेक लिखाणावर कट्टरपंथीय सत्तेचा वापर आणि आपले पुरुषसत्ताक विचार समाजावर लादायचे प्रकार जगभर अनेक ठिकाणी सुरू असतात. त्यांना न पटणाऱ्या विचारांचे ललित साहित्य त्यांना समाजात जाऊच द्यायचे नसते. त्या विरोधात राजकीय, सामाजिक, धार्मिक सत्ता वापरून बंदी आणली जात असते. आपणही हे अनुभवत आहोतच. अशा वेळी आपल्याला जॉर्ज ऑरवेलच्या १९८४ ह्या कांदबरीची आठवण झाली तर नवल नाही. सर्वंकष सत्ता किती दमन करू शकते हे कळले होते. आदर्श जगाच्या कल्पनेला दुजोरा देणाऱ्या लेखनाला युटोपीयन तर सर्वंकष सत्तेने काय होऊ शकते याचा वेध घेणाऱ्या लेखनाला डिस्टोपियन लेखन म्हटले जाते. या विरुद्धचा आवाज म्हणू पेंग्विन रँडोम प्रकाशन आणि 'पेन' ह्या लेखकांच्या जागतिक संघटनेने एकत्र येऊन अनबर्नेबल बुक्सची कल्पना मांडली. अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरील घाला अशाने होणार नाही हेच सांगायचा हा प्रयत्न होता.

हाच तो काळ आहे जेव्हा स्त्रीमुक्ती चळवळ जोरात होती. ॲटवूड ह्या लढ्यात अग्रेसर होती. तिच्या ह्या कादंबरीत पुरुषसत्ताक समाजात किती क्रूरपणे स्त्रीवर बंधने येऊ शकतील ह्याचे दर्शन घडते. आपल्याकडेच नव्हे तर अमेरिकेसारख्या देशातही लोकांच्या भावना दुखावत असतात. तिथेही इस्लाम आणि ख्रिश्चन विचारांवर हा हल्ला आहे असे आरोप होऊ लागले. अपरिहार्यपणे बंदी आणली गेली. लेखिकेला धमक्या येऊ लागल्या. अनेक विद्यापीठांत पुस्तकावर बंदी तर अनेक ठिकाणी त्याचे स्वागत होत होते. अमेरिकेत २०२२ साली १५८६ पुस्तकावर बंदी होती. विचारस्वातंत्र्याचा झेंडा हाती घेतलेला समाज धार्मिक वा सामाजिक दडपणाला कसा बळी पडतो हेच अशा घटना दर्शवतात. ॲटवूडने वयाच्या ८३व्या वर्षी आपले पुस्तक अग्निपरीक्षा द्यायला सिद्ध असल्याचे प्रतीकात्मकरीत्या दाखवले आहे. ज्या पुस्तकात विनाधार तथ्य मांडले असेल त्यावर वा सरळ भडकावू लेखन असेल तर त्याला चाप हवा. पण हे ठरवणार कोण? ज्याला हा अधिकार असेल तो / ती त्याचा दुरुपयोग करताना दिसते. ह्या कांदबरीचा या अग्निरोधक आवृत्तीचा पेंग्विन रँडमने लिलाव सुरू केला होता. अर्थातच तो मर्यादित काळापर्यंत होता. तिच्या लेखनात आधुनिक काळातील बाजारीकरणाबद्दलची हताशा, त्याने आपले जीवन व्यापून टाकणे आणि लोकांनी जणू स्वखुशीने त्यात सामील होणे, हे दाखवले आहे. आज विकासनशील देशात कुटुंबनियोजनासारखा विचार लोकांत झिरपत नाही पण शांपूचे लगेच स्वागत होते. माणसाला गुलाम बनवायचे साधन ह्या मार्केटिंगतंत्राने साध्य केले आहे. ज्याच्यातूनच अनिर्बंध हव्यास पसरला आहे आणि ह्या पृथ्वीला अमर्याद ओरबाडणे सुरू आहे. परिणाम क्लायमेट चेंजने माजवलेला हाहाकार समोर येत आहे.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com



राजीव श्रीखंडे

# द ब्रिज ओव्हर द ड्रायना – इव्हो अँड्रिक

## The Bridge Over the Drina by Ivo Andric

**जगप्रसिद्ध** युगोस्लाव्हियन नोबेल पारितोषिकप्राप्त लेखक इव्हो अँड्रिकचा जन्म ९ ऑक्टोबर १८९२ रोजी ट्रॅव्हनिक प्रांतातल्या डोलॅक इथे झाला. इव्हो त्यांचा एकुलता एक मुलगा. तो दोन वर्षांचा असतानाच त्याच्या वडिलांचा क्षयाने मृत्यू झाला. पती गमावलेल्या, पैसे नसलेल्या त्याच्या आईने इव्होला तिच्या नणंदेकडे विसगार्ड (Visegrad) इथे ठेवले. नणंदेचा नवरा पोलीस अधिकारी होता आणि त्यांना मूल नव्हते. इव्हो त्यांच्याकडेच वाढला.

वयाच्या दहाव्या वर्षी त्याला शिष्यवृत्ती मिळाली आणि तो सर्जेव्होला (Sarajevo) राहायला गेला. त्याची आई तिथेच काम करत होती, त्यामुळे तो तिच्याजवळच राहिला. इव्होला शिक्षणात बऱ्याच अडचणी आल्या. तो सहावीत नापास झाला. परीक्षेतल्या कमी गुणांमुळे त्याला शिष्यवृत्ती गमवावी लागली. त्याची भाषाशास्त्रात मात्र उत्तम प्रगती होत होती. मुख्यतः लॅटिन, ग्रीक आणि जर्मन या भाषांत. त्याचे एक शिक्षक प्रसिद्ध कवी Tugomir Alouporic हे होते. पुढे त्यांच्यात ऋणानुबंध वाढला.

लेखक व्हायची इच्छा इव्होच्या मनात प्रबळ होत चालली होती. तो माध्यमिक शाळेत असतानाच त्याने लिहिण्यास सुरुवात केली खरी, पण त्याच्या आईकडून त्याला काहीच उत्तेजन मिळाले नाही. इव्होने आपल्या दोन कविता प्रथम १९११ मध्ये प्रसिद्ध केल्या त्या Bosnian Fairy या नियतकालिकात. पहिल्या महायुद्धाच्या आधी त्याच्या कविता, त्याचे निबंध, समीक्षांचे लेख आणि भाषांतरे अनेक वेगवेगळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाले. प्रसिद्ध स्वीडिश लेखक August Strindberg, प्रसिद्ध अमेरिकन कवी Walt Whitman यांच्या कलाकृती इव्होने भाषांतरित केल्या.

१९०८ मध्ये ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याने बोस्निया (Bosnia) आणि हरजेगोव्हिना (Herzegovina) यांच्यावर सत्ता स्थापन केली. त्यामुळे स्थानिक लोकांत असंतोषाचा भडका उडाला. सर्ब-क्रोट यांच्या एकीकरणासाठी कार्यरत असणाऱ्या एका गुप्त संघटनेचा पहिला अध्यक्ष म्हणून इव्होची निवड झाली. साम्राज्याने त्यांच्यावर दडपशाहीचे हत्यार उचलले. अनेकांना महाविद्यालयातून निलंबित करण्यात आले, काहींना तुरुंगवासही घडला. सुदैवाने या सगळ्यातून इव्हो अँड्रिक सहीसलामत बाहेर पडला.

अँड्रिकने १९१२ मध्ये झाग्रेब विद्यापीठात प्रवेश घेतला. तिथेही त्याने विद्यार्थी चळवळीत भाग घेतला. १९१३ मध्ये तर विद्यापीठाने त्याला ताकीदही दिली. मग त्याने व्हिएन्ना विद्यापीठात आपली बदली करून घेतली. तिथे युगोस्लाव्हियन एकीकरणाच्या चळवळीत त्याने हिरिरीने भाग घेतला.

व्हिएन्नात असतानाच तो क्षयरोगाने आजारी पडला. त्याला विद्यापीठाने सांगितले की त्याने आपला अभ्यासक्रम दुसऱ्या कुठल्याही विद्यापीठात पूर्ण करावा. काही विचाराअंती त्याने १९१४ मध्ये Krakow येथील Jagiellonian विद्यापीठात प्रवेश मिळवला. हे सगळे होत असताना त्याचे लिखाण मात्र सतत अनेक नियतकालिकांत प्रसिद्ध होतच होते.

२८ जून १९१४ रोजी Gavirilo Princep या Bosnian तरुणाने ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याच्या युवराजाचा म्हणजेच Archduke Franz Ferdinand याचा खून केला. Princep हा इव्होचा जवळचा मित्र होता. त्यामुळे हे समजताच त्याने झाग्रेब सोडले आणि तो बोस्नियाला परतण्यासाठी निघाला. तो Split या किनाऱ्यावर वसलेल्या शहरात त्याच्या एका मित्राबरोबर राहिला. तोपर्यंत राजकीय परिस्थिती फारच चिघळली होती आणि पहिल्या महायुद्धाला सुरुवातही झाली होती. Split मध्येच देशविरोधी कारवाई केल्याच्या आरोपावरून त्याला अटक झाली. पुढे त्याला Moribar येथील तुरुंगात हलवले गेले. क्षयरोगाने तब्येत खालावलेल्या अवस्थेत त्याने तुरुंगातला काळ वाचनात आणि नवीन भाषा शिकण्यात घालवला.

२० मार्च १९१५ रोजी कुठल्याही पुराव्याअभावी

त्याच्यावरचा खटला मागे घेतला गेला आणि त्याची सुटका झाली. पुढे त्याची Zenica येथील तुरुंगात रवानगी करण्यात आली. १९१८ साली त्याची सुटका झाली आणि तो Visegard या त्याच्या मूळच्या गावी परतला. पुढे त्याची तब्येत परत बिघडली आणि तो झाग्रेबला गेला. १९१८ मध्ये Ex Ponto हे त्याचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.


पहिल्या महायुद्धाच्याशेवटी ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याची शकले झाली आणि युगोस्लाव्हिया या देशाचा नंतर जन्म झाला. इव्होने झाग्रेबमध्ये आपल्या अभ्यासास पुन्हा सुरुवात केली. पण १९१९ मध्ये त्याची तब्येत पुन्हा ढासळली. त्याचा पूर्वीचा शिक्षक laupovic आता नवीन देशाचा मंत्री झालेला होता आणि त्याच्या मदतीने इव्हो परत Split या शहरात परतला आणि तिथे त्याने सहा महिने काढले. तिथेच त्याने Nimvi हे त्याचे दुसरे पुस्तक प्रकाशित झाले. नंतर त्याची Ministry of Religion मध्ये सचिवपदी नेमणूक झाली. तो त्याप्रमाणे Belgrade ला गेला.

बेलग्रेडमध्ये त्याला चांगलीच प्रसिद्धी मिळाली, त्याचे लिखाण सुरूच होते. १९२३ साली त्याची Graz या शहरी Vice-Consul म्हणून बदली करण्यात आली. तिथे त्याने Graz विद्यापीठात नाव नोंदवले आणि आपल्या अभ्यासास परत सुरुवात केली. १९२४ साली त्याने PhD ही पदवी मिळवली. पुढे त्याच्या दूतावासातील नोकरीमुळे त्याची अनेक देशांतल्या दूतावासांत बदली झाली. पुढे, १९३७ मध्ये त्याची युगोस्लाव्हियाच्या पंतप्रधानांचा स्वीय साहाय्यक म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याच वर्षी फ्रान्सने इव्हो अँड्रिकला Order of the Legion of Honour हा त्यांचा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरव केला.

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या सुमारास अँड्रिक युगोस्लाव्हियाचा राजदूत म्हणून जर्मनीत होता. युद्ध सुरू झाल्यावर तो जर्मनीने ताबा घेतलेल्या बेलग्रेड शहरात आला. दुसरे महायुद्ध संपेपर्यंत तो तिथेच नजरकैदेत राहिला, आपल्या एका मित्राच्या घरी. इथेच त्याने आपल्या कारकिर्दीतील अतिशय महत्त्वाची पुस्तके लिहिली, ज्यात The Bridge Over the Drina या कादंबरीचा समावेश आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर मार्शल टिटोने युगोस्लाव्हियामध्ये कम्युनिस्ट राजवट प्रस्थापित केली. त्याच्या राजवटीत त्याची अनेक नामधारी पदांवर नेमणूक केली गेली. १९६१ मध्ये त्याला साहित्याचे नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यानंतर तो आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झाला आणि त्याच्या पुस्तकांची अनेक भाषांत भाषांतरे झाली. पुढे त्याला त्याच्या देशातली अनेक पारितोषिकेही मिळाली. त्याची प्रकृती मात्र ढासळत चालली होती आणि अखेर १३ मार्च १९७५ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी त्याचा मृत्यू झाला.

इव्हो अँड्रिकच्या मृत्यूनंतर तो बेलग्रेडमध्ये ज्या घरात दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान राहत होता त्या घराचे त्याच्या स्मरणार्थ एका म्युझियममध्ये रूपांतर करण्यात आले. युगोस्लाव्हियाचा एकमेव नोबेल पारितोषिक विजेता म्हणून त्याला चांगलाच मान मिळाला.






इव्हो अँड्रिक

आता मी The Bridge Over the Drina या कादंबरीकडे वळतो.

ऑटोमन साम्राज्यात या कथेला सुरुवात होते. एका लहान सर्बियन मुलाला त्याच्या आईकडून विभक्त केले जाते. ऑटोमन साम्राज्यात ख्रिश्चन मुलांना असे करण्याची पद्धत ५०० वर्षांपासून चालत आलेली असते. या मुलाला Drina नदीतून फेरीतून पैलतीरावर नेले जाते. शेवटपर्यंत विलाप करत तिथपर्यंत आलेल्या त्याच्या आईला तो दिसेनासा होतो आणि मग आयुष्यात परत कधीच दिसत नाही.

त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या मुलाला इस्लाम धर्माची दीक्षा दिली जाते आणि त्याचे नाव मोहम्मद पाशा सोकोलोव्हिक असे ठेवले जाते. ऑटोमन साम्राज्याच्या लष्करात त्याला दाखल केले जाते. त्याच्या कर्तबगारीमुळे त्याला लष्करात नेहमी बढती मिळत जाते आणि वयाच्या साठाव्या वर्षी त्याची Grand Vizier म्हणून नेमणूक केली जाते. या पदावर तो पंधरा वर्षे राहतो. त्याच काळात तो तीन सुलतानांसाठी काम करतो आणि ऑटोमन साम्राज्य मध्य युरोपात विस्तारण्यास मोठे योगदान देतो. मात्र त्याला त्याच्या आईपासून झालेल्या ताटातुटीचा कधीच विसर पडलेला नसतो. शेवटी तो Drina नदीवर जिथे त्या दोघांची ताटातूट झालेली असते तिथे एक पूल बांधण्याचा हुकूम देतो.

या पुलाचे काम १५६६ मध्ये सुरू होते आणि पाच वर्षांनी हे बांधकाम पूर्ण होते. हा पूल बोस्नियाचा एक प्रांत आणि बाकीचे ऑटोमन साम्राज्य यांच्यातला दळणवळणाचा

एक महत्त्वाचा दुवा बनतो. या पुलाचे बांधकाम गुलामांनी केलेले असते. बांधकाम चालू असताना अनेक घटना घडतात. कधी हे गुलाम बंडही करतात, पण ते नेहमीच चिरडले जाते. या पुलाच्या मध्य भागाची रुंदी जास्त असते आणि हा मध्य भाग लोकांना एकमेकांना भेटायला, बोलायला अतिशय उपयुक्त ठरू लागतो. स्थानिक लोकांच्या आयुष्यात या पुलाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते.

जसा जसा काळ जाऊ लागतो, तसतशा या पुलासंबंधी अनेक दंतकथा प्रचलित होऊ लागतात. स्थानिक लोकांची या दंतकथांवर खूपच श्रद्धा असते. साधारणतः एका शतकानंतर Halasburg राजघराणे मध्य युरोप आणि बाल्कन प्रदेश ऑटोमन साम्राज्याकडे परत मिळवते. या प्रांताकडे राजसत्तेचे दुर्लक्ष होते पण हा पूल इतका भक्कम बांधलेला असतो की तो तसाच कायम रहातो. विसेग्राड गावाजवळ हा पूल असतो आणि Drina ला जेव्हा जेव्हा पूर येतो तेव्हा त्या गावातले वेगवेगळ्या वंशांचे म्हणजेच तुर्क, सर्ब, ज्यू रहिवासी नेहमीच एकमेकांना साहाय्य करतात.

एकोणिसाव्या शतकात राष्ट्रीयत्वाची चळवळ सर्बियात सुरू होते. या पुलावर तुर्की शासन एक ब्लॉकहाऊस बांधते आणि तिथे या चळवळीत भाग घेतल्याचा ज्यांच्या ज्यांच्यावर संशय असतो अशा सर्वांना ठार मारले जाते. त्यांची शिरे ते त्या ब्लॉकहाऊसच्या भोवताली लाकडी खांब उभे करून त्यावर खोचून ठेवतात. एका संध्याकाळी हे Blockhouse आगीत भस्मसात होऊन जाते. ऑटोमन साम्राज्याच्या उतरणीचा काळ चालू होतो. १८७८ मध्ये बर्लिनमधील चर्चेनंतर सर्बिया आणि Montenegro हे स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात येतात. पुढे ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य या भागाचा ताबा घेतात आणि त्या साम्राज्याचा हा भाग एक प्रांत बनतो. यामुळे या गावातील लोकांना फार मोठा धक्का बसतो.

स्थानिक लोकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याच्या शासनाच्या धोरणाप्रमाणे होत जाणारे अनेक बदलही त्यांना स्वीकारावे लागतात. या काळात अनेक परदेशी लोकांचे या गावात आगमन होते. ते त्यांच्याबरोबर अनेक नवीन संकल्पना आणतात. कामगार संघटना, समाजवाद याबद्दल गावात बोलणे होऊ लागते. गावात नवीनच स्थापन झालेली वृत्तपत्रे मात्र राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करत असतात. हे गाव आता वेगवेगळ्या नवीन अनुभवांना सामोरे जात असते.

ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याची सम्राज्ञी एलिझाबेथची १८९८ मध्ये हत्या होते आणि समाजात प्रचंड तणाव निर्माण होतो. पुढे १९०८ मध्ये ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य अधिकृतरीत्या बोस्निया आणि झर्सेगोविनिया-हरजेगोव्हिनिया आपली सत्ता स्थापन करते. यामुळे सर्बिया आणि ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्यामध्ये बेबनाव सुरू होतो. बाल्कनवर कब्जा करणे हा ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचा हेतू असतो. सर्बियाचा त्यांना मोठाच अडथळा निर्माण झालेला असतो. पुढे १९१२-१३ मध्ये बाल्कन युद्ध सुरू होते, ज्यात ऑटोमन साम्राज्याची बाल्कनमधून पूर्णपणे हकालपट्टी होते. यामुळे ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य आणि सर्बिया यांच्यामधील संबंध आणखी बिघडतात. Drina नदीवरच्या पुलाचा मध्य भाग आता ओस पडू लागतो, कारण गावातले वेगवेगळ्या वंशांचे रहिवासी आता एकमेकांकडे संशयाच्या नजरेने पाहू लागतात. त्यांचा एकमेकांवरचा विश्वास ओसरू लागलेला असतो.

जून १९१४ मध्ये सर्बियन विद्यार्थी Gavirito Prince P हा ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचा Archduke Franz Ferdinandची Sarajevo मध्ये हत्या करतो. त्यानंतर अनेक घटना जलदगतीने घडतात. ज्यांचे पर्यवसान पहिले महायुद्ध सुरू होण्यात होते. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य सर्बियाशी युद्ध सुरू करते. Visegrad गावातील शासनाचे अधिकारी गावातल्या इतर लोकांना गावातील सर्व रहिवाशांविरुद्ध चिथवायला सुरुवात करतात. Drina वरच्या पुलाला अचानक फार महत्त्व प्राप्त होते, कारण फक्त रेल्वेद्वारे सगळे सैन्य आणि त्यांची सामग्री यांची ने-आण करणे शक्य नसते. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याची सर्बियावरची चढाई सर्बियन कडवेपणे लढून परतून लावतात. सर्बियन सैन्य Drina नदीवरून पुढे चढाई करू लागते त्यामुळे ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचे सैन्य Visegrad मधून माघार घेते आणि हे करताना ते Drina नदीवरच्या पुलाचा बराचसा भाग उद्ध्वस्त करते.

इथेच ही कादंबरी संपते.

इव्हो अँड्रिकची ही असामान्य कादंबरी जवळजवळ चारशे वर्षांच्या कालखंडाचे चित्रण करणारी आहे. त्याने या कादंबरीची रचना अनोख्या रितीने केलेली आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली ही कादंबरी असली तरी तिचा पोत फार वेगळा आहे. ही कथा एक निनावी निवेदक आपल्याला सांगत आहे. त्याला सर्वशक्तिमान काळच म्हणा ना. ही कथा कथन करताना इव्हो अँड्रिकने मुख्यतः दोन कालखंडांवर अधिक भर दिला आहे - ऑटोमन साम्राज्याचा कालखंड आणि ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचा कालखंड. या पुलाच्या बांधकामाचे अतिशय तपशीलवार वर्णन त्याने प्रथम केलेले आहे. त्या वेळी घडणाऱ्या अनेक घटना - बांधकामातील समस्या, बांधकामाविषयी गावातल्या लोकांना वाटणारे कुतूहल आणि त्यातून निर्माण होणारी अनामिक भीती, बांधकामादरम्यान गुलामांचे होणारे बंड आणि ते चिरडण्यातील तुर्कांची क्रूरता, त्यांच्या भयंकर शिक्षा - हे सगळेच त्याने प्रभावीपणे कथन केले आहे.कादंबरीचा जवळजवळ एकतृतीयांश भाग या

पुलाच्या बांधकामाने व्यापलेला आहे. नंतर मग ॲस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याच्या कालखंडाचे चित्रण आहे. हा एवढा मोठा कालखंड आपल्यासमोर इव्हो अँड्रिकने अतिशय ताकदीने उभा केलेला आहे. हे एक शिवधनुष्यच आहे आणि ते त्याने लीलया पेलले आहे. त्याच्या लेखणीच्या थोरवीची आपल्याला सतत जाणीव होत रहाते.

या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे रूढ अर्थाने या कादंबरीला कोणीही नायक नाही, पण या कादंबरीला एकसंध रूप दिले आहे ते केवळ Drina नदीवरच्या या पुलानेच. एका अर्थी हा पूलच या कादंबरीतली मुख्य व्यक्तिरेखा आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. शेवटी हा पूल ही एक प्रतिमाच आहे आणि इव्हो अँड्रिकने या पुलाचा प्रतिमा म्हणून फार कौशल्याने वापर केलेला आहे. त्याच्या कथनशैलीचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या कालखंडात या पुलाचे महत्त्व, संदर्भ बदलत जातात. होणारे बदल काहीही वेगळे न सांगता केवळ कादंबरीच्या कथेतून ठळकपणे आपल्यासमोर मांडण्याचे जबरदस्त सामर्थ्य त्याच्या कथनशैलीत आहे. त्याची भूमिका शेवटी एका निरीक्षकाचीच आहे हेही तो काही वेगळे न सांगता अगदी सहजच अधोरेखित करतो. त्याचा सूर अतिशय तटस्थ आहे, त्यात कुठलीही भावनावशता नाही. त्यामुळेच या कादंबरीला एक फार वेगळेच परिमाण मिळालेले आहे!

इव्हो अँड्रिकच्या भाषेत एक विलक्षण शक्ती आहे. हा निनावी कथानिवेदक हा भलामोठा कालखंड आपल्यासमोर उलगडून दाखवतो आहे, त्यामुळे या भाषेत एक सहजताही आहे. मधूनमधून घडणाऱ्या प्रसंगांवर निवेदकाच्या टिप्पणीही आहेत. कधीकधी व्याजोक्तीही आपल्याला सापडते, व्यक्तिरेखांच्या भावविश्वांचे वर्णन करतानादेखील अँड्रिकची भाषा आपला तटस्थ सूर कधीच सोडत नाही. हे या कादंबरीचे एक प्रमुख बलस्थान आहे असेच म्हणावे लागेल.

अँड्रिक हा प्रचंड कथाअवकाश आपल्यापुढे इतक्या विलभनीय रितीने सादर करतो की आपण त्यात पार गुंगून जातो. वेगवेगळ्या कालखंडांतल्या काही प्रसंगांचं तपशीलवार वर्णन, निवेदकाने त्या कालखंडांतल्या एकंदर परिस्थितीवर केलेले भाष्य अशी साखळी निर्माण करत इव्हो अँड्रिक ही कथा आपल्याला सांगतो. हा काळाचा सतत वाहता प्रवाह आपल्याला जाणवत तर राहतो. ही किमया अँड्रिकच्या असाधारण प्रतिभेची आहे! या सगळ्या स्थित्यंतराचा Visegrad गावावर होणारा परिणाम हेच या कथानकाचे मुख्य सूत्र आहे आणि Drina नदीवरचा पूल Visegrad गावाची जणू ओळखच आहे.

या कादंबरीत संवाद कमीच आहेत, पण ते इतक्या खुबीने त्याने या कादंबरीत पेरले आहेत की ते ते प्रसंग आपल्यासमोर मूर्तिमंत उभे राहतात. वेगवेगळ्या कालखंडांतल्या वेगवेगळ्या प्रसंगांत संवादांची भाषा त्यानुरूप बदलण्याचे भानही त्याने अतिशय नेमकेपणाने ठेवलेले आहे.

या कादंबरीत व्यक्तिरेखा खूप आहेत, वेगवेगळ्या कालखंडातील वेगवेगळ्या व्यक्ती या कादंबरीत आहेत. अगदी मोजक्या शब्दांनीशी त्याने त्या सगळ्याच व्यक्तिरेखा त्यांच्या वेगवेगळ्या भावविश्वांसकट ताकदीने रेखाटल्या आहेत. मात्र या कादंबरीचा खरा नायक म्हणजे Drina नदीवरचा पूल! आपल्या विलक्षण प्रतिभेच्या साहाय्याने अँड्रिकने या पुलाला कादंबरीच्या प्रमुख व्यक्तिरेखेचेच रूप दिलेले आहे. वेगवेगळ्या कालखंडांना, त्यातील विविध प्रसंगांतील, अनेक माणसांना एकत्र बांधून ठेवणारा हा पूलच आहे. या सगळ्या इतिहासाचा तो एकमेव साक्षीदार आहे.

रसिकहो, ही कादंबरी प्रकाशित झाली १९४७ साली. ती इव्हो अँड्रिकच्या मायदेशात लगेच लोकप्रिय झाली तरी तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळाली ती त्याला १९६१ साली नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतरच. बाल्कन देशांच्या इतिहासावरचे त्याचे हे भाष्य फार महत्त्वाचे आहे हे आता जगन्मान्य झालेले आहे. २०११ मध्ये सर्बियन चित्रपट निर्माता एमिर कुस्तुरीकाने या पुलाच्या जवळच Andricgrad नावाचे एक कृत्रिम गाव निर्माण करायला सुरुवात केली आणि २०१४ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला. बाल्कन देशांच्या राजकारणावर भाष्य करताना अनेक दिग्गज या कादंबरीचा आवर्जून उल्लेख करतात.

पूर्णत: ऐतिहासिक गोष्टींवर आधारलेली तरीही ऐतिहासिक नसलेली ही जबरदस्त कादंबरी बाल्कन देशांच्या ४०० वर्षांच्या इतिहासाचा जणू दस्तऐवजच आहे. इव्हो अँड्रिकची ही असामान्य कादंबरी जागतिक वाङ्मयात आज एक क्लासिक म्हणून सर्वमान्य झालेली आहे.

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com

॥ग्रंथाली॥




**नांदगाव ते लंडन**

**भास्कर कदम**

**(प्रवासवर्णन)**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# 'कृतज्ञ मी... कृतार्थ मी' – एक हृद्य सोहळा

अशोक सराफ यांच्या 'मी बहुरूपी' पुस्तकाच्या निमित्ताने, अशोक आणि निवेदिता सराफ व सुभाष सराफ यांच्या पुढाकाराने आणि ग्रंथालीच्या सहकार्याने 'कृतज्ञ मी... कृतार्थ मी' हा सोहळा नुकताच पार पडला. 'रंगभूमीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या वयोवृद्ध कलाकार–तंत्रज्ञांना आपण एक भेट द्यावी म्हणून आम्ही त्यांचा सन्मान केला आहे. त्यांना सराफ कुटुंबाने केलेली मदत नसून एक भेट आहे. यामुळे त्यांना काही मदत झाली तर आम्हाला खूप आनंद होईल', अशा भावना या सोहळ्यात बोलताना ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी व्यक्त केल्या. यावेळी कलाकार आणि तंत्रज्ञांना प्रत्येकी ७५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

शिवाजी पार्क येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. यावेळी अशोक सराफ, अभिनेत्री निवेदिता सराफ, सुभाष सराफ, सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, अल्कॉन एंटरप्रायझेसचे अध्यक्ष अनिल खंवटे आणि डॉ. संजय पैठणकर उपस्थित होते. यावेळी सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर यांनी सराफ कुटुंबीयांनी योजलेल्या या कार्यक्रमामागील भावनेबद्दल गौरवोद्गार काढले. डॉ. संजय पैठणकर खास या कार्यक्रमासाठी दुबईहून आले होते. त्यांनीही अशा कामाला नेहमीच साथ असेल असे सांगितले.

अशोक सराफ यांची कारकीर्द संगीत नाटकांतून सुरू झाली. त्यांचे मामा नटश्रेष्ठ, दिग्दर्शक गोपीनाथ सावकार यांच्या 'ययाती आणि देवयानी' या नाटकात विदूषक साकारून त्यांनी नाट्यमंचावर प्रवेश केला. आज अस्तंगत होत चाललेल्या संगीत नाटकांबद्दलही कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याला नाट्यसंगीताची जोड होती. श्रीरंग भावे आणि मानसी फडके–केळकर यांनी नाट्यगीते सादर केली. अरुण जोशी यांची संहिता असलेल्या या कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन अभिनेते अतुल परचुरे आणि डॉ. मृण्मयी भजक यांनी केले. साई बँकर यांचा तबला आणि निरंजन लेले यांच्या ऑर्गनची बहारदार साथ गाण्यांना लाभली.

सन्मानाला उत्तर देताना अर्चना नाईक यांना गहिवरून आले. सुरेंद्र दातार यांनी काही आठवणी जागवत हा सन्मान केल्याबद्दल आभार व्यक्त केले. तर पुष्पा पागधरे यांनी 'इतनी शक्ती हमें देना दाता' या गाण्याच्या ओळी गाऊन रसिकांना मुग्ध केले. कार्यक्रमात 'मी बहुरूपी' पुस्तकाच्या निर्मितीत भरीव योगदान देणाऱ्या मीना कर्णिक (शब्दांकनकार), नूतन आजगावकर (मुखपृष्ठ व मांडणी), नितीन चिटणीस (छायाचित्र) तसेच एका महत्त्वपूर्ण सोहळ्याच्या आयोजनाबाबत निवेदिता सराफ व सुभाष सराफ यांचा 'ग्रंथाली'च्या वतीने सन्मान करण्यात आला.



अतुल परचुरे
आणि
डॉ. मृण्मयी भजक



निवेदित सराफ व धनश्री धारप



अर्चना नाईक



सुरेंद्र दातार



पुष्पा पागधरे

या सोहळ्यात उपेंद्र दाते (अभिनेते), सुरेश ऊर्फ बाबा पार्सेकर (नेपथ्यकार–प्रकाशयोजनाकार), अर्चना नाईक (अभिनेत्री), वसंत अवसरीकर (अभिनेते), दीप्ती भोगले (गायिका–अभिनेत्री), नंदलाल रेळे (ध्वनिसंयोजक), अरुण होर्णेकर (दिग्दर्शक–निर्माते), प्रकाश बुद्धिसागर (दिग्दर्शक), पुष्पा पागधरे (पार्श्वगायिका), वसंत इंगळे (अभिनेते), सुरेंद्र दातार (संयोजक–निर्माते), किरण पोत्रेकर (लेखक–दिग्दर्शक), शिवाजी नेहरकर (लोकनाट्य कलावंत), हरीश करदेकर (नाट्य–कलावंत), सीताराम कुंभार (नेपथ्य व्यवस्थापक), विष्णू जाधव (नेपथ्य साहाय्यक), एकनाथ तळगावकर (नेपथ्य साहाय्यक), विद्या पटवर्धन (अभिनेत्री), उल्हास सुर्वे (नेपथ्य साहाय्यक) यांना सन्मानित करण्यात आले. •



किरण येले

# कवी आणि अनुवादक विकास पालवे

**कविता** लिहिणे सोपे असते असा काहींचा समज आहे. याचे कारण कदाचित हे असेल की कविता कुठेही, कधीही लिहिली जाते. कविता लिहिण्यास बैठक मांडावी लागत नाही, कवितेचे काही तंत्र नाही, त्यामुळेच कदाचित प्रत्येक काळात कविता लिहिणारे उदंड झाले. आजही कविता लिहिणाऱ्यांची संख्या तुलनेत जास्त आहे. मात्र त्यात दर्जेदार कविता लिहिणे हे जबाबदारीचे काम आहे हे जाणून कविता लिहिणारे किती आहेत याचा विचार केला तर निराशाजनक उत्तर हाती येईल. या निराशाजनक उत्तराचे कारण असे आहे, की अनेकांचा समज आहे, की कवितेसाठी वाचन लागत नाही, रियाज लागत नाही, अभ्यास लागत नाही. मात्र याच काळात नव्या पिढीत असे काही तरुण आहेत जे कविता हे एक व्रत समजून अनेक वर्षे कवितेची साधना करत आहेत. त्यासाठी फक्त मराठी नाही तर देशीविदेशी अनेक भाषातील कवितांचा अभ्यास करत आहेत, त्या कवितांचे सजगपणे वाचन करत आहेत. आणि त्यातून आपली येणारी कविता वेगळी कशी असेल याचा विचार करत लिहीत आहेत. अशा मोजक्या नावापैकी एक म्हणजे विकास पालवे.

विकास पालवे लोकवाङ्मयगृह या प्रकाशन संस्थेत काही वर्षे संपादन करत होता (पुस्तके आणि दिवाळी अंक). अशा मान्यवर संस्थेत काम करत असताना त्याला ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर यांचा सहवास लाभला. त्यांच्यासोबतच्या चर्चांतून, भेटींतून कविता म्हणजे संपूर्ण भान राखून काळावर गंभीरपणे केलेले सत्य भाष्य असते ही गोष्ट विकास शिकला. इतक्या मोठ्या संस्थेत असताना आणि कवी सतीश काळसेकर यांच्यासारखे मार्गदर्शक असताना कालनिर्णय, दीपावली, पुणे पोस्ट यांसारख्या नामांकित दिवाळी अंकातून कविता प्रकाशित होत असताना, विकास पालवे याला आपला कवितासंग्रह लोकवाङ्मयगृहमधून प्रकाशित करणे सहज शक्य होते, परंतु त्याने कवितासंग्रह प्रकाशित करण्यापेक्षा सातत्याने कविता लिहिणे आणि त्या प्रकाशित करणे महत्त्वाचे मानले आणि त्या दृष्टीने



विकास पालवे

त्याचा प्रवास सुरू राहिला.

विकास पालवे याला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या मान्यवर संस्थेची अनुवादासाठी पहिली फेलोशिप मिळाली. लवकरच त्याचे पहिले पुस्तक अनुवादरूपात आपल्याला पाहायला मिळेल. विकासची साहित्यक्षेत्रात लेखी प्रवेश अनुवादाने झाला असला तरी त्याची प्रमुख ओळख कवी हीच आहे.

विकासची कविता प्रत्येक विषयाकडे नव्या कोनातून पाहते. उदाहरणार्थ, पुढे दिलेल्या पुस्तकाविषयीच्या कवितेत विकासच्या जाणिवा वेगळी परिमाणे घेऊन येतात. कविता पुस्तकाची फक्त भलामण करत नाही तर पुस्तके दुःख देतात असेही सत्य ती सांगते, पुस्तकांनी नादावलेल्या जगात वैर होतं उभा दावा मांडल्यासारखे आक्रमक असे म्हणते. पण त्याचवेळी एखाद्या स्टेशनवर सगळा संताप नि भूतकाळ विसरून एकमेकांना

मारलेल्या मिठ्या होत्या पाणावलेल्या डोळ्यांनी पुस्तकांनी नादावलेल्या जगात, इतकी अलवारही होते. विकासची कविता वेगळी यासाठी आहे की आजच्या काळात अनेक कवितांत वैश्विकीकरणाच्या अवडंबरातून आलेले भाष्य दिसते, कृतक बेछूटपणा दिसतो, आधुनिक म्हणवून घेण्यासाठी ओढूनताणून केलेले भाषिक प्रयोग आढळतात, अनेक क्लृप्त्या आढळतात. परंतु विकासची कविता हे सगळे नाकारून त्याच्या वृत्तीप्रमाणेच संयत आणि तरीही आधुनिक काळाचे भाष्य करत राहते. उदाहरण म्हणून 'नुकताच धारातीर्थी पडलाय दुखरा दिवस' या कवितेकडे पाहता येई. या कवितेत कवी लिहितो.

गुहेतला सर्वभक्षी गडद अंधार वळसे घेत पोहोचतोच
आपल्यापर्यंत आपल्या चित्रांच्या चौकटींपर्यंत,

विकास पालवेची कविता सामाजिक आहे, त्याहीपेक्षा ती माणूसपणाची कविता अधिक आहे. त्याच्या सामाजिक आशयाच्या कवितेत बोधपर संदेश नसतो की राजकीय भाष्य नसते किंवा एखाद घटनेतून आलेले विचार नसतात. त्याची कविता या सगळ्याच्या गंभीर चिंतनांनंतर आलेले माणुसकीचे चित्रण करते. माणसाच्या माणुसकीवर भाष्य करते आणि म्हणून मला त्याची कविता नेहमी महत्त्वाची वाटते, पुढील काळातील कविता वाटते. विकास पालवे याचा कवितासंग्रह कुणी चांगला प्रकाशक लवकरच प्रकाशित करेल अशी आशा करतो.

**आता लागली तर लागो पुस्तकांना आग**

कधीतरी अचानकच खाडकन् जागे होतो आपण
मध्यरात्र शिरू पाहत असते पहाटेच्या कुशीत
आणि रात्रीने मिटून घेतलेला असतो
आपला पिवळसर प्रकाशातला अजस्र जबडा.
आणि आपण खाडकन् जागे होतो
आपली पुस्तकं जळत असल्याच्या स्वप्नातून.
अजूनही धूसर दिसत राहतात आगीच्या ज्वाळा.
आपण खडबडून दिवे लावतो, पाहतो कोपरानकोपरा
घराची झडती घ्यायला आलेल्या पोलिसाप्रमाणे.
पुस्तकं सुरक्षित असतात नेमलेल्या जागेत
निमूट नेहमीसारखीच
निमूट नेहमीसारखीच नाही लागत झोप
नंतर बराच काळ.
आणि त्या जगप्रसिद्ध फोटोतल्या आगीसारखी
ही आगही येऊन थांबेल पुस्तकांच्या देहापाशी
याची शाश्वती नसते कोणतीच आपल्यापाशी.

सगळी घरं, शहर, रस्ते गाढ झोपेत असताना
आपण करतो पुस्तकांची सरकवासरकवी
उभ्या आणि आडव्या रांगा मांडत
तयार करतो पुस्तकांचा अजब बिछाना.
उब देते अशाही स्थितीत नेरुदाची कुशी
रिल्के आणि इलियटची तयार करतो उशी
पायाखाली घेतो दालीची टोकदार मिशी
आणि देतो ताणून बिनघोर बाहू पसरून.

आता लागली तर लागो। पुस्तकांना आग
कुठे आपण उरणार। सावडायला त्यांची राख

**पुस्तकं**

तुझी काही पुस्तकं माझ्याकडे राहिलीत
माझी काही पुस्तकं तुझ्याकडे.
दारं बंद झालीत
कायमच्या शत्रुत्वाच्या शपथा घेत.
पुस्तकंही मिटलेलीच.
त्यांना शपथाशाप देताघेता येत नाहीत.
अधीमधी डोळा चुकवून ती पसार होतात
आपापल्या पूर्वजागेला भेट देतात.
आपापल्या मालकांचे तळे झालेले डोळे
पाहतात. अचंबित होतात.
ती परततात पुन्हा एकवार
प्लास्टिकच्या मळक्या कव्हरांखाली
अश्रू लपवत.
ती परततात पुन्हा
नंतरच्या मालकांना
आधारासाठी
ओरबाडण्यासाठी.

**पुस्तकांनी नादावलेल्या जगात**

पुस्तकांनी नादावलेल्या जगात अपरंपार सुख होतं,
दुःखं होती, अपमान होते, अपमानाच्या विरोधात
डिवचलेल्या चित्त्यासारखं झेप घेत उसळणं होतं.
कमळाच्या फुलासारखं कर्दमातून उगवून येणं होतं.
कापसासारखं मुलायम प्रेम होतं, जवळीक होती.
धुवांधार पावसात निःशब्द वाट पाहणं होतं.
नंतरचं एकमेकांच्या डोळ्यांत सर्वस्व
विरघळवून टाकण्याचं वेड होतं अमर्याद.
प्रेमभंगानंतरची घनघोर निराशा होती, निरर्थक
भुलावण होती, सगळं हरवून गेल्यानंतरही शिल्लक
गिरक्या घेत घेत त्याच आठवणींच्या पायथ्याशी
निर्विचार होण्याच्या धडपडीसाठी झुंजणं होतं.

गैरसमज होते एकमेकांना ओळखू न येण्याइतके
अंतर होतं दोन भिन्न ग्रहांवर जगत असल्यासारखं
तरीही जगत राहण्याची शिकवण होती पक्की.
पुस्तकांनी नादावलेल्या जगात
वैर होतं उभा दावा मांडल्यासारखं आक्रमक,
ओळखून न ओळखल्याचा आव आणणारे मतलब होते,
आयुष्य होतं तरीही गुंतलेलं एकमेकांत रेल्वे रुळांसारखं.
एखाद्या स्टेशनवर सगळा संताप नि भूतकाळ विसरून
एकमेकांना मारलेल्या मिठ्या होत्या,
पाणावलेल्या डोळ्यांनी
पुस्तकांनी नादावलेल्या जगात
माणसांनी माणसांना गुलाम करण्यातलं क्रौर्य होतं
जुलूम होता चाबकाचे फटकारे मारल्यासारखा
त्याचे मनावरले घाव कायम गाडत आलेल्या पिढ्या
होत्या कैक
आणि जिथे तिथे अंधाराला छेदून जाणारा प्रज्ञासूर्य होता
जगताना सगळ्या हादऱ्यांच्या मधोमध
अलगद आधार देऊन सतत वर उचलणारे हात होते अनेक
पुस्तकांनी नादावलेल्या जगात
वासना होती, इच्छा होती, महत्त्वाकांक्षा होती
संघर्ष होते, स्वप्नं होती, भाजून काढणारं वास्तव होतं
हताशा होती उदासी होती, रिकामपण होतं
संध्याकाळी होत्या असण्याला डागण्या देणाऱ्या
भिरभिरवणाऱ्या झोकांडणाऱ्या झोकंडवणाऱ्या
येणाऱ्याजाणाऱ्या.

पुस्तकांनी नादावलेल्या जगात
एकातून एक करत रहस्यकथेतल्या गुप्तहेरासारखे
पुस्तकांची लेखकांची साखळीच काढायचो शोधून.
किती लेखक किती पुस्तकं!
नव्या वर्षासोबत आयुष्य कमी होत होतं
पुस्तकं वाढत होती पुरासारखी ऐसपैस
खिसा रिकामा, थकलेली उधारी, जागेची मारामारी.
श्रीशिल्लक उरलीच नाही, कधी चुकत गेला सदा ताळेबंद
मग बेमालूम हात पसरले लाजलज्जा गुंडाळून मित्रांसमोर
आणि आधार घेतला चपटा रस्त्यावरल्या करोडो
भिकाऱ्यांचा
आणि मग पापण्यांचा ताबा घेतला आसवांनी निरंतर
पुस्तकांनी नादावलेल्या जगात पुस्तकंच असती फक्त
तर रंग काही वेगळेच असते आयुष्यातले.

पुस्तकांनी नादावलेल्या जगात जगणं
म्हटलं तर सोपंय म्हटलं तर कूट
म्हटलं तर सुख आहे म्हटलं तर दुःख
म्हटलं तर आयुष्य तरी काय आहे?

पुस्तकांनी नादावलेल्या जगात
आयुष्य निघून जाईल निसटून काळाच्या जबड्यातून
सहज. झरझर.

**नुकताच धारातीर्थी पडलाय दुखरा दिवस**

नुकताच धारातीर्थी पडलाय दुखरा दिवस
क्षितिजावरल्या क्षतजाच्या थारोळ्यात
आणि अंधारात अवचित हरवलेलं स्वप्नगीत
चलबिचलतेत निद्रा भेसूरभग्न.
बिनसंवादांची कुजकी मढी चिक्कार आक्रसून
मरून पडलेल्या पालीच्या शेपटीत शिरलेली.
झाडांच्या शांत फांद्यांवर वृथाच यातनांची रुजवण.
निःशब्द संध्याकाळींची प्रेतं डोळ्यांसमोर अकारण.
गुहेतला सर्वभक्षी गडद अंधार वळसे घेत पोहोचतोच
आपल्यापर्यंत आपल्या चित्रांच्या चौकटींपर्यंत,
हुसेनच्या घोड्यात तो मुरतो धीमे धीमे पसरतो.
गतिशीलतेचं प्रतीक व्हायचंसतं का अंधाराला?
ओल्या वाळूवर अंधाराची ठाशीव पावलं दिग्विजयी
आपण फरफटतो त्याच्या डबलफास्ट दौडीत
चार पावलं आपली मंतरलेली कधीकाळची
नि कुंपण साखळदंडांचं ओढलेलं आजतागायत.

**– विकास पालवे**
vikas_palve@rediffmail.com
**– किरण येले**
kiran.yele@gmail.com

॥ग्रंथाली॥




**फर्स्ट जून चाईल्ड**
**डॉ. यशवंत इंगळे**
**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**



विनता कुलकर्णी

# अमेरिकेतील कचराव्यवस्थापन प्रणाली

**युनायटेड** स्टेट्स हा जगभरातील सर्वात मोठा कचरा उत्पादकांपैकी एक देश आहे आणि त्यामुळे कचराव्यवस्थापन हा या देशातील एक प्रमुख उद्योग आहे. औद्योगिक, घातक आणि महानगरपालिका घनकचऱ्यासह अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या कचऱ्याचे व्यवस्थापन येथे केले जाते. २०२२मध्ये, अमेरिकेमधील कचराव्यवस्थापनसेवांचा महसूल एका दशकाच्या सतत वाढीनंतर २१४० अब्ज यूएस डॉलरच्या पुढे गेला. तेथे कचरा १९७६पासून संसाधन संरक्षण आणि पुनर्प्राप्ती कायदा या अंतर्गत पर्यावरण संरक्षण एजन्सीद्वारे नियंत्रित केला जातो.

अमेरिकनांना आजच्या स्वच्छता प्रणालींची इतकी सवय झाली आहे, की कचरासंकलनात आपण या क्षेत्रात किती प्रगती केली आहे हेदेखील आता सध्याचे अमेरिकन विसरले आहेत, इतकी ही प्रगती समाजाच्या अंगवळणी पडली आहे. परंतु एक काळ असा होता, की कचऱ्याची हाताळणी अतिशय विसंगत होती आणि त्यामुळे शहरातील रस्त्यांवर आणि पदपथांवर कुरूप ढिगारे पडलेले असत. घराच्या आसपास, मागच्या अंगणात लोक कचरा जाळत.

१८९३ मध्ये हार्म हुइझेंगा नावाच्या एका डच स्थलांतरिताने शिकागोमध्ये अल्पशुल्कात कचरा गोळा करण्यास सुरुवात केली. एका माफक वॅगनपेक्षा थोडे अधिक, वेगाने बदलणाऱ्या समाजाच्या कचऱ्याचे प्रभावीपणे व्यवस्थापन करून त्याने गेल्या काही वर्षांत एक विश्वासार्ह ग्राहक-आधार तयार केला. परंतु युद्धानंतरच्या काळात, असे काहीतरी घडले ज्यासाठी बहुतेक कचरा प्रदाते तयार नव्हते: जीवन सुलभ करण्यासाठी डिझाइन केलेल्या डिस्पोजेबल उत्पादनांमध्ये आमूलाग्र बदल होऊ लागला.

१९६८ मध्ये, हार्मचा नातू वेन हुइझेंगा आणि इतर दोन गुंतवणूकदार, डीन बंट्रोक आणि लॅरी बेक यांना एक दृष्टी मिळाली. सोयीसाठी बनवलेल्या अधिकाधिक उत्पादनांचा वापर करणाऱ्या, झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येद्वारे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून त्यांना त्यांच्या समुदायाची सेवा करायची होती.

१९७० च्या दशकात, अमेरिकन लोकांनी अधिक पर्यावरणास अनुकूल मानसिकता स्वीकारण्यास सुरुवात केली. त्याच सुमारास WM (Waste Management Inc.) कंपनी व्यावसायिक आणि जबाबदारीने कचऱ्याची विल्हेवाट लावत होती. त्यातून जटिल विशेषीकृत कचऱ्याचे निराकरण करण्यास सुरुवात करून पर्यावरणाप्रती बांधिलकी वाढवली गेली.

**पुनर्वापराचा ध्यास :** १९८२ पर्यंत WM कंपनी १ बिलियनपेक्षा जास्त विक्रीसह जगातील सर्वात मोठी कचरा विल्हेवाट लावणारी कंपनी बनली होती. अमेरिकन वेस्ट मॅनेजमेंट खऱ्या अर्थाने एकात्मिक कचरा कंपन्यांपैकी एक झाली. ही कंपनी केवळ कचरा गोळा करत नाही तर ज्या लँडफील्डमध्ये तो जातो त्याचे जबाबदारीने व्यवस्थापन केले जाते. आणि वाढत्या पुनर्वापराच्या हालचाली, मजबूत संकलन, सामग्री पुनर्प्राप्ती आणि साहित्य विपणन पायाभूत सुविधा ओळखून अमेरिकेतील कचऱ्याला दुसरे जीवन मिळावे याची खात्री करून घेतली जाते.

अमेरिकेमधील वेगवेगळे वॉर्ड, वेगवेगळी शहरे, राज्यांमध्ये कचराव्यवस्थापन प्रणालीचे वेगवेगळे मार्ग आहेत. आमच्या उपनगरातील शिकागोमध्ये काही भागात पदपथावर पिशव्या ठेवण्याची परवानगी नाही, आम्हाला प्रती घर, आठवड्यातून एकदा कचरा गोळा करण्यासाठी मोठे डबे दिले गेले आहेत- (एक, रिसायकलिंगसाठी-कागद, काच, धातू इत्यादी... दुसरा, कचऱ्यासाठी आणि तिसरा, अधूनमधून कागदी पिशव्या, मृत रोपांसाठी, पाने/दांडे इत्यादींसाठी, महापालिका प्राधिकरण पर्यावरण संरक्षण एजन्सीनुसार नियमांचे संचालन करते. काही शहरांमधील अनेक ठिकाणी, उपनगरांमध्ये नगरपालिका आणि खाजगी सेवा या दोन्ही

पुरवल्या जातात.

**महापालिका घनकचरा प्रक्रिया आणि विल्हेवाट**

कचराव्यवस्थापन उद्योग पर्यावरण आणि आरोग्यावर होणारे परिणाम कमी करणाऱ्या कचऱ्याचे प्रकार गोळा करणे, त्यावर प्रक्रिया करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे यासाठी जबाबदार आहे. लँडफिलिंग, रिसायकलिंग आणि ऊर्जा पुनर्प्राप्ती यासह अनेक नगरपालिकांच्या कचरा विल्हेवाटीच्या विविध पद्धती उपलब्ध आहेत. दरवर्षी तयार होणाऱ्या सुमारे ३०० दशलक्ष टन MSW पैकी सुमारे ५० टक्के लँडफिल साइटवर विल्हेवाट लावली जाते. १९६० पासून MSW पुनर्वापराचे दर मोठ्या प्रमाणात वाढले असले, तरी गेल्या दशकात प्रगती ठप्प झाली आहे. इतर देशांच्या, विशेषतः युरोपच्या तुलनेत अमेरिकेत रिसायकलिंगचे दर कमी आहेत.

**घातक कचरा व्यवस्थापन**

फेडरल नियमांनुसार मोठ्या प्रमाणात घातक कचरा जनरेटरना (ज्यांच्या साइट कोणत्याही कॅलेंडर महिन्यात १,००० किलोग्रॅम किंवा त्याहून अधिक उत्पन्न करतात) त्यांच्या सुविधांवर निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्याबाबत दर दोन वर्षांनी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. २०२१ मध्ये, ३७ दशलक्ष टनांहून अधिक घातक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात आले होते, आता अमेरिकेत १,०००पेक्षा जास्त धोकादायक कचरा साइट आहेत, ज्यामध्ये न्यू जर्सी, कॅलिफोर्निया आणि पेनसिल्व्हेनिया राज्यांमध्ये सर्वाधिक संख्या आढळल्या आहेत. या अत्यंत दूषित साइटना सुपरफंड साइट म्हणून संबोधले जाते आणि त्यामध्ये लँडफिल किंवा खाणींचा समावेश होतो जिथे विषारी कचरा टाकला गेला आहे किंवा अयोग्यरितीने व्यवस्थापन केले गेले आहे.

**अग्रगण्य कचराव्यवस्थापन कंपन्या**

जगभरातील अनेक सर्वात मोठ्या कचराव्यवस्थापन कंपन्या अमेरिकेमध्ये आहेत, जशा की वेस्ट मॅनेजमेंट इंक आणि रिपब्लिक सर्व्हिसेस. ह्युस्टन, टेक्सास येथे मुख्यालय असलेल्या, वेस्ट मॅनेजमेंट इंकने २०२२ मध्ये अंदाजे २० अब्ज डॉलरची कमाई केली. तिच्या उपकंपन्यांद्वारे, कंपनी अमेरिका आणि कॅनडामध्ये लँडफिल आणि कचराव्यवस्थापनसेवांचे एक मोठे नेटवर्क चालवते. दरम्यान, ॲरिझोना-आधारित रिपब्लिक सर्व्हिसेसने २०२२ मध्ये सुमारे १३.५ अब्ज अमेरिकन डॉलरचा महसूल प्राप्त केला. एकत्रितपणे, दोन कंपन्यांचा व्यवस्थापन केलेल्या एकूण लँडफिल व्हॉल्युमपैकी अंदाजे अर्धा भाग आहे.

WM कंपनीचे रिसायकलिंग फक्त बाटल्या, कॅन आणि कागदाच्या पलीकडे जाते. जुन्या टीव्ही रिमोटपासून बॅटरीपर्यंत; कॉम्पॅक्ट फ्लुरोसंट बल्ब, आणि इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी वस्तूंसाठी सोयिस्कर विल्हेवाट सेवा आता रिसायकल करू शकतात. यात सेल, स्मार्ट फोन, संगणक, डेस्कटॉप, लॅपटॉप, नोटबुक, टॅब्लेट, ई गेम, सीडी, डीव्हीडी, व्हीसीआर स्पीकर, एलसीडी आणि प्लाझ्मा फ्लॅट स्क्रीन, डिजिटल कॅमेरे आणि नेव्हिगेशन उपकरणे, विविध प्रकारचे प्रिंटर आणि स्कॅनर स्वीकरले जाते. तसेच, कीबोर्ड आणि संगणक माऊस, पॉवर कॉर्ड आणि केबल, माऊस नेटवर्क आणि फोन आणि बरेच काही, ज्या गोष्टी फेकून देण्याची आपल्याला सवय आहे, त्याही अनेकदा सुरक्षितपणे रिसायकल केल्या जाऊ शकतात. होम कलेक्शन किंवा कंपनीच्या मेल-ऑर्डर रिसायकलिंग किटमध्ये बॉक्सपासून रिटर्न शिपिंग लेबलपर्यंत तुम्हाला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी येतात. तुमच्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या सर्व सायकल बाय मेल सेवांची यादी मिळवण्यासाठी फक्त तुमचा पत्ता घातला, की तुम्हाला रिसायकल करायचे असलेल्या वस्तू निवडून नंतर किट ऑनलाइन ऑर्डर करायचे. तिथून, तुम्हाला फक्त तुमचे बल्ब, बॅटरी किंवा इलेक्ट्रॉनिक्स पॅक करावे लागते. आणि किट कंपनीला परत पाठवावे लागते.

कचराव्यवस्थापनाच्या बहुतेक कंपन्यांच्या स्वत:च्या प्रशिक्षण कार्यशाळा, शाळा, त्या सेवांसाठी करार, प्रशिक्षण कार्यक्रमदेखील आहेत.

– **डॉ. विनता कुलकर्णी** (शिकागो)
vinata@gmail.com

॥ग्रंथाली॥

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग



LiFE Lifestyle for Environment



**विज्ञानधारा**

**संपादक – शरद काळे**

विशेषत: विद्यार्थिवर्गात विज्ञानप्रसार व्हावा तसेच पर्यावरण रक्षणाबाबत जागृती व्हावी या उद्देशाने सुरू झालेली मासिक पुस्तिका

**वार्षिक वर्गणी ५०० रुपये**

**vidnyangranthali@gmail.com**

संपर्क : ९००४९ ४९६५६

# ‘भेट दिग्गजांची’मध्ये अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची मुलाखत




**मान्यवरांच्या उपस्थितीत पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांचा मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष पद्मभूषण ज्येष्ठराज जोशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**

‘अणुऊर्जा हे देशाचे भवितव्य आहे. कारण खनिजतेल आणि कोळशाच्या नैसर्गिक साठ्याचे खणन करण्याला मर्यादा आहे. त्यामुळे एकूण देशातील विजेची मागणी आणि वीजवापर लक्षात घेता नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात वीजटंचाई भासू शकते. त्यामुळे अणुऊर्जेची देशाच्या सुरक्षेपेक्षा नागरिकांचे जीवनमान सुकर होण्यासाठी निर्मिती करणे, गरजेचे आहे’, असे मत ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी व्यक्त केले. निर्माता–दिग्दर्शक जयू भाटकर, यांच्या संकल्पनेतून ‘वैष्णो व्हिजन’ आणि ‘ग्रंथाली’ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘भेट दिग्गजांची’ या प्रकट मुलाखतीच्या कार्यक्रमाचा शुभारंभ ठाण्यातील सहयोगमंदिर सभागृहात संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. डॉ. काकोडकर यांच्या प्रकट मुलाखतीच्या या पहिल्या कार्यक्रमास ज्येष्ठ खगोलअभ्यासक, पंचांगकर्ते दा.कृ. सोमण, मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष पद्मभूषण ज्येष्ठराज जोशी, ठाण्याचे पोलीस सह–आयुक्त दत्तात्रय कराळे, ठाणे महानगरपालिकेचे सह–आयुक्त संदीप माळवी, ठाणे जनता सहकारी बँकेचे उपाध्यक्ष वैभव सिंघवी, राज्य शासनाचे वरिष्ठ राजपत्रित अधिकारी मंगेश शिंदे, ठाण्यातील वास्तुविशारद शशिकांत देशमुख, प्रा. सिद्धिविनायक बर्वे आणि मराठी विज्ञानपरिषदेचे माजी अध्यक्ष अ.पां. देशपांडे, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

आरंभी ‘वैष्णो व्हिजन’चे संस्थापक जयू भाटकर यांनी या कार्यक्रमामागची भूमिका मांडली. त्यानंतर सुदेश हिंगलासपूरकर यांनी ‘ग्रंथाली’च्या सहभागाबद्दल निवेदन केले. डॉ. काकोडकर यांनी ठाण्यात विज्ञानकेंद्र उभारण्यास साहाय्य करावे, अशी विनंती त्यांना केली. मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठराज जोशी यांनी डॉ. काकोडकर यांच्या विज्ञानप्रसाराच्या व सामाजिक जाणिवेतून करत असलेल्या नेतृत्वाबद्दल गौरवोद्‌गार काढले. ‘ते आमचे सेनापती आहेत; आम्ही शिपाई म्हणून त्यांच्या कार्यात त्यांसोबत राहू’ असे ते म्हणाले.

डॉ. काकोडकर यांच्याशी संवादातून त्यांचे बालपण, शालेय शिक्षण, महाविद्यालयीन जीवन ते अणुशास्त्रज्ञ म्हणून केलेल्या यशस्वी मोहिमांचा प्रवास आणि विज्ञानक्षेत्रातील भारताचे भवितव्य, असा एकेक पदर या प्रकट मुलाखतीतून उलगडण्यात आला. प्रसिद्ध निवेदिका मनाली दीक्षित यांनी डॉ. काकोडकर यांच्याशी संवाद साधला. दोन स्वयंपूर्ण अणुचाचण्या, जैतापूर–नाणार प्रकल्पांना होणारा स्थानिकांचा विरोध, त्यातील राजकारण, विरोधाकरता ग्रामस्थांचा होणारा राजकीय वापर, अणुशक्ती आणि अणुऊर्जा या संकल्पनांतील फरक आणि गरज, ग्रामीण भारताच्या विकासासाठी ग्रामोपयोगी विज्ञानाची कास धरण्याची आवश्यकता, देशाच्या शाश्वत विकासासाठी अणुऊर्जेची गरज आणि सामान्य नागरिकाला आवश्यक असणारे वैज्ञानिकभान, अशा विविध पैलूंवर यावेळी डॉ. अनिल काकोडकर यांनी अतिशय विस्तृत आणि सोप्या शब्दांत आपले विचार व्यक्त केले. डॉ. काकोडकर यांच्या मुलाखतीदरम्यान त्यांच्या पत्नी सुयशा यांच्याशी मनाली दीक्षित यांनी कौटुंबिक बाबतीत संवाद साधल्याने त्यास हृद्यता लाभली. पहिल्याच कार्यक्रमाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. •

# दहिसरच्या विद्यामंदिर शाळेत विज्ञानगप्पा कार्यक्रम संपन्न

गुरुवार, १३ जुलै २०२३ रोजी विद्या प्रसारक मंडळ, दहिसर यांच्या विद्यामंदिर या शाळेमध्ये ग्रंथाली-प्रतिभांगणच्या 'विज्ञानगप्पा' उपक्रमातील पाचवा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये भाभा अणुसंशोधन केंद्रातील निवृत्त वैज्ञानिक डॉ. सुधीर थत्ते आणि विज्ञानलेखिका असलेल्या त्यांच्या पत्नी नंदिनी थत्ते यांनी विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या व त्यांच्या विज्ञानविषयक शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस 'विज्ञानाशी दोस्ती कराया गप्पा मारुया' हे गाणं नंदिनी थत्ते यांनी विद्यार्थ्यांकडून म्हणून घेतलं. त्यानंतर एक पीव्हीसी पाईप आणि बाटली साफ करण्याचा प्लास्टिक तारांचा ब्रश अशा दैनंदिन वापरातील वस्तूंच्या मदतीने त्यांनी मुलांकडून एक प्रयोग करून घेतला. त्याच्या मदतीने न्यूटनचा पहिला नियम - 'जडत्व' समजावून सांगितला. गाणे व प्रयोग यामुळे मुलांमध्ये असलेली थोडीफार भीड चेपली गेली.



डॉ. सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते विद्यार्थिनीशी संवाद साधताना

'हे असं का होतं? हे कसं होतं?' असे प्रश्न विचारण्यात शास्त्रज्ञ होण्याचं बीज आहे असे डॉ. थत्ते यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. न्यूटन, अलेक्झान्डर फ्लेमिंग या शास्त्रज्ञांच्या उदाहरणातून हेच दिसून येते. आपल्या जीवनात स्वयंपाकघरापासून आपण रोज वापरत असलेल्या लहानमोठ्या वस्तूंपर्यंत विज्ञान प्रत्येक गोष्टीत दडलेले आहे. त्यामुळे तुम्ही कोणत्याही गोष्टीबद्दलचे प्रश्न विचारले तरी चालेल असे नंदिनी थत्ते यांनी विद्यार्थ्यांना सांगितले आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली.

आपल्या तोंडात सतत लाळ तयार होत असते मग आपल्याला वेगळं पाणी पिण्याची गरज का भासते, आपल्याला केसांचा काय उपयोग असतो, माणूस शाकाहारी असूनही काही माणसांचे दात धारदार का असतात, पाऊस पडल्यावर मातीचा सुगंध का येतो, गुरुत्वाकर्षणाचे बल पक्ष्यांना उडताना अडचणीचे का होत नाही, दारूमध्ये असणारे माणसाला नशा चढणारे घटक काढता येतील का, अशा प्रकारचे वैविध्यपूर्ण प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले आणि डॉ. सुधीर व नंदिनी थत्ते यांनी त्यांच्या प्रश्नांची अतिशय सुबोध उत्तरे दिली.

विद्यामंदिरचे मुख्याध्यापक देसाई यांनी आपल्या मनोगतामध्ये ग्रंथाली व थत्ते दांपत्याचे आभार मानले. ग्रंथालीकडून विद्यामंदिर शाळेच्या वाचनालयासाठी विज्ञानविषयक पुस्तके भेट देण्यात आली. •

॥ग्रंथाली॥

**रानभुलीचे प्रदेश**

**विजयालक्ष्मी मणेरीकर**




विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी लिहिलेलं 'रानभुलीचे प्रदेश' हे पुस्तक अतिशय सुंदर आहे. थोडक्यात हे पुस्तक अतिशय देखणं झालेलं आहे, खूप रंजक आणि माहितीपूर्ण असं हे पुस्तक सगळ्यांनीच वाचलं पाहिजे.

**- अच्युत गोडबोले**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

# पर्यटनक्षेत्रातील नवी क्षितिजे या विषयी राजा राणी ट्रॅव्हल्सचे अभिजित पाटील यांची मुलाखत

धार्मिक स्थळी जाणे म्हणजे पर्यटन या समजापासून मराठी माणसाला दूर नेणाऱ्या व काश्मीर ते कन्याकुमारी व देशविदेशात भटकंतीची गोडी सर्वप्रथम लावणाऱ्या राजा राणी ट्रॅव्हल्स या अग्रगण्य पर्यटनसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांची मुलाखत सोमवार, १७ जुलै २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगण, बॅन्डस्टॅन्ड, वांद्रे (प.) येथे 'कॉर्पोरेट गप्पा' या उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आली होती. 'उद्योगविश्व'चे संपादक ज्ञानेश चांदेकर यांनी ही मुलाखत घेतली.

मुलाखतीच्या सुरुवातीस अभिजित पाटील यांनी त्यांचे वडील राजा पाटील यांनी ७२ वर्षांपूर्वी राजा राणी ट्रॅव्हल्स या पर्यटनसंस्थेची स्थापना कशी केली याबद्दल माहिती दिली. ते सांगत होते, 'काम शिस्तशीर करण्यावर त्यांचा भर होता. आम्ही शालेय विद्यार्थी असतानाच त्यांनी आम्हाला घडवण्यास सुरुवात केली. त्यांनी पहिल्यांदा आम्हाला अमेरिकेला टूरबरोबर नेले तेव्हा सकाळी हातात वीस डॉलर दिले आणि सांगितले की हे 'पॉकेटमनी' नसून तुम्हाला कुठे वेळेत बसमध्ये यायला उशीर झाला तर बस तुमच्यासाठी न थांबता निघून जाईल. त्यावेळी टॅक्सी करून पुढच्या स्थळी येण्यासाठीचे हे पैसे आहेत. त्याचप्रमाणे पर्यटकांनी बसमध्ये टाकलेला कचरा साफ करण्याचे काम त्यांनी स्वतः व सर्व कुटुंबीयांना करायला लावले. आमचे लहान वय वा संस्थाचालकाची मुले असणे याला व्यवसायातील शिस्तीपुढे शून्य महत्त्व असल्याचे संस्कार त्यांनी यातून न बोलता केले. यामुळेच मी सर्वात लहान वयाचा परदेशात टूर नेणारा व्यवस्थापक म्हणून गौरवला गेलो.'

राजा-राणी ट्रॅव्हल्सच्या काश्मीर प्रांतातील पर्यटनाशी असलेल्या अतूट नात्याविषयी अभिजित पाटील यांनी विस्ताराने सांगितले. ज्या काळात काश्मीरमध्ये दहशतवादाचे थैमान सुरू होते तेव्हा आमच्या पर्यटनसंस्थेने तेथे पर्यटकांना नेणे सुरूच ठेवले होते. आता बदललेल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीनुसार आम्ही तेथे हनिमून टूरिझमप्रमाणेच वेडिंग टूरिझम हा नवा पैलू तेथे रुजावा असे प्रयत्न करत आहोत.




**ज्ञानेश चांदेकर आणि अभिजित पाटील**

कोविडकाळाविषयी बोलताना पाटील म्हणाले की कोविडमध्ये झालेल्या नुकसानापेक्षा कोविडनंतर झालेल्या पर्यटनक्षेत्रातील बदलांचे परिणाम दूरगामी आहेत. कंडक्टेड टूर नेणाऱ्या अनेक मोठ्या जुन्या कंपन्यांना झालेले बदल जाणवले नाहीत व त्यामुळे त्यांना नुकसान होत आहे. राजा राणी ट्रॅव्हल्सने हे बदलाचे वारे ओळखून कोविडसाथीच्या आधीच फिल्म टूरिझम या नव्या क्षेत्रात पाऊल टाकले आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये अनेक नव्या शक्यता व संधी आहेत.

भारतामध्ये पर्यटन व्यवसायाला वाढीसाठी अनेक शक्यता असल्या तरी आपल्याकडे असणाऱ्या सरकारी ठोकळेबाज व संथ दृष्टिकोनामुळे आवश्यक तेवढी प्रगती होत नाही. अनेकदा शासकीय स्तरावर अनेक नव्या योजनांच्या घोषणा केल्या जातात पण त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व तयारी केली जात नाही, असे त्यांनी परखडपणे सांगितले. व्यवसाय वाढवत असताना आम्ही कटाक्षाने कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करत नाही व त्याचे परिणामही सहन करतो असे त्यांनी अभिमानाने सांगितले. •

ग्रंथाली

**योगः कर्मसु कौशलम्**

**शिल्पा खेर**




हजारो वर्षांपासून आपल्या ऋषीमुनींनी स्वानुभवातून प्राप्त केलेल्या तत्त्वप्रणालीद्वारे जो गहन उपदेश जगासमोर ठेवला तो उपदेश साध्या सरळ शब्दात परंतु त्याच्या शुद्धतेला बाधा न आणता शिल्पा खेर यांनी या पुस्तकाद्वारे वाचकांसमोर मांडला आहे.

**– जस्टीस बी. एन. श्रीकृष्ण**
(माजी न्यायमूर्ती, सुप्रीम कोर्ट)

**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २१० रुपये**

# कोविडच्या साथीशी लढण्याच्या मुंबई मॉडेलचे शिल्पकार सुरेश काकाणी यांची मुलाखत

आरोग्य या विषयाला अनेक पैलू आहेत. व्यक्तिगत आरोग्याप्रमाणेच सार्वजनिक आरोग्य हेही महत्त्वाचे आहे हे आपल्याला कोविड महासाथीने दाखवून दिले आहे. या काळात मुंबई महानगरपालिकेने या साथीचा मुकाबला कौतुकास्पद रितीने केला व साऱ्या जगाने त्याची वाखाणणी केली. यामुळेच 'आरोग्याची कॅप्सुल' या उपक्रमात सोमवार २४ जुलै रोजी मुंबई महानगरपालिकेचे माजी अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती. मधुमेहतज्ज्ञ डॉ. सतीश नाईक यांनी मार्मिक प्रश्न विचारून त्यांना बोलते केले.

कोरोनाची साथ हे अभूतपूर्व असे जागतिक संकट असले, तरी मी त्याच्याकडे एक व्यवस्था म्हणून या संकटाशी कसे लढता येईल याची संधी म्हणून बघितले, असे काकाणी यांनी सांगितले. या संकटाविषयी सर्व प्रकारच्या माहितीचा अभाव होता. त्यामुळे एकीकडे मिळेल तिथून योग्य माहिती घेण्याचे प्रयत्न सुरू केले व दुसरीकडे मास्कचा वापर, स्वच्छता व सामाजिक अंतर याचा प्रचार अशा प्रतिबंधात्मक कामांना प्रत्यक्ष सुरुवात केली. महिन्याभरात आम्हाला कळून चुकले की आपल्याला स्वत:लाच उपचारप्रक्रियेची आखणी करावी लागणार आहे. रुग्णांच्या धाप लागणे, छातीत जंतुसंसर्ग अशा लक्षणांवरून आम्ही रुग्णांची ऑक्सिजनची पातळी तपासण्याची यंत्रे, एक्सरे यांचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू केला.

या सर्व कामांत अनेकांचे ज्ञान-अनुभव यांचा उपयोग झाल्याचे काकाणी यांनी सांगितले. ते म्हणाले, शासनाच्या 'टास्क फोर्स'मधील ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञांपासून रुग्णालयातील साध्या वॉर्ड बॉयपर्यंत सर्वांशी संवाद साधत राहिल्यामुळे उपचारांमध्ये सुसूत्रता आली. रुग्णांचे मन:स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी स्मार्टफोन व टॅबचा वापर करून त्यांचा संवाद त्यांच्या कुटुंबीयांशी घडवून आणला. यामुळे उपचारांना गुण येण्याचे प्रमाण वाढले.

'प्रसारमाध्यमांनी तयार केलेल्या भीतीच्या वातावरणावर कशी तोड काढली हे सांगताना ते म्हणाले, की माध्यमांशी नियमित मनमोकळा संवाद करण्याचे धोरण ठेवले. यामुळे पत्रकार व संपादकांना शासनाकडून खरी माहिती मिळू लागली व त्यांच्याकडूनही पुढे समाजात घडणाऱ्या गोष्टी आम्हाला कळू लागल्या. रोज रात्री कितीही उशीर झाला तरी मी




सुरेश काकाणी आणि डॉ. सतीश नाईक

प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधींशी आवर्जून संवाद साधत असे. याचप्रकारे लोकप्रतिनिधींनाही कोणत्याही वेळी लवकरात लवकर प्रतिसाद देत असे व त्यांच्याकडून कळलेल्या जनतेच्या समस्यांवर मार्ग काढत असे. या काळात साधारण चार तास झोप मिळत असे.'

'खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनाही प्रोत्साहन व सहकार्य दिल्यानंतर त्यांनी मदत करायला सुरुवात केली. झोपडपट्टी वा गरीब वस्त्यांमध्ये याचा मोठा उपयोग झाला व साथ आवाक्यात आणण्यासाठी मदत झाली. कोविडच्या साथीदरम्यान काही सहकारी या आजाराला बळी पडले तेव्हा मन थोडे कणखर करून कामावर लक्ष केंद्रित करावे लागले' असे त्यांनी सांगितले. महानगरपालिकेच्या विविध विभागांना त्यांच्या उपयुक्ततेप्रमाणे या साथीशी लढण्याम ध्ये गुंतवून घेतले व त्याचाही उपयोग साथीशी लढण्यासाठी झाला.

कोविडच्या महासाथीशी लढा देण्यासाठी एक यंत्रणा तयार करता आली. या यंत्रणेचा वापर करून पुढेही विविध नागरी समस्यांना तोंड देण्यासाठी करता येणार आहे. तसेच, या लढ्यात आलेल्या अनुभवांची नोंद कायम राहण्यासाठी 'लढा मुंबईचा कोविडशी' हे पुस्तक लिहिले, असे काकाणी यांनी यावेळी सांगितले.

•

# ग्रंथपरिचय



**डॉ. निर्मोही फडके**
९९२०१ ४६७११

**थिजलेल्या काळाचे अवशेष**
**नीरजा**




**अस्वस्थ काळाचा कलात्मक कोलाज**

लेखन ही जीवनशोधातून येणारी, लेखकाच्या आंतरप्रेरणेशी जोडलेली गोष्ट आहे, जी वेगवेगळ्या रूपबंधांतून वाचकाच्या जाणिवा प्रगल्भ करत असते.

मानवी आयुष्याचा व्यामिश्र प्रवास एकसंघरीत्या मांडणारा कादंबरी हा असा एक रूपबंध आहे.

राजहंस प्रकाशित आणि ज्येष्ठ साहित्यिक नीरजा लिखित 'थिजलेल्या काळाचे अवशेष' ह्या कादंबरीतून मुखरित होणारा आशय वाचकाला अनेक पातळ्यांवर अंतर्मुख करतो. ह्या रूपबंधाची काही वैशिष्ट्ये आहेत, त्या अनुषंगानेही ही कादंबरी महत्त्वपूर्ण ठरते.

'थिजलेल्या काळाचे अवशेष' ह्या आपल्या पहिल्याच कादंबरीला नीरजा ह्यांनी चर्चा-कादंबरीच्या रूपात समोर आणले आहे. कादंबरीच्या शीर्षकाचा आशय रंगरेषांतून दृश्यमान करणारे मुखपृष्ठ प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी ह्यांनी साकारले आहे. तिचा अल्पाक्षरी लेखाजोखा मकरंद साठे ह्यांनी लिहिलेल्या ब्लर्बमधून वाचकापर्यंत पोहोचतो.

कादंबरीमध्ये एकरेषीय कथानक नाही. अनेक व्यक्तिरेखांच्या संवादांतून जगण्याच्या हृदयस्पर्शी कथा आपल्यापर्यंत पोहोचतात. दिल्लीच्या जवाहरलाल विद्यापीठातील (जेएनयू) माजी विद्यार्थी तीन दशकांनंतर सोशल मीडियामुळे एकमेकांच्या संपर्कात येतात. एकत्र भेटण्याचे ठरवतात.

त्यातील नजमा हे पात्र ह्या सगळ्यांना जोडणारे मध्यवर्ती पात्र आहे. नजमा अमेरिकेत स्थायिक झालेली आहे. काही दिवसांकरता ती भारतात येते. भारतातल्या मुंबई, कोची, मदुराई, कोलकता, दिल्ली अशा मोठ्या शहरांतील मित्रमैत्रिणींकडे एक-दोन दिवस राहते. शेवटी 'रि-युनियन' कार्यक्रम करून पुन्हा अमेरिकेला जायला निघते. तिच्या ह्या प्रवासाची ही कहाणी आहे, जी चर्चा-स्वरूपात घडत जाते. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत भारतातील सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी अनेक क्षेत्रांत घडलेल्या स्थित्यंतरांचे उभे-आडवे छेद वाचकांसमोर मांडत जाते.

नजमाबरोबरच तिचे वर्ग-मित्रमैत्रीण असणारे इतर सात जण ह्यांचीही ही कहाणी आहे. ह्या आठ जणांचे आणि त्यांच्याशी निगडित इतर व्यक्तिरेखांचे एकमेकांशी असणारे विविध पातळ्यांवरील प्रेम, जिव्हाळा, मत्सर, ईर्ष्या आदी ताणेबाणे ह्या कथानकाला प्रवाही ठेवतात.

ऐंशीच्या दशकात दिल्लीच्या जेएनयूसारख्या मातब्बर विद्यापीठाच्या बौद्धिक मुशीतून बाहेर पडलेले हे विद्यार्थी आता पन्नाशीत आहेत. उच्चपदस्थ आहेत. सुखवस्तू आहेत. तरीही एक संवेदनशील नागरिक म्हणून, माणूस म्हणून अस्वस्थ आहेत. ह्यांच्यामधले कोणी व्यवस्थेचा, प्रशासनाचा भाग आहेत, तर कोणी पक्षीय, शैक्षणिक राजकारणात सक्रिय आहेत. कोणी समाजकारणात क्रियाशील आहेत. परदेशी स्थायिक झालेली नजमा ही बाहेरून भारतावर नजर ठेवून असलेल्या, अलिप्त होत जाणाऱ्या अनिवासी भारतीय नागरिकांची किंवा परदेशस्थ भारतीय नागरिकांची प्रतिनिधी आहे.

''इथला गलिच्छ भारत साद घालतो ना?'' असं विचारणाऱ्या गोवर्धनला शेवटी नजमा म्हणते,

''साद घालतो, पण खरं सांगू मी तेवढी रोमँटिक नाही. ... बस, लोकांना भेटावंसं वाटलं की येते आणि परतते. पुन्हा कायम राहण्यासाठी नाही येऊ शकणार इथं. फक्त कधीतरी यावंसं वाटतं आपल्या मुळांकडे परत एवढंच.''

भारतीय संस्कृती, धर्म, स्त्रीवाद, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पुरस्कार-परती, आधुनिकता, सर्व इझम, संघ-सेवादल-काँग्रेस, गांधी-दाभोलकर-गौरी लोकेश हत्या, जेएनयू अशा अनेकानेक विषयांवर ही पात्रे स्वतःची मते मांडतात. वाद घालतात. त्यांच्या ह्या बौद्धिक चर्चा म्हणजे वाचकापुढे उभा राहणारा, वर्तमानकाळाचा एक कलात्मक कोलाज आहे. ही कादंबरी वाचताना अनेक वक्तव्यांवर आपण थबकतो आणि अंतर्मुख होतो.

उदाहरणार्थ, 'व्हॉट्सअॅप आणि फेसबुकमुळे एक वेगळंच युद्ध चालू झालेय.'/

'कुणी काय खावं आणि कुठं राहावं हेही ठरवायला लागलीत माणसं.'

लेखिका नीरजा कवयित्रीही असल्यामुळे कादंबरीत अनेक ठिकाणी आपल्याला त्यांच्या काव्यात्म भाषाशैलीचाही प्रत्यय येतो. उदाहरणार्थ,

'मनात असंख्य वादळं घेऊन झोपायची सवय झाली होती तिला.'/

'आज मन लावून मोर रेखले तिनं दारात कारण तिचाही मोर झाला होता खूप दिवसांनी.'

अस्वस्थ वर्तमानातून जगणे शोधणाऱ्या, वाद घालणाऱ्या अनेक व्यक्तिरेखांमध्ये वाचकाला आपलीही प्रतिबिंबे दिसतात.

काळ आणि अवकाश ह्या दोन सूत्रांच्या गुंफणीतून 'थिजलेल्या काळाचे अवशेष' वाचकाच्या भावनांना आणि विचारांना जगण्याच्या समतोलाचे भान देऊ पाहतात.

वर्तमानाचं संवेदन देणारी, जीवनशोधांची जाणीव करून देणारी ही कादंबरी वाचकाला विविधांगांनी विचारप्रेरणा देणारी आहे.


**थिजलेल्या काळाचे अवशेष**
लेखिका - नीरजा
प्रकाशक - राजहंस प्रकाशन
मूल्य - ४०० रुपये

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**नांदगाव ते लंडन**
**भास्कर कदम**



**साम्राज्यवाद्यांच्या अंतरंगात**

*'१३ डिसेंबर २०२२ रोजी नॉटिंगहॅम ट्रेंट युनिव्हर्सिटीच्या भरगच्च भरलेल्या सभागृहात 'डीन अॅवार्ड विनर' क्षितिजा भास्कर कदम अशी घोषणा निवेदिकेने केली आणि सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला तेव्हा खऱ्या अर्थाने निळ्या शाईचा सन्मान झाला. उपकुलगुरूंनी टाळ्या वाजवून सुहास्य वदनाने हस्तांदोलन करून क्षितिजाचे स्वागत केले तेव्हा आम चेही ऊर भरून आले. मनोमन जय जिजाऊ, जय सावित्रीबाई, थोर तुमचे उपकार, ही प्रार्थना केली.'*

'नांदगाव ते लंडन' हे भास्कर कदम यांचे प्रवासवर्णन आहे. भास्कर कदम यांची सुकन्या क्षितिजा ही उच्च शिक्षणासाठी लंडन येथे गेली. तिने तिथे मिळवलेल्या प्रावीण्यासाठी युनिव्हर्सिटीच्या वतीने सन्मानित करण्यात आले. तो सोहळा पाहण्यासाठी भास्कर कदम सहकुटुंब लंडन येथे गेले आणि त्या वास्तव्याच्या दरम्यान त्यांनी पाहिलेले, अनुभवलेले नॉटिंगहॅम, लंडन इथले अनुभव यांचा तपशीलवार लेखाजोखा त्यांनी या पुस्तकात मांडलेला आहे. लंडन, इंग्लंड, ही आपल्यासाठी असलेली नावे कधीकाळी इंग्रजांची राजधानी होती याचा बोध अलीकडच्या काळामध्ये अधिक स्पष्टपणे झाला. इंग्रज साम्राज्यवादी होते आणि त्यांनी जगभर आपल्या वसाहती निर्माण केल्या होत्या. त्यामुळे अर्थातच त्यांच्याविषयी एक आकस आपल्या मनामध्ये नकळतपणे पेरला गेलेला आहे. परंतु अशा साम्राज्यवाद्यांच्या मूळ वसाहतीमध्ये काय दडलेले आहे हे पाहणेदेखील नेहमीच औत्सुक्याचे ठरलेले आहे. नॉटिंगहॅम, यॉर्कर, ओल्ड ट्रॅफर्ड, केंब्रिज, मँचेस्टर, लंडन टॉवर, लंडन ब्रिज, वॉल्टन पार्क, जस्टीस म्युझियम, सेंट पॉल चर्च, वेस्ट मिनिस्टर अॅबी, टॉवर किल्ला ही आणि इतर अनेक शहरे, उद्याने, स्थळे प्रसिद्ध असून ती साम्राज्याच्या खुणा अंगभर मिरवणारी आहेत. ही स्थळे पाहणे हा जसा आनंद आहे तसाच त्यांचा इतिहास समजून घेणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.

प्रत्येक स्थळ पाहत असताना विशेषतः, टॉवर किल्ल्यात असणाऱ्या विविध वस्तू, त्यात रणजितसिंहाचे सिंहासन, तलवार हे पाहताना आपला इतिहास नकळतपणे त्यांच्या नजरेसमोर उभा राहतो. भवानी तलवार आणि कोहिनूर हिरा हादेखील एक मोठा भावनिक विषय आहे. त्यांचाही शोध घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांना त्यात यश येत नाही याची खंतही ते प्रांजळपणे कबूल करतात. या प्रवासात दिसलेला निसर्ग, इमारती, नद्या, रेल्वे, बस, चर्च, तिथली माणसे, मानसिकता यांचाही ते आवर्जून वेगळेपणा दाखवण्याचा प्रयत्न करतात. लिंकन किल्ला आणि कॅथेड्रल यांची माहिती देताना मॅग्ना कार्टा या सनदेचा ते आवर्जून उल्लेख करतात. तसेच या किल्ल्यातील तुरुंगाचा इतिहास कसा रोचक आणि क्रूर आहे त्याचीही माहिती देताना नमूद करतात की येथे फाशीची शिक्षा गळा दाबून, मुंडकी छाटून आणि सार्वजनिक रीतीने फाशी देणे अशा पद्धतीची होती. जस्टीस म्युझियम, रॉबिनहूड, केंब्रिज आणि ओल्ड ट्राफर्ड यांच्याविषयीचे वेगळेपण वाचताना आपल्याला खास आनंद होतो.


भास्कर कदम सहकुटुंब या प्रवासात असल्याने स्वाभाविकपणे पिठलं-भाकर, कुळीथाचे शेंगोळे, असा मराठमोळा आस्वाद ते परदेशातही आनंदाने घेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मृतिस्थळ, त्यानिमित्ताने येणारा जोतिबा व सावित्रीबाई फुले यांचा संदर्भ आपल्या शिक्षणाशी जोडलेला असणे स्वाभाविक ठरते. साम्राज्यवाद्यांचे अंतरंग पाहताना, त्यातली वैशिष्ट्ये जाणून घेताना एक वेगळेपण जाणवणे स्वाभाविक आहे. ते वेगळेपण भास्कर कदम यांनी खूप नेमकेपणाने आणि प्रांजळपणे नोंदवलेले आहे. यात कुठलाही आकस वा द्वेष नाही. त्याची तुलना भारताशी करताना एक शासकीय स्तरावरची उदासीनता मात्र त्यांना नाकारता येत नाही. मुळातच ते पत्रकार असल्याने, नेमकेपण टिपण्याचे अनुभव त्यांच्याकडे असल्याने नेमक्या शब्दांत त्यांनी हा संपूर्ण प्रवास आपल्यासमोर ठेवलेला आहे. तो ठेवत असताना त्यांनी प्रत्येक दिवशी केलेल्या प्रवासाचे वर्णन लेखासारखे स्वतंत्रपणे केलेले असून त्यांना शीर्षके दिलेली आहेत. एकूण पन्नास प्रकरणांत हे प्रवासवर्णन विभागलेले आहे. त्यामुळे आपण कुठलेही प्रकरण केव्हाही वाचायला घेतले तरी त्यातले वेगळेपण जाणवल्याशिवाय राहत नाही. प्रत्येक प्रकरण स्वतंत्र असल्याने यात द्विरुक्ती आलेली नाही. पत्रकाराची एक शैली असते, त्या शैलीत हे संपूर्ण लेखन झालेले आहे. अर्थातच त्याला ललित तात्त्विकतेचीसुद्धा जोड आहे. 'मराठी माणूस हा भावनाप्रधान असतो. तीच मानसिकता माझी ही आहे. मानवी स्वभाव जन्मजात असतो. वाढत्या वयाप्रमाणे त्याला पैलू पडतात पण मूळ मूस काही केल्या बदलत नाही हेही तितकेच खरे होय. वयाचा आणि वातावरणाचा परिणाम होतोच.' या वाक्यातून त्याचा प्रत्यय येतो.

हे प्रवासवर्णन प्रांजळ आहे. आपण नांदगाव येथे राहत होतो त्या गावाची शैक्षणिक, आर्थिक स्थिती, शेती, मजुरी यांची माहिती देतानाच आपण त्या गावापासून थेट लंडनपर्यंत प्रवास कसा केला याची माहिती मनमोकळेपणाने या वर्णनात दिलेली आहे. लंडनला प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांसाठी मार्गदर्शक असा हा ऐवज आहे. पत्रकार, लेखक, कार्यकर्ता आणि एक जबाबदार पालक अशा विविध भूमिका आणि कर्तव्ये भास्कर कदम यांनी अतिशय निष्ठेने आणि जबाबदारीने पार पाडलेली आहेत. त्यांचे प्रतिबिंब या लेखनात आढळते. 'नांदगाव ते लंडन' हा प्रवास केवळ त्यांच्यापुरताच मर्यादित राहत नाही तर तो आपलाही होतो, हा अनुभव हे पुस्तक वाचत असताना येतो. या पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवलेले असून ते अतिशय बोलके, शीर्षकाला साजेसे आहे.

**मूल्य ३०० रुपये    सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

**ललिताक्षरं**
**डॉ वसुधा सहस्त्रबुद्धे,**
**चारुशीला धर,**
**प्रा विजया पंडितराव,**
**वासंती वर्तक**




**या जगण्यावर या निसर्गावर लिहावे म्या किती!**

*'या शांततेनं माणसांना घेरलं आहे. नुसता मोकळा श्वास घेतात म्हणून मारलं आहे; पण निसर्गाला नव्हे. निसर्गानं गप्प राहायचं ठरवलं तर सारी सृष्टी निश्चल होईल. वारा वाहायचा थांबेल, पानं डोलायची थांबतील. ती सळसळ नाही जाणवली तर आपलाही श्वास कोंडेल. पण या शांततेत असं नाही झालं. उलट माणसांचं जग थांबलं तरी निसर्ग फळला–फुलला आहे.'*

'ललिताक्षरं' हा ललित लेखांचा एक सुंदरसा लेखसंग्रह आहे. लेखसंग्रह साधारणतः एका लेखकाचा असतो परंतु हा लेखसंग्रह मात्र अपवाद म्हणावा लागेल. सहलेखक म्हणून यापूर्वी दोन वा तीन लेखक एकत्र आल्याची उदाहरणे देता येतील, पण चार? होय, तब्बल चार सख्यांनी मिळून लिहिलेला हा लेखसंग्रह आहे आणि त्याची नोंद इतिहासात नक्कीच घेतली जाईल. डॉक्टर वसुधा सहस्रबुद्धे या हिंदी आणि मराठी साहित्यातील मोठे योगदान दिलेल्या लेखिका आणि अनुवादक आहेत. त्यासाठी त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. प्रा विजया पंडितराव यांची लेखनकारकीर्द मोठी असून आतापर्यंत त्यांची वेगवेगळ्या साहित्यप्रकारांमधील सहा पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. चारुशीला धर या बंगाली भाषेच्या अभ्यासक आणि अनुवादक आहेत. शिवाय चित्रपटमाध्यमाशी त्यांचे नाते घट्ट जुळलेले आहे. वासंती वर्तक यांना दूरदर्शनच्या आरंभाच्या काळापासून आतापर्यंत वृत्तनिवेदक, मुलाखतकार ते लेखक, अशा विविध भूमिकांमधून आपण पाहिलेले आहे. त्यांनी अनेक वृत्तपत्रे, माध्यमे यांच्यातून केलेले सदरलेखन वाचलेले आहे. त्यामुळे या सर्वच लेखिका स्वयंसिद्धहस्त आहेत. तरीही त्यांनी एकत्र येऊन 'ललिताक्षरं'चा एक सर्वांगसुंदर असा प्रयोग केलेला आहे. या लेखसंग्रहात एकूण ४८ लेख आहेत, म्हणजेच प्रत्येकी बारा लेख अशी विभागणी यात आहे.

चार लेखिका असल्याने चौघींची विषयांची निवड, शब्दमर्यादेवर नसलेले बंधन, प्रत्येकीची असलेली भाषाशैली, आकृतिबंधाची मांडणी, प्रत्येकीची वेगळी आहे. चारही लेखिकाच असल्याने स्त्रियांशी निगडित असलेलेच विषय अधिक असतील या समजाला इथे छेद मिळतो. लेखक बहुश्रुत असतो, त्याचे अनुभव, समाजातील त्याचे स्थान, आलेली परिपक्वता, या सगळ्यांचा परिणाम म्हणून विषयातील खूप वेगळेवेगळेपण येथे दिसून येते. भाषेवर असलेली हुकूमत आणि शैलीबाबत असलेली समज, यामुळे प्रत्येकीचा लेख वेगळा आहे हे स्पष्टपणे जाणवते. इतकेच नव्हे तर आपल्या लेखनाबाबत असलेली जागरूकता दिसून येते.

लेखाचा जीव तसा नेहमीच लहान असतो. त्यात एखादाच अनुभव किंवा एखादे लहानसे बीज असते. या संग्रहातील लेख वाचताना हे बीज लहान असले तरी त्याभोवती गुंफलेल्या अनुभवांची, संदर्भांची उदाहरणे अधिक आहेत. आपण जे लिहीत आहोत त्याला आवश्यक असणारे समृद्धपण बहाल करण्याची जाणीव प्रत्येकीच्या ठायी अंगभूत असल्याची दिसून येते. निसर्ग, बाईपण यांच्या जोडीला संवेदनशीलपणा, भावनेतील ओलावा आणि निरीक्षणातील तरलपणा खूप ठळकपणे प्रत्ययास येतो. अगदी साधा कापडाच्या दुकानातील शोकेसमधील पेहेराव घातलेला बाईचा पुतळा हा लेखाचा विषय घेऊन त्याच्या थेट अंतरंगापर्यंत डोकावण्याची किमया 'मेनीक्वीन' या लेखात लेखिकेने साधलेली आहे. 'पायवाटा जाग्या झाल्या' हा लेख वाचताना आपण नुसतेच निसर्गात वावरतो आहोत असे नाही तर निसर्गाची एक कविता वाचतो आहोत असा उत्कट भाव आपल्या अनुभवास येतो. 'दर्शन' हा लेख नसून एक लघुकथा आहे इतका मायेच्या ओलाव्याने दाटलेला भावनेचा कल्लोळ आपल्या अंतःकरणाला भिडतो. 'दिवस सृजनाचे', 'तपश्चर्या', 'संवाद' हे लेख प्रेमाचा आणि निसर्गाचा एक सुंदर भावाविष्कार व्यक्त करतात. एकूणच सर्व लेख आपल्या मनाचा ठाव गळ्यात हात घालावा इतक्या सहजपणे घेतात.

लेखाचा शेवट हा नेहमीच चिंतनाचा आणि चिंतेचा भाग ठरलेला असतो. आपल्याला जे लेखातून मांडायचे आहे त्याचा समारोप या शेवटात असतो. त्यात जराही गफलत झाली तर संपूर्ण लेख पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळतो. या संग्रहातील लेख वाचत असताना या शंकेला जागा राहत नाही.

या संग्रहाच्या शेवटच्या भागात एक वेगळा प्रयोग केलेला दिसून येतो. 'त्रिशूळ' या रेखाचित्रावर आधारित लेख चारही लेखिकांनी लिहिलेला आहे.

'हे जग सूर्योदयासारखं प्रसन्न, हिरव्यागार वनराई सारखं शीतल, पांढऱ्याशुभ्र बर्फाच्छादित डोंगरासारखं सुंदर, खळाळत वाहणाऱ्या नद्यांसारखं सुंदर आणि मंगलमय होवो.' 'पायवाटेच्या साक्षीने लगतच्या झाडाखाली कित्येक कोवळे डोळे रिते झाले, भुंडे डोके आलवणाने झाकले, पायवाट गदगदली, झाडांचा बुंधा आत खोलवर थरारला. पावलाने खालची माती ओली थंडगार झाली. आजही ती पायवाट मनाला साथ घालते.' यासारखी अनेक सुंदर सुंदर वाक्ये वाचताना मन आनंदून जाते.


या सगळ्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे ती संपदा जोगळेकर–कुलकर्णी यांनी. या लेखसंग्रहाची अद्‌भुत नावीन्यपूर्ण कल्पना त्यांचीच. विषयनिवडीचे स्वातंत्र्य दिलेले असले तरी त्यांची निवड, त्यावरील संपादन ते निर्मितीपर्यंत सर्व जबाबदाऱ्या त्यांनी अतिशय रसिकतेने आणि चोखंदळपणे पार पाडलेल्या आहेत. अभिनेत्री, लेखिका, दिग्दर्शिका संपदा यांनी असे प्रयोग यापूर्वीदेखील 'चार सख्य चोवीस', 'गुंफियला शेला' यासारख्या पुस्तकांतून केलेला आहे. त्यात त्याच मालिकेतील 'ललिताक्षरं' हे पुढील पूर्ण उमललेले पुष्प आहे. सुप्रसिद्ध लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. त्यांनी लेखांचे सौंदर्य आणि लेखिकांची आविष्कृत प्रतिभा यांचे मनापासून कौतुक केले आहे. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सुंदर सजवलेले आहे.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

# ग्रंथपान

## मोहरा महाराष्ट्राचा

**रमेश अंधारे**




**महाराष्ट्र :काल आज आणि उद्या**

*'तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठीमध्ये 'लीळाचरित्र', 'श्री गोविंदप्रभु चरित्र', 'सिद्धांतसूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ', 'स्थळग्रंथ', 'स्मृतिस्थळ' यासारखे वाययीन गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध असलेले गद्यग्रंथ निर्माण झाले, ही गोष्ट लक्षणीय आहे. 'लीळाचरित्र' या ग्रंथाला केवळ मराठीतील आद्य ग्रंथ म्हणून महत्त्व आहे, असे नाही. आठवणींच्या रूपाने चरित्र लिहिण्याची ही तर्हा भारतीय साहित्यामध्ये (संस्कृतसकट) अपूर्व आहे. प्रत्यक्ष प्रमाणांच्या पुराव्यावर आधारलेला चरित्रग्रंथ निर्माण करण्याचे हे कर्तृत्व मध्ययुगीन भारताच्या इतिहासात एक एकमेवाद्वितीय आहे. इतिहास लेखनाची आणि ऐतिहासिक सत्याच्या जपणुकीची दृष्टी केवळ इंग्रजी साहित्याच्या अध्ययनानेच भारतीय लेखकांना प्राप्त झाली, या समजुतीचा हा एक लखलखीत अपवाद आहे.'*

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली या घटनेला १ मे २०१९ रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. या कालखंडाला आपण हिरकमहोत्सवी कालखंड असे अभिमानाने म्हणू शकतो. या कालखंडात महाराष्ट्र जडणघडणीच्या दृष्टीने काल कसा होता, आज कसा आहे आणि उद्या तो कसा असावा, याचा विचार समोर ठेवावा आणि त्या दृष्टीने काही संकल्प करून हा फुलांचा, दगडांचा, नद्या पर्वतांचा, सुजलाम सुफलाम भूमीचा, संत महात्म्यांचा, ज्वलंत इतिहास सांगणाऱ्या योद्धांचा, समृद्ध संपन्न महाराष्ट्र अंतरंगातून उघडून दाखवावा, याचा संकल्प म्हणजे 'मोहरा महाराष्ट्राचा' हा ग्रंथ होय. हिरकमहोत्सवापासून अमृत महोत्सवाकडे प्रवास करताना हा सर्वांग, संपन्न, समृद्ध महाराष्ट्र आपल्या समोर अधिक संपन्न समृद्ध कसा राहील ही दृष्टी देणारा ग्रंथ म्हणजे 'मोहरा महाराष्ट्राचा'. आणि एक सुजाण नागरिक म्हणून, एक सुशिक्षित अभ्यासक म्हणून, एक सभ्य पाईक म्हणून मी यात किती सक्रिय आहे, किती एकरुप आहे आणि किती कर्तव्यरुपी जबाबदार आहे, याची जाण देणारा ग्रंथ म्हणजे 'मोहरा महाराष्ट्राचा' होय.

महाराष्ट्र संस्कृती हा हा आपला एक अभिमानाचा बिंदू आहे. ही संस्कृती पाषाणयुग ते महापाषाणयुग या कालखंडात, सातवाहन ते शिलाहार या राजांच्या काळातील कालखंडात आणि कलचुरी ते ब्रिटिश या कालखंडात कशी विकसित होत गेली याचा आलेख आपल्याला ग.का. माने, गो.ब. देगलूरकर आणि चंद्रशेखर गुप्त यांच्या लेखांतून समजून येतो.

महाराष्ट्रात राहणारा वर्ग हा मराठी भाषिक आहे, त्यामुळे ही संस्कृती मराठी माणसाची संस्कृती आहे. या संस्कृतीला भौगोलिक, नैसर्गिक जसे कोंदण आहे तसा सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक इतिहास आहे. या इतिहासातील तपशील संपूर्ण कालखंडाचा आणि त्या त्या टप्प्यावर घडलेल्या विविध परिणामांचा, बदलांचा दृश्य आलेख आहे. इसवीसन पूर्व २३६ च्या सुमारास स्थापन झालेली सातवाहनांचे राज्य सत्ता, ही महाराष्ट्र संस्कृतीचा उषःकाल होता. दक्षिण भारताच्या इतिहासाला आणि संस्कृतीला प्रारंभ करण्याचे श्रेय प्रतिष्ठान म्हणजेच पैठणच्या सातवाहनांकडे जाते. महाराष्ट्रसह दक्षिणेत शालिवाहन संवत प्रचलित झाले. 'गाथा सप्तसई' हा महाराष्ट्र प्राकृतला लोकजीवनाचा आरसा ठरवा असा ग्रंथ तोही याच काळातला. 'विवेक सिंधू' हा कवी कुलगुरू मुकुंदराज यांनी रचलेला ग्रंथ आणि वारकरी संप्रदायाचा उगम व विकास याचा कालखंड म्हणजे यादव कालखंड आपणास महाराष्ट्र संस्कृती विकासाच्या पायाची कल्पना देतो.

मराठी लोकसंस्कृती म्हणजे काय, लोकसाहित्य आणि अभिजात साहित्य, संत साहित्य,लोकप्रतिमा आणि संत चरित्रकथा, याविषयी डॉ रा चिं ढेरे यांनी लिहिलेला लेख आणि 'इतिहास संस्कृती आणि साहित्य' हा वसंत आबाजी डहाके यांनी लिहिलेला लेख आवर्जून वाचावेत असे आहेत.

हिंदू धर्म, बौद्ध धर्म, मुस्लिम धर्म, ख्रिश्चन धर्म, जैन धर्म, असे अनेक वेगवेगळे धर्म आपल्याकडे आहेत. या धर्मांचे स्वरूप आणि त्यांची मानवी संस्कृतीमध्ये असलेली भूमिका, हा एक अविभाज्य स्वतंत्र विषय आहे. त्या अनुषंगाने त्याची व्याख्या, त्याची शाश्वतता आणि अपरिहार्यता, त्याचे पारमार्थिक व आध्यात्मिक स्वरूप व समाजशास्त्रीय चिकित्सा, याबाबत रावसाहेब कसबे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, किशोर सानप, भा.ल. भोळे, नलिनी जोशी, फकरुद्दीन बिन्नुर या मान्यवरांनी अतिशय चिकित्सकपणे आपली मते मांडलेली आहेत. याच प्रमाणे मराठी भाषा, भाषेचा प्रश्न, व्याकरण, कोशवाङ्मय आणि मराठी साहित्य, यावरील लेखांचाही यात समावेश आहे.

'मोहरा महाराष्ट्राचा' हा एक बृहद ग्रंथ आहे, जो महाराष्ट्राची भाषा, साहित्य, धर्म, समाज, संस्कृती, इतिहास, यांचा चिकित्सक आलेख आपल्यासमोर साकार करतो. अभ्यासक आणि स्पर्धा परीक्षेतसाठी बसू इच्छिणारे स्पर्धक यांच्यासाठी हा ग्रंथ उत्तम मार्गदर्शक ठरावा, इतका तो परीपूर्ण झाला आहे. प्राचार्य डॉ. रमेश अंधारे यांनी त्यासाठी संपादकीय कौशल्य पणाला लावलेले आहे याची प्रचिती यातून दिसून येते. त्यांनी या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना हा ग्रंथ समजून घेण्यासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल. 'मुद्रा महाराष्ट्राची' या ग्रंथातून त्यांनी सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची कारकीर्द समोर ठेवलेली होती. डॉ. पी.डी. पाटील यांनी या ग्रंथाला प्रस्तावना दिलेली असून प्राचार्य डॉ. रमेश अंधारे यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. या ग्रंथात एकूण ४३ लेख आहेत. ते लिहिणारे सर्वच लेखक प्रथितयश साहित्यिक, अभ्यासक आहेत. त्यांची माहिती ग्रंथाच्या शेवटी परिशिष्ट एकमध्ये दिलेली असून महाराष्ट्राविषयी असणारे विविध ग्रंथ यांची माहिती परिशिष्ट दोनमध्ये दिलेली आहे. या ग्रंथाची उत्तम निर्मिती ग्रंथालीने केली असून तिचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजविलेले आहे.

**मूल्य १५०० रुपये सवलतीत १००० रुपये**

## ग्रंथपान

**हॅश टॅग कविता**
**वैभव दळवी, विजयराज बोधनकर, संतोष पाठारे, रवींद्र भगवते,**
**संपादन : संपदा जोगळेकर – कुलकर्णी**




**लाटेला धन्यतेचा किनारा लाभल्याचा आनंद**

*'या मेंदूच्या आवारात आहेत दोन विहिरी डोळ्यांच्या तुरुंग भरलेल्या*
*परीक्षेच्या वेळी आटते विहीर, आनंदाच्या ऋतूत भरते विहीर*
*बाहेरच्या शहरात आता मात्र जीव द्यायलाही विहिरी उरल्या नाहीत*
*पण माझ्या मेंदूतल्या विहिरीला करुणेचे झरे सतत आहेत वाहते..'*

'हॅशटॅग कविता' हा कवितासंग्रह आहे चार कवींचा एकत्र मिळून साकारलेला. एक स्वतंत्र अस्तित्व असलेला प्रयोगात्मक संग्रह म्हणायला हवा. यातील चारही कवींच्या कविता वाचल्यानंतर असे लक्षात येईल, की प्रत्येकाचा स्वतंत्र असा एक एक कवितासंग्रह प्रकाशित होऊ शकतो. याचे कारण असे, की प्रत्येकाच्या २५ कविता या संग्रहात आहेत. प्रत्येकाची कविता स्वतंत्र आवाका असलेली कविता आहे. तिचे वैशिष्ट्य आणि आशय हासुद्धा कवीशी असलेल्या कल्पना, संवेदना, भावना, अनेक क्षमता यांची साक्ष देणारा आहे.

कॅप्टन वैभव दळवी हे नाविक म्हणून कार्यरत असल्याने त्यांच्याकडे असलेला अनुभवाचा, चिंतन आणि मनातला विषय पाहिला तर क्षितिज, समुद्र आणि त्याची विविध रूपे, उसळणाऱ्या जीवघेण्या लाटा आणि वादळाचे तुफान, वर आकाश, त्यात भरलेला ग्रहताऱ्यांचा लुकलुकणारा साद घालणारा खजिना, आणि लाभलेले निवांत एकटेपण. याचसोबत त्यांच्यात असलेला सैनिक सदैव जागरूक आहे. हा सैनिक ज्या अभिमानाने आणि जिद्दीने सीमेचे रक्षण करतो त्याच्याविषयीच्या भावना त्यांच्या कवितेत थेट अंत:करणातून व्यक्त करतो. निसर्ग हा तर त्यांच्या रोमारोमात भिणलेला आहे. त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की त्यांच्या कवितेला स्वतःचा असा एक गझलेच्या जवळ जाणारा नाद आहे, जो नाद आपल्या अंतकरणात रुंजी घालत राहतो.

'संपत नाही युद्ध कधीही विराम जोवर नाही
विराम नसतो कधीच कळले जहाज बुडता बुडता'

अशा ओळी हे सहज लिहून जातात. एक आश्वासक, संवेदनक्षम कवी म्हणून कॅप्टन वैभव दळवी यांची ओळख नक्कीच वृद्धिंगत होईल असे खात्रीने म्हणता येते.

'शाळा मला माती समजून सतत नांगरत राहिली
पण माझा पावसाळा शाळेला कधीच दिसला नाही
तेव्हापासूनच माणसांना मी ग्रह म्हणतो,
माझं चुकत तर नाही ना?'

सुप्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांचा प्रवास ग्रामीण भागापासून शहरापर्यंत झालेला आहे. मेंदूतले शहर त्यांच्याभोवती सतत पिंगा घालते आहे. तरीदेखील गावचे घर, चिंधू, बाप, आई, शाळा, चाफा, दिवा हे विस्मृतीत गेलेले नाही. त्यांच्या कविता दिसणाऱ्या विसंगतींवर थेट बोट ठेवतात. सभोवतालचा कोलाहल त्यांना अस्वस्थ करतो. तरीही त्यांची संवेदना त्यावर हळुवारपणे फुंकर घालत राहते.

'वाढेल आता मिजास काजव्यांची
विझले अंतरात दिवे माणसांचे'

आपल्या भोवतीचा माणसांचा भवताल पाहताना डॉक्टर संतोष पाठारे अगदी नेमकेपणाने अल्पाक्षरी संवेदनेतून व्यक्त होतात. निसर्गावरच अंकुश ठेवू पाहणारा भौतिक सुखाच्या अधीन गेलेला माणूस माणसातील संस्कृतीला विसरत चाललेला आहे. या विसरण्यात अनेक प्रिय आणि अप्रिय घटकांचाही समावेश आहे. तुटलेपण आहे. उद्याचा आभास समोर उभा आहे. तरीदेखील कवी आपल्या स्वप्नांना पर्याय शोधू पाहत आहेत. आपल्याला पडणारे प्रश्न, भाव व्यक्त करू पाहत आहे आणि सखीला गुंतलेले हात मोकळे करायला सांगताना स्वतःचे भारलेपण कलावंताच्या भूमिकेतून सांभाळू पाहत आहे.

'तुझ्या मंगळसूत्राबरोबर गहाण ठेवावी लागतील
आपली स्वप्नंही कदाचित!'

असे म्हणत स्वतःच्या अस्तित्वाचा झगडाही व्यक्त करत आहे.

रवींद्र भगवते हे चौथे कवी. यांची कविता स्वतंत्र आणि एक वेगळा बाज घेऊन आलेली आहे.

'वाहनांच्या भन्नाटातून घेऊन जाणारी
सन्नाटाकडे' आणि
'ज्यांचं काहीच नाही जखमी त्यांचं नशीबच
जखमी',
'कोणी पांथस्थही नसे येथे पायवाटेवर
मात्र एखादा सरडा सरसरे पायावर'

अशी वेगळी रूपके आणि प्रतिमा घेऊन आलेली रवींद्र भगवते यांची कविता आपल्याला एका वेगळ्या अनुभूतीचा आनंद देते.

'हॅशटॅग कविता' या आवर्जून वाचाव्यात अशा कविता आहेत. काही लहान तर काही दीर्घ असे त्यांचे स्वरूप आहे. मात्र त्यांच्यातून व्यक्त झालेल्या प्रतिमा आणि रूपके कवींच्या प्रतिभेचा अविष्कार व्यक्त करतात. हा आविष्कार एकत्र गुंफण्याचे काम केले आहे संपदा जोगळेकर–कुळकर्णी यांनी. त्यासाठी त्यांचे मनोगत वाचण्यासारखे आहे.

या संग्रहाला सुप्रसिद्ध कवी पद्मश्री ना.धों. महानोर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. अशी प्रस्तावना मिळणे म्हणजे कवींचे भाग्यच नव्हे तर त्यांच्या या संग्रहाचे वैभव द्विगुणित झाले आहे.

या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक कवितेला सुंदर अशी आशय संपन्न रेखाटने लाभलेली आहेत. ही रेखाटने पाहणे आणि त्यांचा आशय समजून घेणे हा एक वेगळाच आनंद हा संग्रह देतो. ही रेखाटने आणि मुखपृष्ठावरील सजावट सुप्रसिद्ध चित्रकार विजयराज बोधनकर यांची आहे. मलपृष्ठावरील सजावट राजलक्ष्मी बोधनकर यांची आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**



शासनाच्या पर्यावरण व वातावरणबदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांना स्मृतिचिन्ह देताना सुदेश हिंगलासपूरकर, सोबत महेश खरे




'भेट दिग्गजांची' या मुलाखतीच्या आरंभाच्या कार्यक्रमात पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर व त्यांच्या पत्नी सुयशा यांची मुलाखत घेताना मनाली दीक्षित







## कृतज्ञ मी...
## कृतार्थ मी...
## सोहळ्यातील क्षणचित्रे








RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.